जून, २०२५

# आपलं मंत्रालय

एक सुसंवाद



*अतिथी संपादक*

**डॉ. अतुल पाटणे**

प्रधान सचिव, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन.

# पर्यटन धोरण २०१६




## दृष्टिकोन (Vision)

महाराष्ट्राला एक लोकप्रिय आणि शाश्वत पर्यटन स्थळ म्हणून विकसित करायचे, जिथे राज्य जागतिक, प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवर सर्वोत्तम कार्य संस्कृतीच्या पद्धती आणि मानकांचा व्यापक अनुभव देईल.



## उद्दिष्टे (Objectives)

- महाराष्ट्राला प्रथम पसंतीचे पर्यटन स्थळ म्हणून उन्नत / प्रोत्साहन देणे.
- पर्यटनांच्या / स्थळांच्या पायाभूत सुविधांचा विकास करणे.
- पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक सुलभ करणे.



## ध्येय (Goals)

- महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणुकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकूल वातावरण निर्माण करणे.


# अंतरंग

## ८ एक प्रवास इंदोर

प्रवास! तुमची दृष्टी अधिक व्यापक करतो, असं म्हणतात; परंतु एका चौकटीत काम करणाऱ्या नोकरदार माणसासाठी, त्याच्या चौकटीबाहेरचं विश्व नेहमीच आव्हानात्मक असतं. याला कारण त्याला कायम पडलेले दोन प्रश्न – एक म्हणजे उपयुक्तता आणि दुसरा वेळेची सबब. अनेक वेळेला तुम्हाला कामानिमित्त बाहेर जाण्याची संधी उपलब्ध होते. त्या संधीचं सोनं केलं तर! आम्हालाही कामानिमित्त नागपूरला जाण्याची संधी मिळाली.


## १४ मेळघाटावरील मोहर

डॉ. रवींद्र आणि स्मिता कोल्हे यांनी अशी कोणती संस्था आहे जी काढली नाही. इथला माणूस आणि त्याच्या जगण्याच्या पद्धती समजून घेतल्या, त्याचे सुख–दुःख, अडीअडचणी समजून घेताना त्याच्यात आणि आपल्यात अंतर पडू दिलं नाही, गावातल्या गरिबातल्या गरीब माणसाला न्याय मिळावा, यासाठी कोणाचीही तमा न बाळगता प्रयत्न केले.




## १६ रांजणखळग्यांचे आश्चर्य

रांजणखळगे– नैसर्गिकरीत्या तयार झालेले हे खड्डे म्हणजे निसर्गाने धरतीमातेवर कोरलेली नितांतसुंदर लेणी आहेत. या खड्ड्यांचा आकार रांजणासारखाच असून, या कुंडातील पाणी दुष्काळातसुद्धा आटत नाही. अनेक वर्षांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील निघोज परिसरात मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे या कुंडांची निर्मिती झाली असल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



## २६ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ


महाराष्ट्र हे भारतातील एक बहुआयामी राज्य असून, निसर्गसंपन्नता, ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक विविधता आणि आधुनिकतेचा संगम यामुळे हे राज्य पर्यटकांना विविध अनुभव देणारे ठिकाण बनले आहे. या पर्यटन क्षेत्राच्या सशक्त पायाभूत रचनेत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## २९ दक्षिण काशी कोल्हापूर

दक्षिण काशी म्हणून कोल्हापूरची ओळख देशातच नव्हे, तर अख्ख्या जगाला आहे. करवीर निवासिनी अंबाबाई हे इथले दैवत. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्णपीठ. देवीची मूर्ती मृण्मयी नव्हे, तर चिन्मयीच भासते. देवीच्या चेहऱ्यावरील भाव आत्यंतिक वात्सल्याने ओतप्रोत असल्यानेच की काय तिला जगन्माता म्हणून संबोधले जाते.

## ३७ पाटणादेवी

चाळीसगाव हे ब्रिटिश काळापासून भारताच्या नकाशावर महत्त्वाचं स्थान म्हणून ओळखलं जातं. गोताळा अभयारण्यातील पितळखोरे लेण्या, ज्या अजिंठा लेण्यांपूर्वीच्या काळातील आहेत, त्या सर्वश्रुत आहेत. मात्र, या सर्वांपेक्षा अधिक आश्चर्यचकित करणारा भाग म्हणजे पाटणादेवी आणि तिथला कैक किलोमीटर परिसराचा परीघ..!!



| | | | |
|---|---|---|---|
| नर्मदा परिक्रमा | ६ | बुद्धभूमीची अविस्मरणीय सफर – थायलंड | २५ |
| एक प्रवास इंदोर | ८ | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ | २६ |
| मेळघाटावरील मोहर | १४ | दक्षिण काशी कोल्हापूर | २९ |
| पर्यटनविश्वातील सर्वोत्तम ठिकाणांचा मागोवा | १५ | अमेरिकेतील कार्यसंस्कृती | ३० |
| रांजणखळग्यांचे आश्चर्य | १६ | लडाख : दुर्गम आणि चित्तथरारक | ३१ |
| एक अनुभवशील प्रवास | १७ | मी पाहिलेला सह्याद्री... | ३२ |
| देवनागरी | १८ | व्हिएतनामचा धाडसी प्रवास | ३३ |
| कविता | २०–२१ | माझी परदेशवारी | ३५ |
| मोगलीच्या गावची सफर! | २२ | पाटणादेवी | ३७ |

वर्ष ३ रे । अंक ३ । जून, २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

### प्रतिक्रियांचे स्वागत

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

# महाराष्ट्र राज्य पर्यटन धोरण

- पर्यटन क्षेत्रात आगामी १० वर्षांच्या कालावधीसाठी अंदाजे रू.१.०० लक्ष कोटी नवीन खासगी गुंतवणूक आकर्षित करणे.
- खासगी क्षेत्राद्वारे तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापकीय आणि संघटनात्मक कौशल्यांच्या आधारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सुमारे १८ लक्ष व्यक्ती इतका रोजगार निर्माण करणे.
- राज्यातील पर्यटन स्थळांचा पायाभूत सुविधांद्वारे विकास करून, टूर ऑपरेटर, MICE. ऑपरेटर आणि डेस्टिनेशन वेडिंग ऑपरेटर यांसारख्या साहाय्यभूत घटकांना अपेक्षित किफायतशीर प्रोत्साहन देऊन पर्यटकांची संख्या दुपटीने वाढविणे.
- खासगी क्षेत्राच्या सहभागाद्वारे जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देऊन आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करणे,
- पर्यटकांना राज्यातील पर्यटन स्थळांवर अधिकाधिक वास्तव्य करण्यासाठी आकर्षित व प्रेरित करणे.
- पर्यटन क्षेत्राचा विकास करणे व राज्यातील महसूलास पूरक वातावरण निर्माण करणे.
- डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून आणि नवीन पर्यटन उत्पादने आणि सेवांचा वापर करून नवोन्मेष, उत्पादकता आणि क्षेत्राची स्पर्धात्मकता वाढवणे.

## सुधारित प्रादेशिक पर्यटन विकास धोरण योजना (Regional Tourism Development Scheme)

शासन निर्णय ०४ नोव्हेंबर २०१० च्या शासन निर्णयानुसार पर्यटन विकासाचा बृहत् आराखडा तयार करण्याची जबाबदारी MTDC वर सोपविण्यात आलेली आहे. या आराखड्यांतर्गत पूर्ण झालेले, सुरु असलेले प्रकल्प,केंद्र शासन साहाय्यित पर्यटन प्रकल्प आणि महत्त्वाचे खासगी पर्यटन प्रकल्प यांचा समग्र आढावा घेऊन पर्यटन विकासाच्या दृष्टीने रिसॉर्ट, पर्यटन स्थळांकडे जाणारे जोड-रस्ते, उद्याने, वस्तूसंग्रहालय, विक्री-केंद्रे, क्रीडा सुविधा, रेस्टॉरंट बांधकाम, स्वच्छता-गृहे, दिशादर्शक फलक, वाहनतळ, संरक्षक भिंत, पर्यटकांसाठी पाणीपुरवठा, विद्युतीकरण अन्य सोयी-सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे.

# पर्यावरणपूरक आणि जबाबदार पर्यटन

पर्यटन म्हणजे केवळ प्रवास नव्हे, तर अनुभवांची समृद्ध यात्रा. आपण जिथे जातो तेथील निसर्ग, संस्कृती आणि समाज याच्याशी आपलं एक नातं तयार होत. हे नातं जपण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांनाही हे सौंदर्य अनुभवता यावं, यासाठी 'पर्यावरणपूरक आणि जबाबदार पर्यटन' ही संकल्पना खूप महत्त्वाची आहे.

महाराष्ट्राला समृद्ध किनारपट्ट्यांचे सौंदर्य लाभलेले आहे, ते अबाधित ठेवण्यासाठी प्लास्टिकचा अतिरिक्त वापर, निर्माल्य, कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत सामान्य नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. पर्यटनात पर्यटकातर्फे; तसेच पर्यटकांप्रती अशा दुहेरी भूमिका महत्त्वाच्या ठरतात. पर्यटकांतर्फे स्वच्छता, शिस्त, स्थानिक संसाधनाचा योग्य वापर, संस्कृतीचे जतन व संवर्धन या व इतर बाबी महत्त्वाच्या आहेत. जबाबदार पर्यटक म्हणजे आपण जिथे जातो तिथल्या माणसांचा, त्याच्या परंपरांचा, संस्कृतीचा आदर राखणं, सुसंवाद या गोष्टी पाळल्या, तर पर्यटनाचा अनुभव केवळ वैयक्तिक समाधानापूरता मर्यादित न राहता सामाजिक आणि पर्यावरणीय भान जपणारा ठरतो.

पर्यटकांप्रती या भूमिकेत शासन म्हणून काय करता येईल, याचा विचार पर्यावरण धोरण २०२४ मध्ये करण्यात आला आहे. पर्यटन धोरणांतर्गत पर्यटनाशी निगडित असणाऱ्या आवश्यक सुविधेसह संपर्क यंत्रणा (वायफाय), प्रमुख पर्यटनस्थळी सीसीटीव्ही, नियत्रंण कक्ष, पोलीस हेल्पलाईन, रुग्णवाहिका सेवा इ. सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वृद्ध नागरिक, महिला, लहान मुले; तसेच अपंग व्यक्तींच्या गरजा लक्षात घेऊन सुरक्षितता व्यवस्था आखण्यात येणार आहे. उदा. सुलभ मार्ग, आपत्कालीन निघण्याचे मार्ग, सूचना फलक, फायर अलार्म यंत्रणा, अग्निशमन यंत्रसामग्री आणि प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी यांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

या धोरणांतर्गत स्थानिकांना उपजीविकेचे पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण पर्यटन, कॅराव्हॅन पर्यटन, अनुभवात्मक पर्यटन, पर्यटन गावे, कृषी पर्यटन, ईको टूरिझम या घटकांचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्राला लाभलेली किनारपट्टी विचारात घेऊन क्रुझ पर्यटन निर्माण करण्याकरिता अलिबाग, मुरुड–जंजिरा, दापोली, तारकर्ली यासारख्या किनारपट्टीवरील ठिकाणे या धोरणात विचारात घेण्यात आली आहेत. यासाठी साहाय्यभूत घटकांची निर्मिती करण्यासाठी रत्नागिरी, रायगड, अर्नाळा इ. ठिकाणी पर्यटन जेट्टी निर्माण करण्यात येणार आहेत.

महाविशेष पर्यटन स्थळ विकासअंतर्गत राज्यातील ५० शाश्वत पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येणार आहेत. यामुळे पर्यटक स्थळांचे आकर्षण वाढेल; तसेच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या व उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील. या अंतर्गत संस्कृती, वारसा, आध्यात्मिक, साहसी, ग्रामीण पर्यटन इ. विविध संकल्पनेवर आधारित पर्यटन स्थळांचा विकास करण्याचे नियोजन आहे. पर्यटन स्थळांचा विचार करताना वे–साईड सुविधा जसे रस्ते, पाणीपुरवठा, जोडणी, सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर, पर्यटन स्थळांकडे जाणारे जोड रस्ते, उद्याने, विक्री केंद्रे, क्रिडा, सुविधा, दिशादर्शक, वाहनतळ, इ. सुविधांचा विचार सुधारित प्रादेशिक पर्यटनामध्ये करण्यात आला आहे.

या निमित्ताने नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या आजुबाजूच्या परिसरात पर्यावरणपूरक पर्यटनास अनुकूल ठरणारी कोणतीही पर्यटन स्थळे, निसर्गरम्य स्थळे, ऐतिहासिक वारसा स्थळे, स्थानिक सांस्कृतिक वैशिष्ट्ये किंवा विशेष निसर्गसंपदा असल्यास संबंधित माहिती स्थानिक प्रशासनास किंवा पर्यटन विभागास उपलब्ध करून द्यावी. आपल्या सूचनांमुळे पर्यावरणपूरक पर्यटनाचे जतन व संवर्धन करणे अधिक प्रभावीपणे शक्य होईल.

पर्यटनाचा हाच धागा पकडून 'आपल मंत्रालय' या गृहपत्रिकेमध्ये विविध ठिकाणांची ओळख करून देणारे लेख, कर्मचारी–अधिकाऱ्यांचे वैयक्तिक प्रवासवृत्तांत यावर आधारित लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

म्हणूनच लिहिते व्हा, व्यक्त व्हा, अनुभव शेयर करा, 'आपलं मंत्रालय'च्या या विशेष पर्यटन अंकासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**डॉ. अतुल पाटणे**
(अतिथी संपादक)



# नर्मदा परिक्रमा

**(८-९ एप्रिल २०२५)**

**पूजा तरडे**

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करताना माझ्या वाचनात जगन्नाथ कुंटे यांचे 'नर्मदे हर हर' हे पुस्तक आले. श्री. कुंटे यांच्या नर्मदा परिक्रमेदरम्यान त्यांना आलेल्या अनुभवाबाबत या पुस्तकात विवेचन आहे. तेव्हापासून नर्मदा परिक्रमा या विषयाचा भुंगा डोक्यात भुणभुण करत होता. आता साधारण २ तपानंतर एका मैत्रिणीने उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेबाबत सांगितलं. गेली २-३ वर्षे तिचा अनुभव ऐकला आणि प्रत्येक वेळी त्यावर हे काही आपल्याला जमणार नाही बुवा असा विचार मनात यायचा. यावेळीही २-३ महिन्यांपूर्वी तिने उत्तरवाहिनी परिक्रमेचा कार्यक्रम पाठवून येण्याबाबत विचारणा केली आणि मीही सांगते नंतर म्हणून तिची बोळवण केली. त्यानंतर साधारण १५ दिवसांनंतर आमचे एक स्नेही यांनी माझ्या मिस्टरांना परिक्रमेस येतो का अशी विचारणा केली; पण ५०-६० जणांचा ग्रुप आणि ४ दिवसांचा कार्यक्रम पाहून मला शक्य नसल्याने तेही बारगळले. अशा प्रकारे नर्मदा मैयाने दोन वेळा दिलेली संधी आम्ही घेतली नाही. एक दिवस मिस्टरांचा कॉलेज मित्र नाथा चव्हाण यांनी उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेबाबतचा त्यांचा अनुभव मिस्टरांना सांगितला आणि आम्ही मनाशी ठरवलं की, आता परिक्रमेला जायचंच आणि तेही नाथाभाऊंच्या सोबत आणि त्यावर नर्मदा मैय्याने आमचा विचार बदलू नये म्हणून लगेच आम्हाला दोन्ही वेळच्या ट्रेनचे आरक्षण मिळवून दिले. आमच्या परिक्रमेचे कळताच माझी नणंद आणि तिचे मिस्टर यांनीही परिक्रमेला येण्याबाबत इच्छा व्यक्त केली आणि तेसुद्धा आम्हाला जोडले गेले. मध्यंतरीच्या काळात विविध कारणांनी आमची परीक्षा नर्मदा मैय्याने घेतली; पण आम्ही परिक्रमेला जाण्याच्या निर्णयावर ठाम राहिलो आणि बघता-बघता ८ एप्रिल ही तारीख उजाडली. आम्ही मुंबई-बडोदा प्रवास केला. संध्याकाळी नाथाभाऊंनी केलेल्या चोख व्यवस्थेमुळे ड्राइवरने बडोदा येथून तिलकवाडा (साधारण १.५ तास) येथे सुखरूप पोहोचवले. येथे आमची राहण्याची व्यवस्था एक शिक्षकांच्या (लाली मास्तर) दुमजली घरी करण्यात आली. या गावात अनेकजण परिक्रमा करणाऱ्यांना सेवा देतात. काही जण वाजवी दरात राहण्याची (**homestay**), काही जेवणाची व्यवस्था करतात. अतिशय प्रेमाने त्या दाम्पत्याने आमचे स्वागत केले. नर्मदा परिक्रमावासींची इतकी वर्षे निःस्वार्थपणे सेवा करतात म्हणून की, काय मैयाने त्यांना बऱ्याच वर्षांनी दोन मुलांच्या रूपात आशीर्वाद दिला असं गप्पांमध्ये कळलं. आमच्यासारखे जवळपास १२ जण आधीपासून त्यांच्या घरात राहायला होते; पण सर्वांचे चहा-पाणी त्यांनी हसतमुखाने केले. थोडे आवरून आम्ही नर्मदा मैयेच्या आरतीसाठी वासुदेव कुटीर येथील मारोती धाम येथे संध्याकाळी ६.४५ ला पोहोचलो. तिथून समोर नर्मदा नदीचे विहंगम दर्शन घडत होते. आरतीनंतर आम्ही वासुदेव कुटीरमध्ये गुरुजींमार्फत नर्मदा परिक्रमेचा संकल्प केला. तिथून परतताना आम्ही गुरुलीला घर येथे पंड्या नामक परिवाराच्या घरात श्री वासुदेवानंद सरस्वती हे कसे प्रकट झाले, तेथील त्यांच्या पायाचे ठसे बघितले. तिथून सप्तमातृका मंदिरात जाऊन, सात मातृकांचे (ब्राह्मणी, महेश्वरी, वैष्णवी, कौमारी, वराही, इंद्राणी, चामुंडा किंवा यमी) दर्शन घेतले. नंतर रात्री लवकर जेवून आम्ही झोपी गेलो. रात्री परिक्रमा करणारे अनेक जण दिसले; पण आम्हाला वासुदेव कुटीरमधील गुरुजींनी सांगितलं की, रात्री अनेक वाईट शक्तींचा संचार असतो आणि पहाटे ब्रह्ममुहूर्तावर दैवी शक्तींचा संचार असतो म्हणून ही परिक्रमा साधारण पहाटे ३.३० नंतर सुरू करावी असे संकेत आहेत. त्यानुसार आम्ही सकाळी ४ वाजता वासुदेव कुटीरमध्ये श्री नर्मदा मैया आणि श्री शंकराचे दर्शन घेऊन उत्तरवाहिनी परिक्रमेला सुरुवात केली. वासुदेव कुटीरमधील नर्मदा मैयाला आम्हाला परिक्रमेदरम्यान कोणताही शारीरिक, मानसिक, आर्थिक त्रास होऊ देऊ नकोस आणि आमच्यासोबत तूही पदयात्रे दरम्यान राहा अशी विनंती करून, उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमेचा सकाळी ४.३० वाजता नाथाभाऊंसोबत 'नर्मदे हर हर' असा जयघोष करून प्रारंभ केला. जिथं नर्मदेचा प्रवाह उत्तर दिशेला वळतो तिथून उत्तरवाहिनी परिक्रमा सुरू करण्याचा प्रघात आहे. चैत्र महिन्यात नर्मदा नदीच्या दोन्ही तटांवरून ही परिक्रमा clockwise सुरू करता येते. उत्तर तटावर तिलकवाडा तर दक्षिण तटावर रामपुरा ही ठिकाणे आहेत. आमची परिक्रमा तिलकवाड्याहून निघून तट परिवर्तन करून, रामपुरा करून, पुन्हा तिलकवाड्याला संपुष्टात येणार होती. प्रारंभात तिलकवाडा ग्राम स्थित श्री नर्मदेश्वर, वद्रेश्वर महादेव मंदिर, द्वारकाधाम, श्री तिलकेश्वर महादेव मंदिर, श्री नर्मदा माता मंदिरात आम्ही दर्शन घेतले. वाटेत श्री शंकर महाराज मंदिरात श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन पुढे आम्ही मुख्य परिक्रमा रस्त्याला लागलो. पहाट व्हायची होती, त्यामुळं मध्ये-मध्ये रातकिड्यांचा आवाज ऐकू येत होते. रस्त्यावर अनेक परिक्रमावासी दिसत होते आणि एकमेकांना पाहून उत्साहात 'नर्मदे हर हर' असा जयघोष करत होते. गावातील रस्ते अतिशय स्वच्छ होते. मध्ये-मध्ये RO वॉटर (थंड) ची सोय केलेली दिसून आली. आम्ही या परिक्रमेतील प्रमुख मंदिर श्री मणिनागेश्वर महादेव मंदिरात पोहोचलो. तिथं परिक्रमावासींना पोहे, चहा आणि थंड पाण्याची सोय केलेली होती. चहा पिताच ताजेतवाने वाटले. एवढ्या पहाटे पोहे समोर असूनही खाण्याची इचछा नव्हती. पहाटेचे वातावरण खूपच आल्हाददायक होते. ४-५ किलोमीटर चालूनही अजिबात थकवा जाणवत नव्हता. कोकिळेचे कुहूकुहू, पक्ष्यांचा हळुवार किलबिलाट ऐकू येऊ लागला होता. झुंजूमुंजू पहाट होत होती. वाटेत रस्त्यात केळीच्या बागा, बाजरीची, मिरचीची, फ्लॉवरची शेती दिसत होती. आम्ही वासन या गावात कपिलेश्वर महादेव मंदिरात गेलो. इथेच टेंबे स्वामी महाराज, श्री दत्तगुरू महाराजांच्या मूर्ती असलेले छोटेसे मंदिर होते. याशिवाय इथे नर्मदा मैयाचे उमटलेले उजवे पाऊल आहे. त्याचे दर्शन आम्ही घेतले. जवळच वासुदेव आश्रम आहे जिथे विष्णूगिरी महाराज उपस्थित होते. त्यांचे दर्शन घेऊन आम्ही गरम गरम चहा आणि बिस्कीटांचा आस्वाद घेतला. इथे राहण्याची सोयसुद्धा आहे. बरेच परिक्रमावासी इथे आम्हाला भेटले. इथे राहण्या-खाण्याची; तसेच स्नानगृहाची सोय चांगली आहे. नर्मदा पुराणात नर्मदा मैयाचं महत्त्व सांगितलं आहे. तिलकवाडा-रामपुरा परिसरातील नर्मदेच्या तीरावर पांडव, श्री शिव शंकर आणि पवनपुत्र हनुमान यांनी

तपश्चर्या केल्याने या क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्ण परिक्रमेदरम्यान खाण्या–पिण्याची अडचण कुठेही येत नाही. परिक्रमेला येतो म्हटलं की सर्वांची सोय मैया करते. आपली फक्त इच्छा हवी. वासुदेव आश्रमातून नर्मदा मैयाच्या उत्तर तटावर उतरण्यासाठी पायवाट आहे. त्या तटावरून साधारण ३–४ किलोमीटर चाललो असता, रेंगण नावाचे गाव लागते, जिथून बोटीने दक्षिण तटावरील रामपुरा येथे जायची सोय आहे. येथे उजव्या बाजूस नंदी घाट हा सेल्फी पॉईंट तयार केला गेला आहे. तिथं उभं राहून थोडे फोटो आम्ही काढले. बोटीच्या प्रवासासाठी प्रत्येकी २० रुपये घेतले जातात. मधल्या वारी गेल्याने अजिबात गर्दी नव्हती. साधारण ७ पर्यंत आम्ही दक्षिण तटावर पोहोचलो. म्हणजे आतापर्यंत आम्ही १० किलोमीटर अंतर पार केले होते. रामपुरा तटावर आल्यावर नर्मदा नदीच्या पाण्यात नर्मदेचे वाहन म्हणून मगरीचे वास्तव्य असल्याने, पोलीस भाविकांना काठावर स्नान करून देत नाहीत. गुजरात सरकारने तिथं मोठे मंडप घालून, नर्मदा नदीचे पाणी शॉवरमधून स्नानासाठी उपलब्ध करून दिले आहे. आम्ही वासुदेव कुटीरमध्ये सूचना मिळाल्यानुसार एका रिकाम्या बाटलीत नर्मदा नदीचे पाणी अभिषेकासाठी घेतले. येथे खाण्यापिण्याची सोय छान होती. इथे मूग डाळ खिचडी, फरसाण, गाठे खूपच पोटभर खायला मिळाले. ह्याच्या पाठीमागेच पांडवगुंफा आहे, जिथं पांडवांनी शिवलिंगाची स्थापना केली होती. हे ठिकाण कोणाला माहीत नसल्याने तिथं कोणी जात नाही. तिथं जायची वाटही तशी चढ–उताराची असल्याने सावधपणे पावलं टाकावी लागतात. पांडव गुंफा च्या इथे पक्ष्यांची घरटी आणि बरेचसे पक्षी (Green Backed Flycatcher) होते. माझ्या नणंदेच्या नवऱ्याने, त्याची नेचर फोटोग्राफीची हौस या ठिकाणी पुरेपूर भागवून घेतली. हे ठिकाण अतिशय प्राचीन मंदिर आहे. इथे छतावर दगडी श्री यंत्र दिसत होते. असं म्हणतात की, इथे बऱ्याच वेळा शंकराच्या पिंडीवर नाग असतो. थोड्या भीतीनेच आम्ही छोट्याशा मंदिरात शिरलो. आम्ही पिंडीवर शास्त्रोक्त अभिषेक करून पुढे मार्गक्रमण केले. रामपुरा घाटाच्या पायऱ्या खूप असून, त्या उभ्या स्वरूपात असल्याने चढताना दमायला झालं. या घाटावर आम्ही श्री रामजी मढी येथील पुरातन श्री भिमेश्वर महादेव *(भिमाने स्थापित केलेली)* धरमेश्वर महादेव *(धर्माने स्थापित केलेली)* मंदिरांचे दर्शन घेऊन पुढे घाटावरील दशावतारी श्री रणछोडदास मंदिर (श्रीकृष्ण) यांचे दर्शन घेतले. तिथून दक्षिण तटावरील डांबरी रस्ता सुरू झाला. त्यामुळं ऊन जाणवू लागलं. पुढे श्री धनेश्वर महादेव मंदिरात गेलो जिथं धन कुबेराने हे मंदिर स्थापित केल्याची आख्यायिका आहे. या शंकर पिंडीवर पैशाची नाणी ठेवून अभिषेक करायचा. जी नाणी उरतील ती आपल्या पाकिटात जपून ठेवावी आणि जी खाली पडतील ती देवासाठी सोडून द्यावीत, अशी आख्यायिका आहे. याच्या लगतच लोकेश्वर महादेव मंदिर आहे. तिथून काही पावलं चाललो की एका आश्रमात बुंदी, गाठे, फरसाण अशी खाण्याची सोय होती आणि सुंदर असं बडीशेपचं सरबत प्यायला मिळालं. ते पिऊन खूपच बरं वाटलं. यानंतर आम्ही मांगरोळ गावातील मंगळेश्वर महादेव तीर्थ या मंदिरात गेलो. ज्यांना मंगळ ग्रहाची पीडा आहे त्यांच्यासाठी येथे विशिष्ट पूजा केली जाते. तिथून पुढे चालत असताना नाथाभाऊंनी आम्हाला पुन्हा नर्मदेच्या तीरावर नेले आणि मैयाच्या वाहनाचे (मगरीचे) दर्शन घडवले. यातील एक मोठी मगर तर तपकिरी रंगाची होती. परिक्रमेत मगरींचे दर्शन होणे म्हणजे साक्षात मैयाचे दर्शन होणे असं म्हणतात. याचे पूर्ण श्रेय नाथाभाऊंना आहे. रस्त्यात अनेक चांगले आश्रम लागले. उदासीन आश्रम, पूर्णानंद महाराज (खिडकीवाले बाबा) यांचा तपोवन आश्रम लागला. आठवड्यातून एकदा महाराज खिडकीतून भक्तांना दर्शन देतात म्हणून तसं नाव त्यांना पडलं आहे. येथे उत्कृष्ट दर्जाचं ताक प्यायला मिळालं. २–३ ग्लास ताक प्यायल्यावर जरा हायसं वाटलं. केळीसुद्धा प्रसाद म्हणून ठेवली होती. येथे दुपारी १ नंतर आइसक्रीम खायला ठेवतात. पुढे रामानंद आश्रम येथे जुने श्रीराम मंदिर, पारदेश्वर मंदिर दर्शन घेऊन, तेथील तळ्यातील छोट्या मगरीचे दर्शन घेतले. यानंतर सीताराम बापूंच्या आश्रमात थोडी विश्रांती घेऊन तिथं थोडं थंडगार ताक/सरबत प्यायलो. इथही जेवणाची सोय केली होती; पण ताक प्यायल्याने पोटात अजिबात जागा नव्हती. आता नर्मदेच्या पात्रातून चालावे लागणार असल्याने कूलरच्या पाण्यात रुमाल भिजवून ते डोक्यावर ठेवून त्यावर कॅप घालून आम्ही या आश्रमाच्या मागच्या बाजूला पुन्हा दक्षिण तटावर उतरून, अगदी नर्मदा नदीच्या काठाने पुढील उरलेली ३ किलोमीटरची परिक्रमा सुरू केली. सकाळी १० च्या सुमारास ४४–४५ डिग्री तापमानात, नर्मदेच्या गोट्यावरून चालताना मला पायाला त्रास होत होता. नशिबाने चांगले शूज घातल्याने चालताना थोडा कमी त्रास झाला. इथे ऊन खूपच लागतं. त्यामुळं जमल्यास गोल हॅट (umpire सारखी) घातल्यास बऱ्यापैकी डोक्याचं, चेहऱ्याचं कव्हरेज होईल. ऊन एवढं जास्त होत की ५–७ मिनिटात आमचा थंड पाण्याने भिजवलेलं फडकं कोरडं पडलं. असे मजल दरमजल करत आम्ही एकदाचे तट परिवर्तनापर्यंत पोहोचलो. इथून आता गुजरात सरकारने बोटीऐवजी एक पूल बांधला आहे. ज्यावरून तुम्ही परत तिलकवाड्याला पोहोचता. इथे पुन्हा आम्ही रिकाम्या झालेल्या बाटलीत नर्मदा मैयाचे पाणी घेतले. आता नजरेच्या टप्प्यात वासुदेव कुटीर दिसायला लागलं होतं. मंझिल दिसत होती; पण तिथपर्यंत पोहोचायला त्रास जाणवत होता. शेवटचं १ किलोमीटर तर फारच दमछाक झाली. मारोती धाम, वासुदेव कुटीर हे एका टेकडीच्या वरच्या बाजूस असल्याने तो चढ चढताना खूप त्रास झाला; पण शेवटी एकदाचे आम्ही परिक्रमेच्या फिनीश लाईनला पोहोचलो. तिथूनच नर्मदा मैयाला साक्षात दंडवत घालून तिने आमच्याकडून परिक्रमा घडवून आणल्याबद्दल तिचे आभार मानले. आदल्या दिवशी वासुदेव कुटीरमध्ये जिथं परिक्रमेचा संकल्प केला होता, तिथे जाऊन परिक्रमा सुफळ संपूर्ण झाल्याचा संकल्प विधीवत सोडला आणि आणलेलं नर्मदा मैयाचं पाणी श्री शंकराच्या पिंडीवर सोडलं आणि नर्मदा मैयाची ओटी भरली आणि तिचे आभार मानले. आलेल्या प्रत्येक परिक्रमावासींना तिथं प्रसादाचं जेवण होतं. ते खाऊन आम्ही आमच्या homestay कडे वळलो. दुपारी तिथं आराम केला आणि रात्री पुन्हा एकतानगरहून मुंबईच्या दिशेने जाणारी ट्रेन पकडली. या पूर्ण परिक्रमेत आम्हा चौघांनाही कोणत्याही प्रकारचा त्रास झाला नाही, ही नर्मदा मैयेची कृपा. अशा प्रकारे आमची पहिली–वहिली नर्मदा परिक्रमा नाथाभाऊंच्या मार्गदर्शन आणि सहकार्यामुळं सुफळ संपूर्ण झाली.




*।। त्वदिय पाद पंकजम, नमामि देवी नर्मदे नर्मदे हर हर ।।*

**(अवर सचिव, वित्त विभाग)**

# एक प्रवास इंदोर

**अजय भोसले**

प्रवास! तुमची दृष्टी अधिक व्यापक करतो, असं म्हणतात, परंतु एका चौकटीत काम करणाऱ्या नोकरदार माणसासाठी, त्याच्या चौकटीबाहेरचं विश्व नेहमीच आव्हानात्मक असतं. याला कारण त्याला कायम पडलेले दोन प्रश्न – एक म्हणजे उपयुक्तता आणि दुसरा वेळेची सबब. अनेक वेळेला तुम्हाला कामानिमित्त बाहेर जाण्याची संधी उपलब्ध होते. त्या संधीचं सोनं केलं तर! आम्हालाही कामानिमित्त नागपूरला जाण्याची संधी मिळाली. मग काय? माझ्या मित्राने एक योजना तयार केली.

जाताना नाशिक, छत्रपती संभाजीनगर काबीज करायचं आणि नागपूर मुक्कामी रवाना व्हायचं. नागपूरच्या मुक्कामात नागपूर न्याहाळायचं. तसं नागपूरला अनेक वेळा गेलोय. आजूबाजूला पाहण्यासारखी मर्यादित स्थळं आहेत. त्यातलं जवळचं म्हणजे रामटेक. खूप आवडतं. परतीचा प्रवास नागपूर ते मुंबई साधारण ८५० किलोमीटर होता. त्याऐवजी आम्ही इंदोरमार्गे मुंबईला आलो तर काही किलोमीटर वाढणार होते, परंतु एक नवीन स्थळ पाहायला मिळणार होतं. झाली योजना तयार. नागपूर नंतर इंदोरला दोन दिवस राहायचं. आजूबाजूची स्थळं पाहायची. तेथून उज्जैन फक्त ५६ किलोमीटर आहे. ते पाहून पुन्हा इंदोर मार्गे मुंबईला रवाना व्हायचं.

माझा मित्र रायडर ग्रुपचा सदस्य आहे. त्याला बुलेटवरून भारतभ्रमणाचा दांडगा अनुभव आहे. त्याने एक परफेक्ट प्लान दिला. अजून एक मित्र होता. आम्ही तिघं निघालो. मुंबईची हद्द सोडली आणि एक वेगळाच उत्साह अंगात भिनला. प्रावासिक समाधी लागली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूची झाडं बाय-बाय करत पाठी जात होती. कसारा घाट लागला. वळणावळणातून माझा मित्र सफाईदारपणे गाडी चालवत होता. ड्रायव्हिंगचा आनंद म्हणजे काय? त्याच्या चेहऱ्यावरून निथळत होता. खूप आनंद घेत होतो आम्ही. बाजूला दुसरा मित्र वारंवार निद्रादेवीच्या आहारी जात होता. निद्रादेवीने त्याला हळुवार आपल्या बाहुपाशात घेतले होते. मी साहेबासारखा मागे बसलो होतो. लहान मुलासारखा पाठीमागे जाणारे रस्ते, माणसं, झाडं न्याहाळत होतो.

पोटोबा म्हणू लागले तुम्ही मजा करतायं, पण आमचं काय राव? परंतु त्यासाठी कुठेही उतरून खाण्यासाठी पोटावर अन्याय करणं, असं होणार नाही. नाशिकच्या मिसळनगरीत आमचा प्रवेश झाला होता. मिसळनगरीत मिसळचा पाहुणचार न घेणं आमच्या पोटोबाला आवडलं नसतं. गुगल शोध सुरू झाला. नाशिक हायवेपासून ११ किलोमीटर अंतरावर 'साधना मिसळ' हे नाव निश्चित झालं. त्या आवारात प्रवेश झाला. तिथल्या सजावटीने मन वेधून घेतलं. साध्या खाटा, खुर्च्या, नेहमीच्या वापरातील वस्तू वापरून केलेली बसण्याची व्यवस्था तसेच कल्पक प्रवेशद्वार. बैलगाडी, हत्ती, उंटही लक्ष वेधून घेत होते. एका मोठ्या हत्तीची मूर्ती प्रवेशद्वाराजवळ सगळ्यांचं स्वागत करत होती. छोट्या खेडेगावातच आल्याचा भास होत होता.

मिसळीचा सुगंध नासिकेला आव्हान देऊ लागला. पोटोबा उड्या मारू लागले. सोबत पाव किंवा भाकरीचा पर्याय होता. आम्ही भाकरीचा पर्याय दिला. जिव्हा वळवळू लागली. जास्त प्रतीक्षा करावी लागली नाही. गरमागरम मिसळ आमच्या समोर येऊन पेश झाली. आम्ही नजरेने न्याहाळत, नसिकेने सुवास घेतला. आमच्यासारख्या खवय्यांना केवळ रंग आणि सुगंध यावरून कुठल्याही पदार्थाच्या चवीचा अंदाज येतो. मिसळीच्या गुणवत्तेबाबत नजरेनेच तिघांचं एकमत झालं. आधी फोटोसेशन झालं. लगेच मुद्दाम मित्रांना फोटो पाठवून दिले. त्यांचे रिप्लाय पाहून आम्हाला आसुरी आनंद होतो. त्यानंतर बस एकच लक्ष मिसळ आणि मिसळ. पुरेपूर आस्वाद घेतला. नावाला एक कणही उरला नव्हता. मग मस्त वाफाळलेला काळा चहा घेतला. आधी करायचे ओम नमः शिवाय आता केले.

पोटमहाराज खूश होते....नवीन निर्माण ऊर्जेने मग आरामात परिसर न्याहाळू लागलो. नजर एका फलकावर स्थिरावली. चुलीवरचे आइस्क्रीम. हा काय प्रकार आहे? उत्सुकता चाळावली. चहानंतर आईस्क्रीम खायचं नाही, असले काही निकष आम्हा खवय्यांना लागू होत नाहीत. आईस्क्रीमने जिव्हेला थंडगार स्पर्श केला. अप्रतिम... एकच शब्द... सांगता पान खाऊन केली. फोटोसेशन केले आणि मग आम्ही ठरलेल्या योजनेप्रमाणे छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्याला लागलो. मिसळचं पोटवीक समाधान मनात लेऊनच. पुण्याचा सरळ रस्ता सोडून केवळ मिसळसाठी आम्ही नाशिकचा मार्ग धरला होता. आता नाशिकमार्गे छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

## छत्रपती संभाजीनगर

पुढचा प्रवास सुरू झाला. नाशिक येवला मार्गाला लागलो. येवला नाशिकपासून साधारण ८० किलोमीटरवर आहे. रस्त्याच्या दुतर्फा पैठणीची दुकानं झरझर मागे जाऊ लागली. प्रसिद्ध कापसे पैठणी इत्यादी. पैठणीचे अनेक प्रकार आहेत. मुख्य दोन. हातमागावरची व छापील. छापील पैठणी तशी हजारपासून मिळू शकते, परंतु जास्त मागणी आहे ती हातमागावरच्या पैठणींना. पाच हजारापासून काही लाखापर्यंत किंमत जाते.



रस्ता चांगला असल्यामुळे आमचा रायडर काही थांबायला तयार नव्हता. सुसाट निघाला होता. येवला मागे गेलं, आम्ही छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्याला लागलो. येवल्यापासून छत्रपती संभाजीनगर साधारण ११५ किलोमीटर आहे. छत्रपती संभाजीनगरला काय पाहायचं याची यादी आधीच केली होती. अजिंठा लेणी, वेरूळ लेणी, दौलताबाद किल्ला, घृष्णेश्वर मंदिर, पाणचक्की अशी योजना होती. तुम्ही वेरूळचा पर्याय निवडला की दौलताबादचा किल्ला, घृष्णेश्वर मंदिर, वेरूळच्या लेण्या, बीबीचा मकबरा आणि पाणचक्की ही स्थळं पाहू शकता. वेरूळ लेणी छत्रपती संभाजीनगरपासून साधारणतः ३१ किलोमीटरवर आहेत. घृष्णेश्वर मंदिर तेथूनच जवळ एक किलोमीटरवर आहे. त्यामुळे पहिल्या दिवशी ही सर्व स्थळं पाहण्याचा विचार केला होता. दौलताबाद तसं १६ किलोमीटर आहे; पण हा किल्ला खूप उंचावर आहे. त्यानंतर अन्य स्थळं म्हणजे पैठण ५६ किलोमीटर आहे. लोणार १७० किलोमीटर आहे. अजिंठ्याच्या लेण्या शहरापासून १०२ किलोमीटर अंतरावर आहेत. जर तुम्ही छत्रपती संभाजीनगरला निघाला असाल, तर तुम्हाला काही किलोमीटर जास्त प्रवास पडेल. आमच्याकडे तितका वेळ नसल्यामुळे अजिंठ्याच्या लेण्या काही पाहिल्या नाही.

वेरूळ शहर ९०० शतकांपूर्वी राष्ट्रकूट वंशाच्या राजधानीचं स्थळ होतं. त्यापूर्वी हा भाग वाकाटक लोकांच्या नियंत्रणाखाली होता. हे लोक अजिंठा कला शैलीच्या लोकांचे वंशज होते. लेण्यांचं कोरीव काम वरून खालच्या दिशेने करण्यात आलं आहे. त्यावेळच्या समाजाचे साधारण जीवनदर्शन या लेण्यातून घडते. त्यांचा पेहराव, दागिने, चालीरिती याचा काहीसा अंदाज कोरीव शिल्पावरून येतो. घृष्णेश्वर मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. दहाव्या शतकामध्ये राष्ट्रकूट वंशाचे राजा कृष्ण देवराय यांनी यांची स्थापना केली. लाल रंगाची रेती, दगड आणि प्लास्टर याने याची निर्मिती करण्यात आलेली आहे. पूजेच्या ठिकाणी शिवलिंग आहे. आतला भाग काहीसा अंधारलेला आहे. मंदिरात उघड्या देही दर्शन घेण्याची प्रथा आहे. पुरुष कमरेवरचे कपडे काढून तेथेच बाजूला टांगून ठेवत असल्यामुळे प्रसन्न वाटत नाही. इतकं अर्वाचीन मंदिर असूनही त्याची निगा नीट राखली गेलेली नाही. मंदिराचा परिसर दुकान, टपऱ्या यांनी वेढलेला आहे. मंदिराच्या आत मोबाइल घेऊन जाण्यास परवानगी नाही. तिथे बाहेर मोबाइल ठेवण्याचे पाच रुपये घेतात. आतला भाग अंधारलेला असल्यामुळे प्रसन्नता जाणवत नाही. यामुळे आम्ही तिथून लगेच बाहेर निघालो. त्यानंतर रस्त्यात एक मंदिर लागतं. ज्यास लक्ष विनायक मंदिर म्हणतात. येथे गणपतीची एक विशाल मूर्ती आहे.

आम्हाला पाणचक्कीची फार उत्सुकता होती. मी त्याच्याबद्दल ऐकलेल्या गोष्टीवरून वेगळं चित्र मनात होतं, परंतु प्रत्यक्ष पाहिलं तेव्हा असं काही आढळत नाही. साधारण बांधकाम होतं. त्याची माहिती मिळाली ती अशी की, येथे जमिनीच्या खालून एक जलमार्ग गेला आहे. शहरापासून आठ किलोमीटर उत्तरेकडे पहाडात तो निघतो. १६४० मध्ये त्याच्या नालीचे बांधकाम सुरू झाले होते आणि साधारण १७४४ पर्यंत बांधकाम पूर्ण झाले. पूर्ण बांधकाम मातीचं आहे. दोन स्तंभ नैसर्गिक पंपाचं काम करतात. जेणेकरून आठ किलोमीटर मार्गात पाणी वेगाने पुढे जाऊ नये. सायफन पद्धतीने पाणी धबधब्याच्या स्वरूपात खालच्या मोठ्या हौदात पडतं. त्याची खोली बारा फूट आहे. येथे आजूबाजूचा परिसर तितकासा रमणीय नाही.



तेथून जवळच बीबीचा मकबरा आहे. ताजमहालची छोटी प्रतिकृतीच. या महालात औरंगजेबाने त्याची पत्नी राबिया दुर्रानीसाठी कबर बांधली आहे. *(मकबरा १६७९ मध्ये शहजादा आजम शहा याने आईच्या स्मरणार्थ बनविल आहे.)* ती इराणमधील राजाची मुलगी होती. औरंगजेबाने या बांधकामासाठी मोजकीच रक्कम मंजूर केली होती. त्यामुळे त्याची जी प्रतिकृती तयार झाली आहे, ती ताजमहालची केविलवाणी प्रतिकृती वाटते. आम्ही गेलो तेव्हा समोरच्या हौदात कारंजे, पाणी वगैरे काही दिसत नव्हते. सर्व भाग तसा शुष्क वाटत होता. अनेक गोष्टी करणे शक्य असताना अशा ठिकाणांचा परिसर सुंदर, रमणीय का करण्यात येत नाही, हे अनाकलनीय आहे. येथे आजूबाजूच्या परिसरात तुम्ही एक चांगली बाग तयार करू शकता. वाचनालयात करू शकता, अशाप्रकारे लोकांचं आकर्षण वाढू शकतं.

छत्रपती संभाजीनगरचं स्थनिक खाद्यवैशिष्ट्य शोधताना मात्र निराशा झाली. शहरात जवळजवळ ५२ प्रवेशद्वार आहेत. काही अजून चांगल्या स्थितीत आहेत. शहरात मोगली शासकांच्या खुणा जागोजागी आढळतात. हिंदीचा प्रभाव जास्त आढळतो. स्थानिक लोकांशी संपर्क कमी आल्यामुळे स्थानिक संस्कृती पाहता आली नाही. इतिहासात हे महत्त्वाचं ठिकाण होतं. त्यामुळे इतिहासाच्या अनेक खुणा हे शहर जपत आहे. छत्रपती संभाजीनगरच्या लेणीच बघायला कित्येक दिवस लागू शकतात. नाइलाजाने आम्ही पुढच्या मार्गाला लागलो.

## नागपूर

छत्रपती संभाजीनगरला आम्ही स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ हुंगत होतो. जसं नागपूरचं सावजी, नाशिकची मिसळ, परंतु येथे निराशा झाली. असं असलं तरी नागपूरला निघताना छत्रपती संभाजीनगर येथे भरपेट नाष्टा करून मार्गस्थ व्हा कारण पुढचा मार्ग ४५० किलोमीटर आहे. रस्त्याच्या बाजूला अभावानेच हॉटेल किंवा नाष्ट्याची दुकानं दिसत असली तरी दर्जा साधारण आहे.

रस्ते अत्यंत वाईट आहेत. खड्डेयुक्त. शुष्कपणा, संथपणा, तटस्थता वातावरणात भरून राहिले आहे. अमरावती रोडला



लागल्यावर थोडं बरं वाटतं आणि मग अमरावतीचं बदललेलं स्वरूप पाहत केव्हा नागपूरला पोहोचलो हे कळलंच नाही. नागपूरला बऱ्याच वर्षांनी आलो होतो. आता खूप बदल जाणवत होता. अनेक नवीन इमारती उभ्या राहिल्या होत्या. चकचकीत हॉटेल्स दिसत होती. मोठे रस्ते, ब्रिज यांनी नागपूरची नावीन्यपूर्ण गुंफण आकार घेत होती. मेट्रोचं बांधकाम चालू असल्यामुळे खड्डे, धूळ यांनी परिसर व्यापून गेला होता. बरंच काही बदललेलं होतं.

नागपूर तसं ३०० वर्षांपूर्वीचं शहर. गोंड राजा बख्त बुलंद शहा याने सतराशे सतराव्या शतकात नाग नदीच्या काठावर या शहराची स्थापना केली. त्यानंतर १७४२ मध्ये रघुजीराव भोसले नागपूरच्या गादीवर आले. नागपूर भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती ठिकाण आहे. शून्य मैलाचा दगड येथे आहे. भारताचा केंद्रबिंदू.

नागपूरचं उच्चतम तापमान ४५ डिग्रीपर्यंत जातं. तर कमीत कमी तापमान कधीकधी १० डिग्रीच्या खाली जातं. नागपूरमध्ये ठळकपणे पाहण्यासारखी ठिकाणं म्हणजे दीक्षाभूमी जे शहरात आहे, कोराडी देवीचं मंदिर नागपूरपासून १४ किलोमीटर अंतरावर आहे. पेंच ७५ किलोमीटर अंतरावर आहे. माझं सर्वात आवडतं ठिकाण म्हणजे रामटेक. ते ५० किलोमीटर अंतरावर आहे. रामटेकचं मंदिर खूप सुंदर आहे, परंतु येथे माकडांबाबत विशेष काळजी घ्यावी लागते. तुमच्या हातात जे दिसेल ते ओढून नेतात. नवीन झालेलं स्वामीनारायण मंदिरही पाहण्यासारखं आहे. या मंदिरात अनेक भाषेतील धार्मिक पुस्तकं आहेत. मात्र मराठीतील नाहीत. राज्याच्या उपराजधानीत असूनही. येथेही हिंदीची ओढ जास्त दिसली.

छत्रपती संभाजीनगरने खाण्याच्या बाबतीत निराशा केली होती, परंतु नागपूरला सावजी जेवण, पोहे रस्सा, आलुबोंडा असे वेगवेगळे पदार्थ चाखायला मिळतात. सावजीचा आस्वाद मी पूर्वी घेतला आहे खूप तिखट जाळ असल्यामुळे त्याच्यापासून चार हात लांबच राहतो. पूर्ण थाळीचा आस्वाद घ्यायचा असेल तर हलदीराम आहे. थाळी विविध व्यंजनांनी भरलेली असते. तुम्हाला पुरेशी भूक लागली असल्याशिवाय थाळी मागवणे धाडसाचे ठरेल. दुसरे म्हणजे दीक्षाभूमीजवळील 'विष्णुजी की रसोई' येथे ग्रामीण पार्श्वभूमीवर केलेली सजावट, गरमगरम वेगवेगळे पदार्थ मन आणि जिव्हा आकर्षून घेतात. ही दोन्ही खाद्यगृहं तशी महागडी आहेत. तुम्हाला त्यातल्यात्यात चांगल्या दर्जाचे खाद्यगृह हवे असेल, तर गायत्री भोजनालय आहे. पूर्वी साधी खाणावळ असलेली ही जागा आता बरीच विकसित झाली आहे.

नागपूरचं सर्वात प्रसिद्ध काय? ती म्हणजे संत्रा बर्फी. तीही हल्दीरामची. मावा संत्रा बर्फीपेक्षा हल्दीरामची द्रोणात मिळणारी संत्रा बर्फी खूप प्रसिद्ध आहे .मला वाटतं लोक सर्वात जास्त गोष्ट नागपूर वरून नेत असतील तर ती म्हणजे संत्रा बर्फी. तशी आता बरीच नवीन हॉटेल्स सुरू झाली आहेत. त्यातील एमटीडीसीचं ऑरेंज होटेलही छान आहे.

तुमच्याकडे पुरेसा वेळ असेल, तर मध्यप्रदेशातील भेडाघाट, पंचमढी, पेंच ही साधारण २५० किलोमीटर अंतरावरील ठिकाणं तुम्ही पाहू शकता. ही सर्व ठिकाणं यापूर्वी अनेक वेळा पाहिली असल्यामुळे नागपूरचं काम आटपून आता आम्ही पुढच्या योजनेची तयारी करत होतो. आमची पुढची योजना भन्नाट होती. नागपूर ते मुंबई हा प्रवास साधारण ८५० किलोमीटरचा आहे. मग आम्ही ठरवलं पुढे ४५० किलोमीटर इंदोरला जाऊन तेथून मुंबईला यायचं. त्याने काही किलोमीटरचं अंतर वाढणार होतं, परंतु एक नवीन स्थळ पाहण्याचा आनंद मिळणार होता.

## इंदोर

आम्ही बैतूलमार्गे इंदोरला निघालो. रस्ता एकदम मख्खन होता. त्यामुळे गाडी वाऱ्याशी स्पर्धा करू लागली. महाराष्ट्रातील रस्त्यांची तुलना होऊ लागली. नागपूरची हद्द सोडली आणि मध्य प्रदेश सुरू झाले. सीमा बदलल्यामुळे नेमका काय बदल होतो हे कित्येक किलोमीटर पुढे गेल्याशिवाय कळत नाही. सगळं सारखं वाटतं. शेवटी सीमा मानवानेच निर्माण केलेली आहे. रस्ता जसा सरसर मागे जाऊ लागला, तसे पोटोबा धडधड उड्या मारू लागले. आता येथेही आम्ही एक चूक केली होती, नागपुरात नाष्टा न करण्याची. या रस्त्यावर आजूबाजूला विशेष अशी काही हॉटेल्स, धाबे दिसत नव्हते. जवळजवळ १६० किलोमीटर पुढे आल्यावर मला एक फलक दिसला. बालाजीपुरम् मंदिर. मनात विचार आला मंदिर आहे म्हणजे आजूबाजूला चांगलं खाण्याचं ठिकाणही असेल. मनात विचार येईपर्यंत माझा रायडर मित्र सुसाट पुढे निघाला होता. सुदैवाने पुढे एक मंदिराकडे जाणारा रस्ता होता. आम्ही त्या रस्त्याने मग बालाजीपुरमच्या मार्गाला लागलो. हायवेपासून एक दीड किलोमीटर आत मंदिर आहे. मंदिर पाहताच मन प्रसन्न झालं. त्याचबरोबर आजूबाजूच्या खाद्यपदार्थांचा सुगंध नाकात शिरला. त्यावरून ओळखलं की, येथे काहीतरी खास खायला मिळणार. आधी पोटोबा मग विठोबा. मसाला डोसा, समोसे... चव काही वेगळीच होती. हिंगाचा हलकासा गंध जिभेवर रेंगाळत होता.

सपाटून भूक लागल्यामुळे नाष्टा सपाटून केला. काळा चहा झाल्यानंतर मग आम्ही तृप्त मनाने मंदिराच्या आवारात प्रवेश केला. अप्रतिम परिसर होता. कमालीची स्वच्छता. प्रसाधनगृह अगदी घरच्यासारखं स्वच्छ होतं. पूर्ण परिसर पाहताच मन खूप प्रसन्न झालं. फोटोसेशन झालं. मंदिराच्या आवारात चित्रकूट वसवलेले आहे, परंतु ते पाहण्यास बराच वेळ गेला असता त्यामुळे मंदिराचा परिसर पाहून तृप्त मनाने आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.

बालाजीपुरम्‌वरून मग पुढचा प्रवास सुरू झाला. प्रसन्न मनाने पुढे निघालो. काही किलोमीटर पुढे गेल्यावर सरळ रस्ता मागे पडून नागमोडी वळणाचे जंगल लागले. रस्त्याचं काम चालू होतं. येथे आमच्या प्रवासाचा वेग मंदावला. हे जंगल पार करून आम्ही काही किलोमीटरनंतर नर्मदेच्या काठावर पोहोचलो. नर्मदेच्या उदरातून डोकावणारं एक मंदिर दिसू लागलं. ओंकारेश्वर एक प्राचीन मंदिर आहे, परंतु स्वच्छतेचा अभाव होता.



ओंकारेश्वर मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. नर्मदा नदीच्या तीरावर हे मंदिर वसलेलं आहे. या नदीला रेवा असेही म्हणतात. नर्मदा नदी म्हणजे मध्य प्रदेश आणि गुजरात राज्याची जीवनवाहिनी आहे. हा सर्व भाग मध्य प्रदेश खांडवा जिल्ह्यात येतो. बालाजीपुरमपासून साधारण अंतर अडीशे किलोमीटर होतं. ओंकारेश्वर म्हणजे ओमचा निर्माता, विधाता ज्याने ओम साकार केला आहे. मंदिर छोट्या बेटावर वसलेलं आहे. या बेटाचा आकार ओमसारखा आहे असे म्हणतात. दुसरं जवळचं मंदिर म्हणजे अमरेश्वर मंदिर.

स्वच्छतेच्या अभावामुळे या प्राचीन मंदिरांचा आनंद उपभोगता येत नाही. कधीकधी माणसाच्या श्रद्धांची मजा वाटते. त्यांची इतकी श्रद्धा असते देवावर, परंतु स्वच्छतेशी त्यांचं काय वावडं असतं हे काही कळत नाही. असो. नर्मदेच्या काठावरून निघालो इंदोरला मार्गस्थ होण्यासाठी. इंदोर तेथून १०० कि.मी. आहे. प्रवास सुरू झाला.

आमचा रायडर गुगलच्या प्रमाणकानुसार मस्त मस्तीत गाडी हाकत होता. इंदोर जवळ येताच गुगल महाशयांनी एक वळणाचा रस्ता दाखवला. आमचे रायडर लगेच आज्ञा प्रमाण मानून घुसले. आतला रस्ता अरुंद होता. मुख्य रस्ता सोडून आम्ही आडमार्गाला लागलो होतो. कसेबसे इंदोरच्या मुख्य रस्त्याला हळूहळू आलो.

इंदोरच्या हद्दीत प्रवेश केला. कमालीची स्वच्छता. रुंद रस्ते. आखीवरेखीवपणा नजरेत भरत होता. इंदोरचा भाग माळवा प्रांतात येतो. समुद्रसपाटीपासून साधारण १८०० फूट उंचीवर हे शहर आहे. भोपाळ २०० किलोमीटर अंतरावर, तर उज्जैन ५५ किलोमीटर अंतरावर आहे. इंदोर हे शहर १६व्या शतकापासून व्यापारी केंद्र म्हणून उदयास आलं. १७व्या शतकात हा भाग मराठा साम्राज्याच्या अधिपत्याखाली आला. इंदोरला स्वच्छ शहराचा मान सतत तीन वर्षे मिळाला आहे. १८व्या शतकात ब्रिटिश अंमल सुरू झाला. होळकरांनी नियोजनबद्धरीत्या या शहराचा विकास केला. त्याच्या खुणा जागोजागी आढळतात.

आम्ही मुख्य शहरात प्रवेश केला. आमच्या हॉटेलजवळ आलो. होटेल्स तशी रेल्वेमार्ग तथा एअरपोर्टपासून जवळच आहेत. fab मालिकेतील हॉटेल बुक केले होते. तुम्हाला ऑनलाइनवर fab,ohiyo या विविध प्रकारातील हॉटेल उपलब्ध असतात. मध्यम रेंज करता fab ची होटेल्स चांगली आहेत. हॉटेलचे सोपस्कार उरकून थेट गादीवर अंग टाकले.

सात वाजले असावेत आणि आम्हाला नऊ वाजता खाऊगल्लीत जायचं होतं. त्यासाठी आमची पूर्वतयारी सुरू होती. खाऊगल्लीत जायचं असल्यामुळे सकाळपासून जास्त काही न खाण्याची दक्षता आम्ही आधीच घेतली होती. ही खाऊगल्ली एका सराफा बाजारात आहे. तेथे सर्वत्र ज्वेलर्सची दुकानं आहेत. ही दुकानं रात्री नऊ वाजता बंद होतात आणि त्याच्या बाहेर मग विविध खाद्यपदार्थांची रेलचेल सुरू होते. एकप्रकारची जत्राच असते. आम्ही या गल्लीच्या बाहेरून दोन वेळा गेलो. गल्लीच्या बाहेर शांतता होती. आत एखादी खाऊगल्ली असेल याचा अंदाजही बाहेरून येत नव्हता. एक-दोघांना विचारल्यावर मग आत शिरलो. बाहेर नीरव शांतता आत उत्सवाचे वातावरण. गर्दी एवढी की, माणसे एकमेकांना खेटून जात होती.

विविध खाद्यपदार्थांचे सुगंध नाकात शिरत होते. त्यांचे रंग डोळ्यांना खुणावत होते. आम्ही सैरभैर झालो होतो. सुरुवात कुठून करायची. पाणीपुरीने, रगडापॅटीसने, पोह्याने? कशाने? काही सुचत नव्हतं. भूक कडाडून लागली होती. काठीला वर्तुळाकार लपेटलेल्या लाल चुटूक बटाट्यांच्या तळलेल्या चकत्यांचा फडशा आम्ही प्रथम पाडला. मग प्रसिद्ध जोशी दहीवडा हुडकत निघालो. तो काही अंतरावर होता. यु-ट्यूबवर त्याचे कसब पाहिले होते. दहीवडे हवेत उडवत

होता आणि चिमटीतून मसाले हळुवार दहीवड्यावर पसरवत होता. आम्ही मनोसक्त दहीवडे खाल्ले. मग पाणीपुरी, बुट्टे का कीस अशा विविध पदार्थांचा आस्वाद घेत हळूहळू पुढे सरकत होतो. नवीन काही पाहायला मिळतं का म्हणून बघत होतो. आम्हाला फ्रुट शॉट हा प्रकर नजरेस आला. त्याचे रंग लक्ष वेधून घेत होते. अफलातून होता हा प्रकार. फळाचा रस वाटत होता. ज्यूसपेक्षा वेगळा प्रकार आहे. फळांचा गडद रस म्हणता येईल. जणू फळच पितोय असं वाटत होतं. आम्ही जांभूळं, पेरू असे दोन चार प्रकारचे फ्रुट शॉट घेतले. आधी म्हटल्याप्रमाणे ज्यूस थंड नंतर चहा पिऊ नये, असं आम्हा खवय्यांना काही बंधन नसल्यामुळे चहाचा शोध सुरू केला. शेवटी शोधला आम्ही काळा चहा. काळा चहा घेतला आणि मग आम्ही तृप्त मनाने परत हॉटेलला परतलो. दुसऱ्या दिवसाचं नियोजन करायचं होतं त्यासाठी.






दुसऱ्या दिवसाच्या योजनेवर गहन चिंतन सुरू झालं. प्रथम इंदोर शहर पाहावं की उज्जैनला जावं, असा थोडा गोंधळ होता. उज्जैन ५५ किलोमीटर अंतरावर आहे आणि रस्ताही खूप चांगला आहे. आम्हाला जी स्थळं पाहायची होती, त्यातील मुख्य म्हणजे महाकालेश्वर मंदिर आणि दुसरे म्हणजे कालभैरव मंदिर. सांदीपनीमुनींचा आश्रम, इस्कॉन अशी सर्व स्थळं जवळ जवळच आहेत. त्यामुळे ती पाहून मग दुपारी इंदोरला येण्याचं निश्चित झालं. त्यानंर इंदोरमधील राजवाडा पॅलेस, कपड्याचे मार्केट वगैरे पाहण्याचं ठरलं.

उज्जैन हे मंदिरांचं शहर आहे. दर बारा वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो. हा भागसुद्धा माळवा प्रांतात येतो. शिप्रा नदीच्या काठावर हे छोटं शहर वसलेलं आहे. शहराचा इतिहास खूप जुना आहे. १२व्या शतकात दिल्लीच्या सुलतानाने या शहराचा विध्वंस केला होता. १७व्या शतकात राजपूत राजा जयसिंग याने येथे जंतरमंतर बांधलं आहे. १८व्या शतकात हा भाग मराठा सरदार शिंदे यांच्या अधिपत्याखाली आला. शिंदे घराण्याने या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. तिसऱ्या पानिपत युद्धानंतर मराठी साम्राज्य उत्तरेत काहीकाळ दुबळं झालं होतं. महादजी शिंदे यांनी महाकालेश्वराला कौल मागितला होता. हळूहळू उत्तरेत मराठी साम्राज्य स्थिर होऊ लागलं त्याची परतफेड म्हणून या मंदिराचा महादजी शिंदे यांनी जीर्णोद्धार केला. महाकालेश्वर मंदिर दक्षिण मुखी आहे, मग दक्षिण दिशा अशुभ का मानली जाते हा प्रश्न मला पडतो.

आम्ही उज्जैनला निघालो. उज्जैन शहरात शिरण्याआधी एक सुंदर कमान तुमचं स्वागत करते. रस्ता चांगला असल्यामुळे तासा–दीड तासातच आम्ही पोहोचलो. प्रथम नवीनच बांधलेल्या इस्कॉन मंदिराकडे वळलो. त्याची रचना इतर इस्कॉन मंदिरांप्रमाणे पांढऱ्या शुभ्र दगडापर्यंतच आहे. काही खरेदी करुन मग महाकालेश्वर मंदिराकडे निघालो. येथे जाणं म्हणजे जंतर–मंतर सारखंच आहे. कुठून आत जायचं पटकन् समजत नाही. वरच्या भागात पार्किंगची सोय आहे, परंतु तिथे जायचं कसं याची माहिती कुणीही नीट देत नव्हतं. शेवटी आम्ही गाडी लांब पार्क करून आवारात शिरलो, परंतु गोंधळ होता. मोबाइल आत न्यायला परवानगी नव्हती. शेवटी लांबूनच दर्शन घेऊन आम्ही निघालो.

तेथून जवळच कालभैरव मंदिर आहे. मंदिर तसं छोटंसंच आहे. मराठी स्थापत्यकलेचा त्यावर प्रभाव दिसतो. येथे एक प्रथा विचित्र आहे. येथे कालभैरवाला प्रसाद म्हणून दारू देण्यात येते. मी काही दारू घेतली नाही. खूप गर्दी होती. नीट दर्शन घेता आलं नाही. कसाबसा बाहेर निघालो. कालभैरवाच्या बाजूला एक गणेशाची सुंदरशी मूर्ती आहे आणि बाहेर एक

दत्ताचे मंदिर आहे.

तेथून बाहेर पडून आम्ही मग सांदीपनी मुनींच्या आश्रमात प्रवेश केला. छोटासाच परिसर आहे, परंतु शांतता, साधेपणा मनाला भावतो. येथे जवळच चिंतामण गणेश मंदिर आहे. चिंतामण गणेश मंदिर फार पुरातन मंदिर आहे आणि तेथे गणपतीची एक मोठी मूर्ती आहे. ही मूर्ती स्वयंभू असल्याचे म्हटले जाते. मंदिरांचे दर्शन घेऊन मग आम्ही दुपारच्या वेळेस इंदोरच्या दिशेने निघालो.



इंदोर ज्यासाठी प्रसिद्ध आहे ती ठिकाणं म्हणजे खादाडी, गारमेंट्स, ज्वेलरी आणि मंदिरं, राजवाडा. भटक्या लोकांना हवा तो पर्याय उपलब्ध आहे. इंदोरमध्ये प्रथम बघायचं काय तर... पहिलं नाव येतं होळकरांचा राजवाडा.....शहराच्या मध्यवर्ती भागातच आहे. आजूबाजूला मुख्यतः कपड्यांची आणि विविध दुकानं वसलेली आहेत. राजवाडा जुना असला, तरी उत्तम स्थितीत ठेवण्यात आलेला आहे. राजवाड्याच्या पहिल्या मळ्यावर जुनी भांडी, शस्त्रे वगैरे पाहावयास मिळतात. हा राजवाडा मराठी वास्तुकलेचा प्रभाव असलेला वाटतो. खरंतर अशा वास्तूंच्या आजूबाजूला काही एकरातील जागा शासनाने ताब्यात घेऊन ती विकसित केली पाहिजे. असे न केल्यामुळे अशा अनेक प्राचीन ठिकाणी या जागांना छोट्या छोट्या दुकानांनी वेढले आहे. अशा जागा विस्कळीतपणात भर घालतात. येथील कापड बाजार माहेश्वरी आणि चंदेरी साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. आम्ही येथे जवळजवळ दोन तास पायी रपेट केली. प्रत्यक्ष संस्कृती बघण्यात वेगळीच मजा असते. लोक पट्टीचे खवय्ये. खाण्यात नाहीतर खरेदीत गुंतलेले. महिलावर्गही मोकळेपणाने फिरत होता. वातावरण कायम उत्साहाने भारलेलं असतं.

राजवाड्यापासून गणेश मंदिर जवळच आहे. १९३४ मध्ये अस्तित्वात आलेला यशवंत क्लब हा १४ एकरात पसरलेला आहे. आता तो सर्वांसाठी खुला करण्यात आला आहे. अशी अनेक छोटी-मोठी स्थळं आजूबाजूला आहेत. सगळंच पाहणं शक्य नव्हतं. रात्री ५६ दुकान या ठिकाणी जायचं होतं. ५६ भोग म्हणतात तसे येथे विविध खाद्यपदार्थांची रेलचेल आहे. जॉनी हॉट डॉग, चाट, पोहा जिलेबी असं बरंच काही. इंदोरी लोक पक्के खवय्ये आहेत. रात्री आम्ही ५६ दुकानी भरपूर खादाडी केली. तृप्त मनानं रात्रीचं इंदोर पाहिले... दुसऱ्या दिवशी मुंबईला निघायचं होतं. परतीच्या रस्त्यावर मांडू आहे. हे किल्ल्यांचं शहर करता आलं असतं, परंतु तिथला रस्ता तितकासा काही चांगला नव्हता, तसंच वेळ कमी असल्यामुळे मग आम्ही नाइलाजाने मुंबईच्या मार्गाला लागलो, हृदयात आणि जिभेवर गोड आठवणी रेंगाळत ठेवून....




**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)**

# मेळघाटावरील मोहर

**प्रशांत साजणीकर**

अमरावती जिल्ह्यातील धारणी तालुक्यातलं बैरागड हे गाव. १९८५ सालच्या फेब्रुवारी महिन्यात डॉ. रवींद्र कोल्हे नावाचा एक ध्येयवेडा तरुण एका रात्री एस.टी.ने तिथे उतरला, तेव्हा गावात ओळखीचं असं कोणीच नव्हतं. सोबतीला हजार रुपयांचा किराणा, अंथरूणपांघरुण, तीन खोकी औषध, एम.बी.बी.एस.ची पदवी आणि ध्येयासक्त मन. गरिबातल्या गरीब माणसाची सेवा करण्यासाठी दारिद्र्य, अज्ञान आणि आजारांनी ग्रासलेलं असं हे बैरागड गाव त्याने निवडलं होतं. आरोग्याच्या कोणत्याही सुविधा नसलेल्या या गावात त्याचं कसं स्वागत होईल हे त्याला माहीत नव्हतं. त्याच्यावर विश्वास ठेवून लोक उपचाराला येतील का, हेही माहीत नव्हतं. गावात पोहोचल्यावर एका घरी मुक्कामाची सोय झाली. दुसऱ्या दिवशी कुतूहलापोटी चारपाच माणसं गोळा झाली. रवीकडची औषधं पाहून गावकरी चकित झाले.




गावातल्या डॉक्टरकडे म्हणजे जनस्वास्थ्य रक्षकाकडे दोन चार गोळ्या असायच्या तोच त्या आलटून पालटून देत असे. भगत आणि जादूटोणा यावरच विश्वास असलेल्या गावकऱ्यांचा आपल्यावर विश्वास बसेल का याची रवीला चिंता होती. पहिला पेशंट मुलगी होती. थंडी वाजून ताप आल्याने गावातल्या डॉक्टरने गोळ्या दिल्या तर तिला उलट्या सुरू झालेल्या, रवीनं पाहिलं तर तिला गोळ्यांनी पित्त झालेलं. एक जेलुसिलची गोळी चघळायला दिली; पण तिच्या वडिलांनी सलाईन लावायचा आग्रह धरला. पैशाची चिंता नको असंही सांगितलं. कारण नुसत्या उलट्या होऊन माणसं दगावलेली त्याने पाहिलं होतं. किमान इंजेक्शन द्या, असे तो सांगत राहिला; पण रवीने १५ मिनिटे वाट बघा, नाहीतर सलाईन लावतो असं सांगितलं. नंतर अर्धा तास झाला तरी उलटी झाली नाही. शिवाय डॉक्टरची फी केवळ एक रुपया. एवढ्या कमी पैशात काम झालं, ही बातमी चमत्कार झाल्यासारखी गावात पसरली आणि रवीकडे रुग्ण यायला लागले. अनेक प्रकारचे रुग्ण, साधा ताप, डांग्या खोकलापासून ते अत्यंत गंभीर आजार झालेले. सुरुंगाचा स्फोट होऊन हाताच्या चिंधड्या झालेले, शेतकाम करताना जखमी झालेले. येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला रवी यथाशक्ती उपचार करत राहिला; पण अजून बाळंतपणामध्ये होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण अधिक असूनही बाळंतपणाच्या केसेस येत नव्हत्या, परंतु एका आदिवासी महिलेचं अवघड बाळंतपण अवघ्या १५५ रुपयात केल्यावर मात्र याप्रकारच्या केसेससुद्धा त्यांच्याकडे यायला लागल्या. हळूहळू गावकऱ्यांचा डॉक्टरांवर विश्वास बसला आणि डॉक्टरांनी बैरागडलाच आपली कर्मभूमी मानले; परंतु हा सगळा प्रवास एवढा सोपा नव्हता. अनेक अडचणींचा सामना करत तिथल्या मातीशी एकरूप होऊन तिथल्या सामान्यातल्या सामान्य आदिवासीप्रमाणे जीवन अंगीकारून ते आपलं काम करत राहिले.

त्यांना साथ लाभली ती त्यांच्या विलक्षण अशा जोडीदाराची! डॉ. रवीच्या भावी पत्नीकडून चार अपेक्षा होत्या. महिना ४०० रुपयांत घर चालवणे, एका वेळी ४० कि.मी. चालण्याची तयारी असणे *(कारण पावसाळ्यात एस.टी.ने जायला सर्वात जवळचं असणारं धारणी गाव ४० किमी अंतरावर होतं)*, पाच रुपयात लग्न करायला तयार असणे *(नोंदणी पद्धतीने विवाह)* आणि स्वतःसाठी नव्हे, तर इतरांसाठी भीक मागण्याची तयारी ठेवणे. असल्या अटी मान्य करून स्मिताताई लग्नाला तयार झाल्या आणि बैरागडला त्यांचा लोकविलक्षण असा संसार सुरू झाला. घर म्हणजे छोटी झोपडी. सरपण गोळा करून चूल पेटवायची, शेण गोळा करून घर सारवणे, विहिरीवरून पाणी आणणे, वीज नाही फोन नाही. हे सगळं करत असताना स्वत: होमिओपॅथी डॉक्टर असलेल्या स्मिताताई रुग्ण तपासायला डॉक्टरांनाही मदत करू लागल्या. पावसाळ्यात घरात साप, विंचू निघायचे. प्रथम प्रचंड भीती वाटायची; पण हळूहळू तेही सवयीचे झाले. एकदा रात्री वांग्याची भाजी केली, तर त्यात चुकून एक बेडूक पडून तो शिजला गेला. असलेही अनुभव आले. घराला मदत व्हावी म्हणून डोक्यावर दूध, दही घेऊन गावात विकण्याचा व्यवसायही केला, डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून त्या अनेक समाजकार्यात हिरिरीने सहभागी झाल्या. गावातल्या अनेक अनिष्ट प्रथा, स्त्रियांचे हक्क यांविषयी आवाज उठवला. ग्रामपंचायतीची निवडणूक लढवून निवडूनही आल्या. अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. हे सगळं करत असताना कधी त्यांना गावगुंडांचा सामना करावा लागला, कधी प्रस्थापित लोकांचा रोष ओढवून घ्यावा लागला, अगदी तुरुंगवासही भोगावा लागला; पण या सगळ्यातून त्या तावूनसुलाखून तेजस्वीपणे बाहेर पडल्या. डॉ. स्मिता कोल्हे यांचंही काम तितकंच महत्त्वपूर्ण आहे. नितीन गडकरी त्यांना बहीण मानतात. मंत्री असताना त्यांनी रुग्णालयासाठी इमारत बांधून द्यायचे कबूल केले, परंतु स्मितातार्इंनी गावात यायला रस्ते बांधून देण्याची मागणी केली. अनेक अडचणी असूनही तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री गडकरी यांनी धडाडीने ते काम पूर्ण केलं.

रुग्णसेवा करताना डॉक्टरांनी छोटीशी शेती विकत घेऊन त्यात शास्त्रीय पद्धतीने शेती करून किफायतशीर शेती करता येते, हे गावकऱ्यांना दाखवून दिले. पुढे गावाजवळच एक शेती खरेदी करताना त्यांना गावकऱ्यांकडून काही कटू अनुभवदेखील आले. एक आव्हान म्हणून त्यांनी शिधावाटप केंद्रदेखील चालवायला घेतले आणि ते अत्यंत सचोटीने आणि यशस्वीपणे चालवून दाखवले. वीटभट्टीचा व्यवसाय करून पाहिला. त्यात माणसांच्या स्वार्थी स्वभावाचे अनुभव घेतले.

या प्रवासात प्रशासकीय यंत्रणेचे जसे काही कटू अनुभव आले; तसेच आयुक्त प्रभाकरन् किंवा तत्कालीन जिल्हाधिकारी प्रवीण परदेशी यांच्यासारखे कार्यक्षम अधिकारीदेखील भेटले.

जिल्हाधिकारी असताना बैरागडला जाण्यासाठी रस्ता नसल्याने मध्यरात्री किर्र झाडीतून वाटचाल करत श्री. परदेशी पहाटे गावात पोहोचले. बैरागडला येणारे ते पहिले अधिकारी. त्यांनी तिथल्या लोकांच्या अडचणी समजून घेतल्या आणि कामचुकार अधिकाऱ्यांना धारेवर धरून कामांना गती दिल्याने तिथे गावांना जोडणारे रस्ते झाले. त्यांनी मेळघाटातल्या खेड्यांना भेटी देऊन बैठका घ्यायला सुरुवात केली.

लोकांचे प्रश्न त्यांच्यापर्यंत पोहोचू लागले. कार्यक्षम अधिकाऱ्यांची इच्छाशक्ती असेल, तर विकासाच्या कामाला कशी गती मिळू शकते, याचे हे उदाहरण... कुपोषणासारख्या गंभीर प्रश्नाकडे डॉक्टरांनी प्रशासनाचे लक्ष वेधून अनेक सूचना केल्या. त्याचा सकारात्मक परिणाम पाहायला मिळाला. तरुणांसाठी शेती, आरोग्य अशी विविध विषयांची शिबिरे आयोजित करून तरुणाईला मार्गदर्शन करण्याचे काम डॉक्टर करत आहेत.

डॉ. रवींद्र आणि स्मिता कोल्हे यांनी अशी कोणती संस्था आहे जी काढली नाही. इथला माणूस आणि त्याच्या जगण्याच्या पद्धती समजून घेतल्या, त्याचे सुख-दु:ख, अडीअडचणी समजून घेताना त्याच्यात आणि आपल्यात अंतर पडू दिलं नाही, गावातल्या गरिबातल्या गरीब माणसाला न्याय मिळावा, यासाठी कोणाचीही तमा न बाळगता प्रयत्न केले. गावकारण करताना अनेक वादात ते ओढले गेल्याने त्यांना मनस्ताप सहन करावा लागला.

ही विलक्षण प्रेरणादायी गोष्ट मृणालिनी चितळे यांनी त्यांच्या 'मेळघाटावरील मोहर' या पुस्तकात शब्दबद्ध केली आहे. स्मितातार्इंना 'बाया कर्वे पुरस्कार' मिळाल्याच्या निमित्ताने त्यांची स्मितातार्इंशी ओळख झाली. नंतर बैरागडला जाऊन त्यांची भेट घेतल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, या दोघांच्या कामाचा आवाका लक्षात घेता यावर पुस्तक लिहिणे गरजेचे आहे. हे पुस्तक लिहितानाही कोल्हे दाम्पत्याशी संपर्क साधणे हे खूप अवघड होते. कारण त्या दुर्गम भागात अनेक दिवस फोन लागत नसे. पत्र वेळेवर पोहोचत नसे. अशा अनेक अडचणींवर मात करून हे पुस्तक पूर्ण झाले. त्यामुळे या लोककुटुंबाची ओळख महाराष्ट्राला झाली. अत्यंत ओघवत्या भाषेत लिहिलेले हे पुस्तक वाचायला घेतले की, खाली ठेवावेसे वाटत नाही. आपल्या राज्यामध्ये दुर्गम आदिवासी भागात लोक कसे जगत आहेत. त्यांच्या समस्या काय आहेत, त्याच वेळी डॉ. कोल्हे यांनी अत्यंत नि:स्वार्थ भावनेने केलेले काम जाणून घेण्यासाठी आवर्जून वाचावे, असे हे पुस्तक!

**(सहसचिव व सहव्यवस्थापक संचालक, फिल्मसिटी, महाराष्ट्र शासन.)**

# पर्यटनविश्वातील सर्वोत्तम ठिकाणांचा मागोवा

पर्यटन ही केवळ करमणूक नव्हे, तर ती अनुभवांची गुंफण असते. विविध देश, भौगोलिक वैशिष्ट्यं, संस्कृती, इतिहास आणि आधुनिक जीवनशैली यांचं सजीव दर्शन मिळवण्यासाठी लाखो लोक दरवर्षी जगभर प्रवास करतात. काही ठिकाणं अशी आहेत की, जी वर्षानुवर्षं जागतिक पर्यटनाच्या केंद्रस्थानी आहेत. ही ठिकाणं पर्यटकांना वेगवेगळ्या प्रकारच्या अनुभवांचा विलोभनीय आनंद देतात.

- **फ्रान्स – पॅरिस आणि त्याच्या सीमा :** दरवर्षी सुमारे ८ कोटींपेक्षा अधिक पर्यटक फ्रान्समध्ये भेट देतात. पॅरिस, ज्याला City of Light म्हणून ओळखलं जातं, हे शहर रोमान्स, कला, फॅशन आणि ऐतिहासिक वास्तूंमुळे जगभर प्रसिद्ध आहे. आयफेल टॉवर, लोव्हर म्युझियम, नोट्रे डेम कॅथेड्रल आणि शांझे लिजे ही ठिकाणे येथे प्रमुख आकर्षण आहेत. शिवाय फ्रान्समधील प्रोव्हान्स, नाइस, ल्योन यांसारखी ठिकाणं निसर्गप्रेमींना भुरळ घालतात.
- **स्पेन :** स्पेन हे युरोपमधील दुसऱ्या क्रमांकाचे पर्यटनस्थळ समजले जाते. बार्सिलोना आणि माद्रिद ही शहरं कलात्मकतेसाठी प्रसिद्ध असून अल्हांब्रा, साग्रादा फमिलिया आणि विविध समुद्रकिनारे पर्यटकांना आकर्षित करतात. येथील आंतरराष्ट्रीय फेस्टिव्हल्स, संगीत आणि खाद्यसंस्कृती पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहेत.
- **अमेरिका – विविधता आणि वैश्विक आकर्षण :** संयुक्त राष्ट्रांमध्ये दरवर्षी ७ कोटींहून अधिक पर्यटक भेट देतात. न्यूयॉर्क, लॉस एंजेलिस, लास वेगास आणि सॅन फ्रान्सिस्को ही प्रमुख शहरे ऐतिहासिक, आधुनिक व सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाची आहेत. ग्रँड कॅनियन, नायगारा फॉल्स आणि डिस्नेलँड ही ठिकाणं कुटुंबांसाठी विशेष आकर्षण असतात.
- **इटली :** इतिहास, वास्तुकला आणि ख्रिश्चन धर्माच्या मूळ स्थानांपैकी एक असलेली इटली हेदेखील प्रमुख पर्यटनस्थळ आहे. रोम, व्हेनिस, फ्लॉरेन्स आणि मिलान या शहरांमधून प्राचीन रोमन साम्राज्याचा इतिहास, ख्रिश्चन कला व संस्कृतीचे दर्शन होते. कोलोसेअम, सेंट पीटर्स बॅसिलिका आणि पिझाचा झुकता मनोरा ही जागतिक वारसा स्थळं पर्यटकांना भुरळ घालतात.
- **चीन आणि थायलंड :** आशियातील सर्वाधिक पर्यटक आकर्षित करणारे देश म्हणजे चीन आणि थायलंड. चीनमध्ये ग्रेट वॉल, बीजिंग, आणि शांघाय ही ठिकाणं ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध आहेत, तर थायलंडमध्ये बँकॉक, फुकेट आणि चियांग माई या ठिकाणांमध्ये समुद्रकिनारे, मंदिरं आणि स्थानिक संस्कृती यांचं दर्शन घडतं.
- **युनायटेड किंगडम (यू.के.) :** लंडन, एडिनबरो आणि ऑक्सफर्ड ही ठिकाणं इंग्लंडमध्ये जागतिक शिक्षणसंस्था, राजेशाही परंपरा आणि ऐतिहासिक ठिकाणांमुळे प्रसिद्ध आहेत.

**(माहितीचा उगम)**

# रांजणखळग्यांचे आश्चर्य

**पद्मजा श्रीपाद पाठक**



पुणे जिल्ह्यातील शिरूर आणि अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर या दोन तालुक्यांच्या सीमेवरील; तसेच अहिल्यानगरपासून ७० कि.मी. अंतरावर असलेल्या नियोज येथील, कुकडी नदीच्या पात्रात असलेल्या खडकात पाण्याच्या अव्याहत प्रवाहाने; नैसर्गिकरीत्या जे असंख्य खड्डे तयार झाले आहेत तेच हे रांजणखळगे.

रांजणखळगे– नैसर्गिकरीत्या तयार झालेले हे खड्डे म्हणजे निसर्गाने धरतीमातेवर कोरलेली नितांतसुंदर लेणी आहेत. या खड्ड्यांचा आकार रांजणासारखाच असून, या कुंडातील पाणी दुष्काळातसुद्धा आटत नाही. अनेक वर्षांपूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यातील निघोज परिसरात मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसामुळे या कुंडांची निर्मिती झाली असल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

कुकडी नदीच्या पात्रात साधारण २०० मीटर लांब व ६० मीटर रुंद इतक्या भागात खडकामध्ये रांजणखळग्यांचे विविध आकार आपणास पाहावयास मिळतात. या रांजणखळग्यांना स्थानिक भाषेत 'कुंड' म्हणतात. निसर्गाने बहाल केलेल्या या कुंडांमुळे कुकडी नदीच्या सौंदर्यात भर पडली आहे. कुकडीचे रांजणखळगे देशी–विदेशी पर्यटकांना आकर्षित करत असून, रांजणखळग्यांची निर्मिती कशी झाली, कोणत्या भौगोलिक कारणांमुळे झाली, या सर्व बाबींचा अभ्यास करण्याकरिता जगभरातील तज्ज्ञमंडळी, अभ्यासक या परिसराला आवर्जून भेट देत आहेत.

## जगभर ख्याती

रांजणखळग्यांची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली असल्याने त्याची ख्याती संपूर्ण जगभर पसरली आहे. महाराष्ट्रातील अजिंठा–वेरुळची लेणी, छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, हेमाडपंथी प्राचीन मंदिरे अशा अनेक अद्‌भुत मानवनिर्मित आविष्कारांप्रमाणेच रांजणखळग्यांचे हे नैसर्गिक आकर्षण जगभरातील पर्यटकांना, अभ्यासकांना, तज्ज्ञांना भुरळ पाडत आहे.

रांजणखळग्यांच्या परिसरात म्हणजेच कुकडी नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूस मळगंगा देवीची दोन मंदिरे आहेत. या दोन मंदिरांना जोडणारा, राज्य सरकारच्या वतीने बांधण्यात आलेला झुलता पूलदेखील बघण्यासारखा आहे. पुलाच्या मध्यभागी उभे राहून कुकडी नदीचे मनमोहक दर्शन घडते. नदीच्या पात्राच्या दोन्ही बाजूंना असलेल्या रांजणखळग्यांमुळे या दर्शनाची विलोभनीयता वाढते. निसर्गाचा हा चमत्कार तासन्‌तास बघत राहावासा वाटतो. निघोज गावात मळगंगा माता मंदिराबरोबरच कपिलेश्वर मंदिर, वाघजाई माता मंदिर आणि राम मंदिर बघण्यासारखी आहेत. दरवर्षी भरणाऱ्या मळगंगा मातेच्या जत्रेस लाखो संख्येने भक्तगण मोठ्या भक्तिभावाने दर्शनासाठी येत असतात.

राज्यातील निघोज हे २,७३५ हेक्टरवर वसलेले मोठे गाव आहे. येथील जनगणनेनुसार लोकसंख्या १०,३८५ असून, त्यापैकी पुरुषांची संख्या ५,४१०, तर स्त्रियांची संख्या ४,९७५ एवढी आहे. येथे मराठी आणि इंग्रजी शाळा, विज्ञान, वाणिज्य, कला महाविद्यालयही आहे.



निघोजपासून साधारण २५ कि.मी. अंतरावर निसर्गरम्य चिंचोली गाव आहे. या गावात आपल्याला असंख्य प्रमाणात मोर बघावयास मिळतात. हे गाव मोराची चिंचोली या नावाने प्रसिद्ध आहे. तसेच या परिसरात असणारे राळेगणसिद्धी हे गाव आणि पाबळची मस्तानीची समाधी ही ठिकाणे पर्यटक, अभ्यासकांनी आवर्जून भेट देण्यासारखी आहेत.

**(निवृत्त अधिकारी, महाराष्ट्र शासन.)**

# एक अनुभवशील प्रवास



वंदना जैन

एक दिवस नवीन साहस घेऊन सुरू झाला. खूप काही शिकायला मिळालं, स्वतःला explore केलं, स्वतःशी connect झाल्याची एक वेगळीच अनुभूती मिळाली. भारतीय वारसा, विविधता, संस्कृती, परंपरा, वेगवेगळ्या कोपऱ्यांत राहणाऱ्या लोकांचा जगण्याचा अंदाज – हे सगळं पाहताना मन थक्क झालं.

आग्रा आणि फतेहपूर सिक्री या ऐतिहासिक शहरांमधल्या स्मारकांनी, शिल्पांनी मन गुंग केलं. नजर हटवणं अशक्य होतं, इतकी अप्रतिम वास्तुशिल्पं! आणि ही तर फक्त सुरुवात होती. प्रवास जसजसा पुढे सरकत गेला, तसतसा तो अधिक रोमांचक, थरारक आणि विस्मयकारक होत गेला.



उत्तराखंड – खरंच देवभूमी का म्हणतात ते अनुभवून कळलं. देवप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग आणि विष्णुप्रयाग – या सगळ्या संगमांचे सौंदर्य पाहून श्वास थांबावा असा अनुभव आला. मग गेलो बद्रीनाथ – हिमालयाचं सौंदर्य इतकं अप्रतिम की शब्द अपुरे पडतात. जसजसे उंचावर जात होतो, तसतसा तिथला निसर्ग, वनस्पती, प्राणी आणि माणसांचं जगणं यामध्ये बदल दिसत होता.

एक क्षणही थकवा जाणवला नाही. हिमवर्षाव पाहून मन अक्षरशः वेडं झालं. सर्वात अविस्मरणीय अनुभव म्हणजे, एका रात्री एकटीने ५ किमी चालत जाणं 'माणा' या भारताच्या शेवटच्या गावात – जिथून सरस्वती नदीचा उगम होतो. भीमपूल पाहणं, स्थानिक लोकांबरोबर राहणं, मध्यरात्री बर्फात भटकणं – हे सगळं शब्दांत सांगता येणार नाही, ते फक्त मनाने अनुभवायचं.



पुढे गेलो औली – भारतातील सर्वात उंच रोपवे पॉइंट. तिथून शिवालिक हिमालयाचे विहंगम दृश्य, घोडेस्वारी, बर्फामध्ये खेळणं – सगळं काही स्वप्नासारखं वाटलं. मग चामोली, गोपेश्वर गावंही पाहिली.

ही केवळ एक सहल नव्हती, हा माझा स्वतःला शोधण्याचा आणि शिकण्याचा एक प्रवास होता. काहीच नियोजन नव्हतं, सगळं प्रवासातच ठरत गेलं – कुठे जायचं, कसं जायचं, कुठे थांबायचं, आणि जैन अन्न कुठे मिळेल – हे सगळं शोधण्यातच मजा होती.

प्रवासात केवळ भारतातीलच नाही, तर जगभरातील लोक भेटले. त्यांच्या अनुभवांतून खूप काही शिकायला मिळालं. खरंच, आयुष्य हे आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे – म्हणून प्रत्येक क्षण जगून घ्या, अनुभवून घ्या.



या प्रवासात गढवाली संस्कृतीचाही अनुभव घेतला. इथले लोक अत्यंत सुसंस्कृत, प्रेमळ, सेवाभावी आणि अतिथींचे मनापासून स्वागत करणारे आहेत. 'अतिथी देवो भव:' इथे खरंच आचरणात आणलं जातं. एक क्षणही असुरक्षित वाटलं नाही आणि स्त्रियांसाठी असलेला आदर पाहून खूप छान वाटलं. इथे स्त्रीच्या नावामागे 'देवी' लावतात – ही खूप सुंदर गोष्ट आहे.

'आदिबद्री' हे पाच बद्रींपैकी पहिले बद्री – इथे नवव्या शतकातली मंदिरांची रचना आहे. अप्रतिम! आणि हो, एका ट्रकमध्ये केलेला प्रवास – तो अनुभव केवळ हृदयात साठवून ठेवण्यासारखा होता.



ही यात्रा संपली नाहीये, ही फक्त नव्या प्रवासाची सुरुवात आहे... कारण जीवन म्हणजे सतत शिकत, अनुभवत, जगत राहणं...

*निसर्गावर निर्मळ प्रेम*
*स्वत:ला शोधण्याचा प्रवास*
*आयुष्य जगा पूर्णतेने...*

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)**





देवनागरीत वापरले जाणारे पेन






# देवनागरी

**अजय भोसले**

भारतीय लिप्यांचा उगम ब्राह्मी लिपीत दिसून येतो. ब्राह्मी लिपी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते. या लिपीत लिहिलेले लेख साधारणत: ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील आढळून आले आहेत. कालानुरूप त्यात बदल होत गेले. देवनागरी हे त्याचे आधुनिक स्वरूप आहे.

देवनागरी लिपीचा अभ्यास करताना स्वर, व्यंजन, विरामचिन्हे, अंक याचा सराव करावयाचा आहे. याचा सराव करताना अक्षरांची उंची, वापरले जाणारे पेन हे आपण पाहणार आहोत.

## अक्षरांची उंची

अक्षरांची उंची एकसमान असणे आवश्यक आहे. देवनागरी सुलेखनाच्या लेखणीची नीब ४५ अंश कोनात असते. प्रत्येक नीबची जाडी वेगळी असते. सर्वसाधारणत: नीबच्या जाडीच्या सहा पट इतके प्रमाण अक्षरांच्या उंचीकरिता घेण्यात येते. (चित्र–१)

मात्रा, उकार इ. याची उंची नीबच्या जाडीच्या अडीच किंवा तीनपट असते. (चित्र–१) याशिवाय अनुस्वार, इकार, बिंदू, अर्धचंद्र इत्यादी अनेक आकार आहेत. अक्षराची उंची उभी रेखा वक्र रेखा, आडवी रेखा ४५, अंश हे महत्त्वाचे घटक आहेत.

देवनागरी सुलेखनात पूर्ण अक्षरे, अर्ध अक्षरे, जोडाक्षरे अशी अक्षरे असतात.

पूर्ण अक्षरे – क प त इ.

अर्ध अक्षरे – क्‍ ण्‍ त्‍ इ.

जोडक्षरे – क्त प्या इ.

या व्यतिरिक्त ऐ, औ, झ इ अशी अक्षरे नेहमीच्या पूर्ण अक्षरांपेक्षा आकारात किंचित मोठी असतात.

अक्षरांच्या आकाराच्या विविध प्रमाणामुळे देवनागरी सुलेखन आव्हानात्मक असते.

आपण एकाच वर्गातील अक्षरे प्रथम पाहू या...

कोणतेही अक्षर उभी रेषा, आडवी रेषा, वक्र रेषा, ४५ अंश कोन यातून तयार होते. उदा.–१ व हे अक्षर घेतल्यास त्यातून खालीलप्रमाणे अक्षरे तयार करता येतात.

व, ब, क.

उदा.– २ प हे अक्षर घेतल्यास त्यातून खालीलप्रमाणे अक्षरे तयार करता येतात.

प, ष, फ.

देवनागरी लिपीकरिता ४५ अंश नीबचा फाऊंटन पेन, चिझल हेड पेन, डिप पेन वापरता येतात.


**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

# चित्र-१



निबच्या ३ पट
अक्षराची उंची निबच्या ५ पट
निबच्या ३ पट
आडवी रेषा
वक्र रेषा
उभी रेषा
व
ब
क
आडवी रेषा
उभी रेषा
वक्र रेषा
प
ष
फ

## पाऊस : एक अनुभव



पाऊस म्हणजे
एक आठवण
ओलीचिंब भिजलेली
पाऊस म्हणजे
नवी नवरी
हिरवा शालू नेसलेली
पाऊस म्हणजे
व्याकूळ मन
आठवणीत रमलेले
पाऊस म्हणजे
काळे घन
शुभ्र मोती भरलेले
पाऊस म्हणजे
सुरेल गाणी
मधुर स्वरांनी भारलेली
पाऊस म्हणजे
एक हुरहुर
मनात खोल रुतलेली
पाऊस म्हणजे
मंतरलेले दिवस
इंद्रधनुने रंगलेले
पाऊस म्हणजे
हिरवे स्वप्न
पानाफुलांनी सजलेले
पाऊस म्हणजे
चातक पक्षी
अमृतथेंब प्यालेला
पाऊस म्हणजे
एक अनुभव
रोमारोमांत भरलेला
पाऊस म्हणजे
एक अनुभव
रोमारोमांत भरलेला!

**– सुधीर शास्त्री**

## पाऊस

निळा पाऊस, तांबडा पाऊस,
पांढरा पाऊस, हिरवा पाऊस...
इन्द्रधनूची शाल ओढून रंगात रंगलेला
झिमझिमणारा पाऊस...
कुणाला नको नकोसा...
कुणाला हवा हवासा पाऊस...
राधेला किसनाची याद देऊन...
व्याकुळ करणारा पाऊस...
खळखळणाऱ्या झऱ्यांना ...
डोंगराआडून साद देणारा पाऊस...
कुणाच्या डोळ्यातून वाहणारा...
कुणाच्या डोळ्यात नाचणारा पाऊस...
ठुमकत निघालेल्या सरितेला...
दर्याची भेट घालून देणारा पाऊस...
धुक्यात लपलेल्या मेघांशी ...
लपंडाव खेळणारा पाऊस...
कुणाची आस पाऊस...
मनाचे भास पाऊस...
असा हा पाऊस...
कधी रंगात रंगवणारा...
कधी रंगहीन करणारा...
कधी दवबिंदूंची माळ उसवणारा...
कधी आपल्याच सरीत
श्वास कोंडवणारा पाऊस...
ओला पाऊस...
सुखा पाऊस...
कुणाला हवाहवासा...
कुणाला नकोनकोसा पाऊस...

**– अजय भोसले**
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

## मुसळधार भेट

येणाऱ्या पहिल्या पावसाला
मी नाव तुझे सांगणार आहे.

मागच्या पावसापासून या पावसापर्यंत
एकदाही न भेटता,
कित्येकदा येऊन भिडत राहिलासे
असा साधा हिशोब घेऊन
मी ठाण मांडून बसणार आहे

पावसाळा ते पावसाळा
माझा कसा कोरडाच रे ऋतू
असा किती काळ माझा हंगाम तरसणार आहे

तुझ्या पावसाची नसेल तयारी
तर मला खुशाल सांग
मी यंदा तुझाही ढग घेऊन
मुसळधार बरसणार आहे.

मग वारा घेऊन माझं अधीर मन
सोसाट्याने सुटणार आहे.
माझ्या रागातील आग होऊन वीज
आकाशासह तुटून खाली पडणार आहे

अंतरातला ओलावा अस्सा जोरात
उसळून डोळ्यातून टपटपणार आहे.
मातीचा गंध क्षणात धडधडून येईल वर
अन् वेगात उलट्या पावली
पाण्यात विरघळणार आहे.

झाडांच्या छत्र्या पाऊस झेलणार नाहीत
यंदा ढग बनून त्याही धो-धो कोसळणार आहेत
नदीनाले तुडुंब भरून ओसंडून
माझ्या पावसात वाहून जाणार आहेत.

तलाव अन् विहिरी भरून काठोकाठ
पाऊसपाण्याला बाहेर सांडणार आहेत
सुकली माती अन् जमिनीची कोरडी जखम
पाऊसपाण्याने मी सांधणार आहे.

तडा गेलेल्या शेतात आता एक
हिरवंगार गर्द रान उठणार आहे.
कुणी, बीज पेरो अथवा न पेरो
हट्टाची हिरवळ अशी
या हंगामात वाढणार आहे.

निसर्गाचं चक्र राहू दे वाट पाहत
यंदा माझा पाऊस मीच पाडणार आहे.

**– लीना संखे**
उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग.

## पाऊसधून ...!

दिल्या घेतल्या श्वासांमध्ये
पाऊसधून तरंग होते
दूर तिथेही सूर गुंफले
अल्लद अल्लद विलगत होते..!
थेंब थेंब इथे मोहरती
पानांवरती नक्षी सजते
दूर तिथेही तळहातावर
ओली मेंदी सलज्ज होते....!
धुंद कुंद मोहमयी हवेत
तरल मनाचे होती गुंते
दूर तिथेही कोमल हृदयी
हळवी कोवळी दंगल होते...!
पानोपानी वेढून पाऊस
ओलीचिंब वेल निथळते
दूर तिथेही सजल नयनी
नवथर पहिली थरथर होते...!

**– पुष्पांजली कर्वे,**
अधीक्षक, सार्वजनिक रुग्णालय, वाशी,
नवी मुंबई महानगरपालिका

# मोगलीच्या गावची सफर!

**पुष्पांजली कर्वे**

*जबलपूर कान्हा*
*जिथे मोगलीचा जन्म झाला...*

इंग्रजी लेखक रूडयार्ड किप्लिंग ज्याचा जन्म भारतात झाला आणि त्याने ज्या जंगलातील आपल्या सहा वर्षांच्या वास्तव्याच्या प्रेरणेने मोगलीची 'द जंगलबुक' कादंबरी लिहिली, त्या जंगलची सफारी करायला मिळणार त्यामुळे मी खूपच एक्साईट होते!

मोगली/द जंगलबुक कादंबरी वाचली आहे. त्यावरचा चित्रपटही पाहिला होता. त्यामुळे त्याच्या गावी जाण्यातली लहानपणची उत्सुकता आजही तशीच आहे! ...त्याच जंगलातील प्राणी पक्षी यांच्यात त्यांच्या घरचे पाहुणे होऊन त्यांचे जंगलघर मी अनुभवणार होते...!

२२/११/०१९ ची जबलपूरमधील पहाट... जबलपूर शहराच्या चप्प्यावर-चप्प्यावर कांदेपोहेच्या हातगाड्या आणि त्याभोवती सकाळची न्याहारी करणारे आमच्यासारखे पर्यटक! जबलपूरला कांदेपोहे फेमस न्याहरी हे पाहूनच गंमत वाटली... माझ्या घरातला हा दर दिवसाआडचा नाश्ता... त्यामुळे माझा कांदेपोहे करण्यात हातखंडा...!

आणि मी माझ्या अहोंना न राहून उत्सुकतेने विचारलेच.... काय हो कुठले कांदेपोहे आवडले.... हे की घरचे?

उत्तर आलं... घरचे!

दील खूश हो गया..

आणि खरंच मी करते तेच छान होते! अक्षरशः ते कांदेपोहेच होते... फक्त कांदा पोहे आणि त्या कांद्यापोह्याच्या ढिगाऱ्यावर वरून सजावटीला मिरची कोथिंबीर आणि शेंगदाणे लावलेले!

सकाळची ती न्याहरी करून आम्ही जबलपूर भेडाघाट गाठले... भेडाघाट. नर्मदा नदीचे विस्तीर्ण पसरलेले विशाल थंडगार नदीपात्र! पाण्यातून थंडीच्या वाफा निघत होत्या. सभोवतालचे तापमान १० डीग्रीच्या आसपास होते. स्वेटर, कानटोप्या घालूनही सर्वांनाच हुडहुडी भरली होती.

तशा त्या थंडगार वातावरणात आम्ही सर्वजण होडीत बसलो. माझं तर कुडकूड... अंग थरथरत होतं... थडथड दात वाजत होते...; पण जसे आम्ही नदीपात्रातून जाऊ लागलो, आजूबाजूच्या विहंगम दृश्याने चकित झालो. आमच्या आजूबाजूला मोठमोठे विशाल उंच उंच संगमरवरी डोंगर होते! पांढरे, काळे सप्तरंगी संगमरवरी डोंगर... नदीच्या मधोमधच्या एका विशाल संगमरवरी दगडावर महान शिवभक्त अहिल्याबाई होळकर यांनी स्थापित केलेली शिवपिंड होती! त्या विस्तीर्ण नर्मदेचं ते छोटंसं पात्र होतं. एक छोटीशी नर्मदा परिक्रमा केल्याचं समाधान मनात होतं. तिच्या थंडगार पाण्यात हात घालून स्वतःला पावन केल्याचं अजून एक मानसिक समाधान! त्या अतिविशाल विस्तीर्ण नदीपात्रातून विहरतानाचा आनंद शब्दातीत होता!

नदीपात्रातून बाहेर आल्यावर मात्र थंडी कुठल्या कुठे पळून गेली. तिथून मग धुवाधार नर्मदानदीचा मोठ्ठा वॉटरफ्लो पाहिला... आऽहाऽ



हा... तो अजस्र पाण्याचा कोसळण्याचा उत्साह पाहून बघणारे रोमांचित न होतील तर नवलच! तो विशालकाय लाटांचा लोंढा एका दमात खाली कोसळत होता आणि खाली नदीपात्रात मिसळून स्वच्छ पांढरेशुभ्र दुधाचे लोट पाहतोय की काय असा भास होत होता!

रस्त्यात छान बोरं, उकडलेले शिंगाडे खात खातच गाडीत बसलो आणि मुक्कामी क्लब महिंद्रावर घनदाट जंगलाच्या सान्निध्यातील ते मनोहारी रिसॉर्ट, तिथे पोहोचलो आणि









प्रवासातला थकवा कुठल्याकुठे पळाला. फ्रेश होऊन आराम करून रात्रीच्या जंगल सफारीला सर्व निघाले आणि मी मात्र एवढ्या थंडीत आपला निभाव लागणं कठीण हे ओळखून वेळीच माघार घेतली! पण त्यामुळे मला रात्री एक अनोखा आनंद मिळाला!

कान्हा हे खास वाघांसाठी सुप्रसिद्ध असलेलं एक विस्तीर्ण घनदाट जंगल आहे! पण मुळात त्याचं नाव कान्हा कसं पडलं? खरंतर प्रथम मी हे नाव ऐकलं, तेव्हा मला त्याचा संबंध बाल श्रीकृष्णाशी आहे की काय अस वाटलं!

...पण मध्य प्रदेशातील या जंगलातील भागातील माती काळी आहे आणि त्यावरून त्या भागाला कान्हेर हे नाव पडलं, मात्र इंग्रज राजवटीत इथे इंग्रज शिकारींसाठी यायचे, त्यांना कान्हेरचा उच्चार जमत नव्हता... कान्हेर उच्चारताना 'र' सायलेंट उच्चारल्यामुळे कान्हेरे कान्हा झाले आणि पुढे तेच नाव रूढ झालं!

याच जंगलाच्या आतील भागाला कोअर म्हणतात, तर जंगलाच्या बाहेरील वस्तीला बफर असे म्हणतात!

याच बफर भागात तिथली मूळ जमात राहते, त्यांना बेगा जमात म्हणतात!

या बेगा जमातीचे पोषण अर्थात जंगलातील मिळणाऱ्या झाडं, फळं आणि प्राण्यावरच होतं! कोंबड्या, डुक्कर आणि गायी हे मुख्यत्वे पाळीव प्राणी....

जंगलातील मोहाचं झाड यांच्यासाठी फार महत्त्वाचं, या झाडाची मोहाची फळे यातून ते दारू तयार करून विकतात आणि ज्या काळात काहीच उत्पन्नाचे साधन नसते, तेव्हा ते ठिकठिकाणी हॉटेल्स, कार्यक्रम येथे जाऊन आपले पारंपरिक बेगा नृत्य सादर करून पैसे मिळवतात!

ते नृत्य रात्रीच्या चांदण्यात छान शेकोटी पेटवून त्याभोवती एकाच सुंदर तालात आपल्या पारंपरिक वेषात आणि वाद्यांसह सादर केले! ते नृत्य पाहणारे दंग तर झालेच; पण पाहता-पाहता त्यांच्या तालात ताल जोडून नाचूही लागले!

दुसऱ्या दिवशी पहाटे पाचला उठून १० डीग्री तापमानात आम्ही तयार होऊन जंगल सफारीला निघालो! एवढ्या थंडीतला माझा पोशाख काय होता?

फक्त फुल्ल थर्मल, ड्रेस..., त्यावर स्वेटर, हातमोजे, पायमोजे, डोक्यावर लोकरीची टोपी, त्यावर एक सिल्क मफलर त्यावर एक टोपी... बस्स एवढेच...!!

आम्ही कान्हा जंगल गेटपर्यंत पोहोचलो... तर आमच्या आगे-मागे आजूबाजूला एकंदर ८० जीप्सी गाड्या एका रांगेत शिस्तीत उभ्या होत्या. प्रत्येक गाडीत चार ते सहा जण बसले होते! सहा वाजता सर्व कागदपत्रांची पडताळणी करून आम्हाला शिस्तीत एका रांगेत जंगलच्या आत सोडण्यात आले आणि आमची जंगल सफारी सुरू झाली!

जंगलाच्या हृदयात आत-आत जसजसे आम्ही जाऊ लागलो तसतसे वाघ कधी दिसतो ही उत्सुकता वाढत होती! ओपन जिप्सीमधून आम्ही फिरत होतो. त्यामुळे मनात भीती वाटत होती. एखादा वाघ यायचा आणि झडप घालून आम्हाला गडप करायचा; पण आमच्यासोबत मध्य प्रदेश सरकारी फॉरेस्ट कर्मचारी होते. त्यांनी सांगितले की, वाघ कधीही कुणावरही विनाकारण हल्ला करीत नाहीत! आडवड्यातून एकदाच शिकार करतात! एकदा शिकार केल्यानंतर ते आठवडाभर त्यांच्या ठिकाणाहून बाहेर पडत नाहीत!

वाघांची कौटुंबिक कथा अगदी माणसाच्या कथेसारखीच!!

वाघीण आपल्या बछड्यांना जन्म दिल्यानंतर ते स्वतः स्वतःची शिकार करेपर्यंत आपल्यासोबतच त्यांना ठेवते!

सुरुवातीला त्यांना सुरक्षित कपारीत, गुहेत लपवून स्वतः शिकार करून त्यांचे पालनपोषण करते! एकदा ते स्वयंसिद्ध झाले की, त्यांना आपल्यापासून विलग करते!

वाघ मात्र फक्त प्रजनन करेपर्यंत वाघिणीसोबत असतो! त्यानंतर





तो त्यांच्यापासून दूर निघून जातो!

म्हणजे माता वाघिणीवरच पिलांना जन्म देण्यापासून वाढवण्याची जबाबदारी म्हणजे निसर्गतःच मातृत्वाची संपूर्ण जबाबदारी ही स्त्रीवरच आहे तर! आणि मग कधीतरी कुठेतरी एखाद्या वळणार या संपूर्ण कुटुंबाची भेट होते!

गेले दोन–तीन तास आम्ही वाघांना शोधत होतो! पण जीप्सीतून जाता येता आम्हाला कधी वाघांचे, कधी वाघिणीचे, तिच्या बछड्यांच्या पंजांचे ठसे दिसत होते आणि त्यांचा मागोवा घेत घेत आम्ही वाघाचा शोध घेत होतो!

एकदा तरी वाघाचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे, या एकाच इच्छेने एवढ्या लांब, थंडीत कुडकुडत वाघांना शोधत होतो!

दरम्यान वाघांना शोधता–शोधता... जंगलातील इतर सुंदर प्राण्यांचे मनसोक्त हुंदडणे पाहायला मिळत होते! जंगली माकडं टोळ्यांनी झाडांवर बसलेले दिसत होते. त्यामध्ये अगदी पांढरीशुभ्र माकडेही होती!

हरीण, सांबर, काळवीट, ससे मोर, लांडोर अनेक निरनिराळे सुंदर रंगीबेरंगी पक्षी, घार, जंगली कोंबड्या कितीतरी!

पिसारा असलेले मोर मी शोधत होते; पण एकालाही पिसारा नव्हता! पण माथ्यावर चमकणारा मोरपिसी रंगाचा सुंदर, मोहक तुरा प्रत्यक्ष पाहून मन हरखून गेलं! अंगभर हिरवट मोरपिसी रंग खूपच लोभवणारा होता!

पिसारा का नाही तर... पावसाच्या काही महिने आधी मोराची पिसे एक–एक करून हळूहळू आपसुक गळून पडतात आणि पुढचा पावसाळा येईपर्यंत परत हळूहळू मोरपिसे येतात! येता–जाता रस्त्याच्या कडेला भलीमोठी वारुळं दिसत होती!

वारुळं होती वाळवींनी बनवलेली वाळवींची वारुळं! या वारुळांची भिंत आपल्या घराच्या भिंती इतकीच भक्कम!

कान्हाच्या जंगलात मनसोक्त हुंदडताना त्या बोचऱ्या थंडीतही कमालीची गंमत वाटत होती! शुद्ध नैसर्गिक हवा... अगदी प्रसन्न ताजेतवाने होत होतो! मी तर फार एन्जॉय करत होते!

फिरता–फिरता मध्येच वाघाच्या डरकाळीचा आवाज आला की आम्ही सावध होत होतो...! खूप प्रतीक्षेनंतर आमच्यापैकी एका टिमला वाघाचं प्रत्यक्ष दर्शन झालं!

अगदी परब्रह्माचं दर्शन घ्यावं तसं आम्ही वाघाचं दर्शन घेतलं!

एकूणच हा जंगलसफारीचा अनुभव माझ्यासाठी प्रचंड ऊर्जा देणारा होता!

एरवी माणसांच्या गर्दीत सिमेंट–काँक्रिटच्या जंगलात हरवलेला माझा कोरडा ठणठणीत आत्मा या सुंदर हिरव्यागार, गारव्यात जाऊन असा विहरत होता ते शब्दातीत आहे!

निसर्गाच्या अक्षरशः कुशीत विसावण्याचा आनंद एकदा काय हजारदा घ्यायला हवा!

वाघांची झपाट्याने कमी होणारी संख्या, वाढत्या शहरीकरणामुळे झाडांची प्रचंड प्रमाणात होणारी तोड खरंच मानवाने थांबवली पाहिजे! नाहीतर एक दिवस या निसर्गाला.. ढुंढते रह जाओगे!

**(अधीक्षक, सार्वजनिक रुग्णालय, वाशी, नवी मुंबई महानगरपालिका.)**

# बुद्धभूमीची अविस्मरणीय सफर - थायलंड


**संजय ओरके**

आईची एक मनापासून इच्छा होती - थायलंडमधील बुद्धभूमी प्रत्यक्ष पाहण्याची. ती इच्छा पूर्ण व्हावी, या हेतूने आम्ही एका टूर एजंटशी संपर्क केला. माझा आणि आईचा पासपोर्ट आधीच तयार होता. ३ मे २०२५च्या पहाटे आम्ही काही सहकाऱ्यांसह मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थायलंडच्या दिशेने निघालो.

थायलंड भारताच्या वेळेपेक्षा दीड तास पुढे आहे. स्वर्णभूमी विमानतळावर (बँकॉक) पोहोचताच आमचा पर्यटन दौरा सुरू झाला. विमानतळावरील अत्याधुनिक सुविधा, शिस्तबद्ध व्यवस्था आणि स्थानिकांचे सौजन्य हेच थायलंडचे पहिले स्वागत होते.

सहा दिवसांच्या दौऱ्यात प्रथम पटाया शहर गाठले. बँकॉकहून तेथे पोहोचण्यासाठी दोन तासांचा ट्रॅव्हलचा प्रवास झाला. चांगले रस्ते, पण खूप ट्रॅफिक, तरीही हॉर्न न वाजवणारी वाहने आणि स्वच्छता, हे विशेष वाटले. पटाया आणि बँकॉक हे भारतीय पर्यटकांचे आवडते ठिकाण असल्याने येथे भारतीय जेवण सहज उपलब्ध होते. बँकॉकमध्ये हिंदी समजणारे बरेच लोक भेटले, तर पटायामध्ये इंग्रजी हीच व्यवहाराची भाषा होती.





पहिल्या दिवशीचा वेळ प्रवासात गेला. दुसऱ्या दिवशीपासून खऱ्या अर्थाने सहलीची मजा सुरू झाली. सकाळी 'बाली हाई पीअर' येथून स्पीडबोटने समुद्रात एका प्लॅटफॉर्मवर पोहोचलो. २,५०० बाट रकमेची तिकीट घेऊन पॅरासेलिंग, बनाना बोट, जेट स्किईंग आणि सी-वॉकिंगचा अनुभव घेतला. पाण्याखाली ऑक्सिजन हेल्मेटसह चालताना मासे हातात येतील, अशी अपेक्षा होती; पण ते फक्त खाद्य टिपून जात होते. या सुंदर क्षणांचे फोटो आणि व्हिडिओ आयोजकांनीच केले.

दुपारी 'आर्ट इन पॅराडाईस' या 3D म्युझियममध्ये विविध थीम्सवरील चित्रं आणि ॲपद्वारे जिवंत वाटणारे दृश्य अनुभवले. नंतर 'वॉट फ्रा याई' या बिग बुद्धा मंदिरात भेट दिली. १८ मीटर उंच बुद्ध मूर्ती आणि मंदिराच्या परिसरातून दिसणारे पटाया शहर नेत्रसुखद होते.

थायलंडमधील फ्लोटिंग मार्केट्समध्ये लाकडी होड्यांमधून विक्रेते भाजीपाला, फळं, हस्तकला वस्तू विकतात. येथे झुरळ, विंचू, ऑक्टोपस यांचे तळलेले पदार्थही विकले जातात!

बँकॉकमधील 'वॉट त्रायमित' येथे १८ कॅरेट सोन्याची सुमारे ५.५ टन वजनाची बुद्धमूर्ती पाहिली. या भव्य मूर्तींसोबत आसपासच्या परिसरातील शांतताही मनाला भिडली. थायलंडच्या सहलीत थाई बॉडी मसाज अनुभवायलाच हवा. पारंपरिक थाई मसाजमध्ये योग, ॲक्युप्रेशर आणि आयुर्वेदिक तत्त्वांचा समावेश असतो. मसाजनंतर शरीरात नवचैतन्य निर्माण झाल्यासारखे वाटले.

पटायामधील जेम्स गॅलरीमध्ये मिनी ट्रेनने दागिन्यांच्या निर्मितीची प्रक्रिया अनुभवली. येथे मोती, निळे माणिक, हिरे विकले जातात. अधिकृत दालनातून घेतलेल्या खरेदीवरचा व्हॅट विमानतळावर परत मिळतो. टायगर पार्कमध्ये वाघांसोबत फोटो काढण्याची संधी मिळाली. तिकीट काढून व्यावसायिक फोटोग्राफरद्वारे वाघांना स्पर्श करत छायाचित्रे काढली. यानंतर खाओ ची चॅन येथे limestone डोंगरात आरगॉन लेसर तंत्रज्ञानाने कोरलेली १०९ मीटर उंच बुद्धमूर्ती पाहिली. ही मूर्ती राजा भूमीपोल यांच्या राज्याभिषेकाच्या ५०व्या वर्षानिमित्त साकारण्यात आली. प्रतिमा सोन्याच्या टाइल्सने सजलेली आहे. त्या ठिकाणी एक विलक्षण शांतता अनुभवास आली.

वॅक्स बुद्ध संग्रहालयात अरिहंत पद मिळालेल्या संतांचे हुबेहूब पुतळे पाहता आले. त्यांचं सान्निध्य मनाला अंतर्मुख करणारं होतं. क्रूझ सफरही विसरणं अशक्य! रात्री ८ वाजता डबल डेक क्रूझवर जेवण, संगीत, वाऱ्याचा स्पर्श, समुद्रकिनारी झगमगणाऱ्या इमारती, या क्षणांनी थायलंडचा नजारा अजूनच मोहक केला. बँकॉकच्या जंगल सफारीत सिंह, वाघ, झेब्रा, गेंडे, हरणं यांसारखे प्राणी जवळून पाहता आले. ८ कि.मी. लांब सफारी बसने आणि नंतर मरीन पार्कमधील डॉल्फिन, हत्ती, पोपट आदींचे शो हा अनुभवसुद्धा लक्षात राहील असा.

आईच्या मनातली इच्छा आम्ही प्रत्यक्षात अनुभवली. थायलंडमधील बुद्धभूमी, निसर्ग, संस्कृती, साहस आणि अध्यात्म यांचा एक सुंदर संगम आम्हाला अनुभवता आला. ही सहल आमच्या आठवणीत कायमची कोरली गेली.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

# महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

**संध्या गरवारे**

> **महाराष्ट्र हे भारतातील एक बहुआयामी राज्य असून, निसर्गसंपन्नता, ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक विविधता आणि आधुनिकतेचा संगम यामुळे हे राज्य पर्यटकांना विविध अनुभव देणारे ठिकाण बनले आहे. या पर्यटन क्षेत्राच्या सशक्त पायाभूत रचनेत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) ची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.**

## महाराष्ट्र: निसर्ग आणि संस्कृतीचे संगमस्थान

महाराष्ट्र राज्याला निसर्गाने भरभरून दिले आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगा, कोकणचा विस्तीर्ण समुद्रकिनारा, विदर्भातील घनदाट जंगलं, पश्चिम घाटातील जैवविविधता आणि सडसडीत थंड हवामान असलेली गिरीस्थाने ही पर्यटकांची प्रमुख आकर्षण स्थळं आहेत. याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात बांधलेले गडकिल्ले, विविध धर्मांच्या श्रद्धास्थळांचा इतिहास आणि लेण्यांच्या माध्यमातून दिसणारी प्राचीन भारतीय शिल्पकला यामुळे महाराष्ट्रातील पर्यटन अधिकच समृद्ध झाले आहे.

महाराष्ट्र राज्य हे सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध असून, युनेस्कोने घोषित केलेली सहा जागतिक वारसा स्थळे (World Heritage Sites) याचे ठळक प्रमाण आहेत. या स्थळांमुळे राज्याला आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर महत्त्वाचे स्थान लाभले आहे. या वारसा स्थळांजवळ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) ने पर्यटकांसाठी दर्जेदार आणि परवडणारी निवास व्यवस्था उभारली आहे, जेणेकरून पर्यटकांना आपल्या प्रवासाचा पुरेपूर आनंद घेता येईल.

## निवास संकुलांची वैशिष्ट्ये

MTDC चे पर्यटक निवास हे निसर्गरम्य, ऐतिहासिक, धार्मिक किंवा साहसी स्थळांच्या सान्निध्यात वसलेले आहेत. हे सर्व निवास ऑनलाइन बुकिंगसाठी उपलब्ध असून, स्वच्छता, सुरक्षितता, दर्जेदार सुविधा आणि स्थानिक चव असलेल्या उपाहारगृहांसाठी प्रसिद्ध आहेत. पर्यटनाच्या अर्थकारणालाही यामुळे चालना मिळाली आहे.

## प्रमुख एमटीडीसी पर्यटक निवास:

### मुंबई विभाग

**एलिफंटा लेणी –** येथे दिवसभरासाठी पर्यटक निवास व चालुक्य उपाहारगृह उपलब्ध आहे. संपर्क : सुदर्शन घरत – ८४२२८२२१०९, खारघर, नवी मुंबई – आरका रेस्टॉरंटसह सुविधा. संपर्क: तेजस तायडे – ७३०४३६७१५०.

**माळशेज घाट –** ४५ कक्ष, १ कॉन्फरन्स हॉल, उपाहारगृह. संपर्क: समीर शेटे – ९१३०९०६००६.

**माथेरान –** ३५ कक्ष, उपाहारगृह. संपर्क: विष्णू गाडेकर – ९८२२०४३१७५.



### कोकण विभाग

**गणपतीपुळे –** समुद्रकिनाऱ्यालगत ७० रुम्स. संपर्क: वैभव पाटील – ९०४९५०८६१३.

**तारकर्ली –** १६ रुम्स, मालवणी जेवणासाठी कोरल उपाहारगृह. संपर्क: सिद्धेश चव्हाण – ९८८१०७४३४९.

**IISDA, तारकर्ली –** जलक्रीडा व स्कुबा डायव्हिंग प्रशिक्षण. संपर्क: सुरज भोसले – ७८२२०९७६७९.

**वेळणेश्वर व कुणकेश्वर –** समुद्रकिनाऱ्यालगत स्वच्छ परिसर. संपर्क : वैभव पाटील / सिद्धेश चव्हाण

**हरिहरेश्वर –** समुद्राच्या लाटांचा अनुभव. संपर्क : वैभव पाटील – ९०४९५०८६१३.

**छत्रपती संभाजीनगर –** मोठ्या व प्रशस्त आधुनिक सुविधांसह ५३ रुम्स पर्यटकांसाठी उपलब्ध आहेत. पर्यटक निवासातील कैलाश रेस्टॉरंट येथे महाराष्ट्रातील चविष्ट पदार्थ जसे की पुरण–पोळी, पिठलं–भाकरी इ. उपलब्ध आहे. या पर्यटक निवासाच्या बुकिंगकरिता श्रद्धा दिंडे ७८४०९५१६५६ आहे.

**पर्यटक निवास, अजिंठा टी पॉइंट –** काही कि.मी.च्या अंतरावर अजिंठा लेणी व येथील नयनरम्य दृश्य पाहायला मिळते. येथे पर्यटकांच्या राहण्यासाठी ०५ रुम्स व १ डाइन जंक्शन उपाहारगृह आधुनिक सोयीसुविधांसहित उपलब्ध आहेत. बुकिंगकरिता निवास व्यवस्थापक श्री. शुभम खंडारे ९६६५२११६६६

**अजिंठा, फर्दापूर –** पाचोरा रेल्वे स्थानकापासून ५० कि.मी. व छत्रपती संभाजीनगर विमानतळापासून १०७ कि.मी. अंतरावर महामंडळाचे पर्यटक निवास अजिंठा, फर्दापूर पर्यटकांसाठी उपलब्ध आहे. अजिंठा, फर्दापूर पर्यटक निवासामध्ये २५ रुम्स, ०१ लोकनिवास व विहारा उपाहारगृह आधुनिक सुविधांसह उपलब्ध आहे. मुलांना खेळण्यासाठी प्रशस्त जागा आहे. पर्यटक निवासाच्या बुकिंगकरिता राज पाटील ७७०९७७७७०.

**लोणार –** लोणार येथे महामंडळाचे ०४ रुम्स, ०२ लोकनिवासे व उपाहारगृह उपलब्ध आहे. या पर्यटक निवासाच्या बुकिंगकरिता सदानंद दाभाडे असून ९८२३३५७०५३ आहे.

**राष्ट्रकूट एलोरा खुलदाबाद –** येथील एमटीडीसी परिसराच्या अगदी जवळ वसलेले हे हेरिटेज रिसॉर्ट दर्जेदार निवास, प्रशंसनीय जेवणाची

सुविधा आणि शहरातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या सान्निध्यामुळे एका परिपूर्ण पर्यटनाचा अनुभव देते.

## नाशिकअंतर्गत येणारी पर्यटक निवासे

**भंडारदरा –** अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील भंडारदरा हे थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणी एक धरण असून त्याला विल्सन डॅम, तर धरणाच्या पाणीसाठ्याला ऑर्थर लेक हे नाव आहे. ऑर्थर लेकला लागून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक



निवास आहे. या पर्यटक निवासामध्ये ११ खोल्या १ लोकनिवास व १ उपाहारगृह आहे. पर्यटक निवासाच्या जवळच खालील पर्यटन स्थळे आहेत. अंब्रेला फॉल, विल्सन डॅम, रंधा फॉल, रतनगड किल्ला, अमृतेश्वर येथे प्राचीन महादेवाचे मंदिर, सांधन व्हॅली ही आशिया खंडातील सर्वात खोल दरी असून भंडारदरापासून २२ कि.मी. अंतरावर आहे. किशोर उगळे ८६५७५१८४०४, ८८०६६९६१०७.

**पर्यटक निवास, ग्रेप पार्क –** नाशिक हे एक तीर्थक्षेत्र आहे. गंगापूर धरण हे महाराष्ट्रातील पहिले मातीचे धरण नाशिकमध्येच आहे. गंगापूर धरणाला लागूनच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे ग्रे पार्क पर्यटक निवास आहे. या पर्यटक निवासामध्ये ३२ विविध प्रकाराच्या रुम, ४ हॉल, लॉन्स, रेस्टॉरंट स्विमिंग पुल आहे. या पर्यटक निवासाला लागून पर्यटन विकास महामंडळाचे बोट कल्ब आहे. नाशिक जिल्ह्याला वाईन कॅपिटल म्हणून ओळखला जातो. रामकुंड, सीतागुफा, काळाराम मंदिर, तपोवन, इ. धार्मिक स्थळे आहे. ग्रेप पार्क पर्यटकापासून ३४ कि.मी. अंतरावर श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आहे. रिसॉर्टच्या बुकिंगसाठी रिसॉर्ट मॅनेजर किशोर जाधव हे आहेत. ८१४९९९८८६५, ८१८०००३३७९.

**बोट कल्ब, नाशिक –** नाशिक जिल्ह्यातील गंगापूर डॅम येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे बोट क्लब. नाशिक शहरापासून सुमारे २५ कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी येऊन पर्यटक वॉटर ॲक्टिव्हिटी, उत्कृष्ट जेवण; तसेच येथील निसर्गसौंदर्य व बाजूला बोट क्लब याचा आनंद घेतात.

**शिर्डी –** अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील शिर्डी हे एक गाव आहे. शिर्डी येथे साईबाबा समाधी मंदिर, द्वारकामाई व शिर्डी पासून ७० कि.मी. अंतरावर शनीशिंगणापूर हे शनीदेवाचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. शिर्डी येथे पर्यटन विकास महामंडळाचे साईबाबा मंदिराजवळच पर्यटक निवास आहे. त्यामध्ये विविध प्रकारचे ५३ कक्ष व १ उपाहारगृह आहे. बुकिंगसाठी लक्ष्मीकांत गुडेतवार ८३९०४१६२४२ / ८४२२८२२०८८.

## पुणेअंतर्गत येणारी पर्यटक निवासे

**पर्यटक निवास, महाबळेश्वर –** नयनरम्य सौंदर्य आणि ताज्यातवान्या वातावरणासाठी चांगले असणारे महाबळेश्वर हे सातारा जिल्ह्यात वसलेले सुंदर हिलस्टेशन आहे. वेण्णा तलाव हे महाबळेश्वरमधील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक आहे. महाबळेश्वरपासून प्रतापगड किल्ला २० कि.मी. अंतरावर आहे. येथेच छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफजलखानाचा वध केला होता. हे ठिकाण सातारा रेल्वे स्थानकापासून ६० कि.मी. अंतरावर असून या पर्यटक निवासामध्ये ९० रुम्स, ०१ कॉन्फरन्स हॉल व वेणा उपाहारगृह पर्यटकांच्या सोयीसाठी आधुनिक सोयीसुविधांसह उपलब्ध आहे. सुहास पारखी ७९७२१६५५६६ / ९८६०६८७९२५.

**कार्ला –** लोणावळ्याजवळ कार्ला लेणी, लोहगड किल्ला, लायन्स पॉईंट, भाजा लेणी, टायगर पॉईंट, पवना तलाव, कुण फॉल्स, राजमाची किल्ला, भुशी धरण, विसापूर किल्ला, तुंग किल्ला, खंडाळा किल्ला, देवी एकवीरा आईचे मंदिर इ. पर्यटन स्थळे महामंडळाच्या पर्यटक निवास, कार्लाच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये पाहायला मिळतात. कार्ला येथील महामंडळाच्या पर्यटन निवासामध्ये ७३ रुम्स, ०१ वॉटर पार्क, ०१ बोटींग, ०१ कॉन्फरन्स हॉल व इंद्रायणी उपाहारगृह पर्यटकांसाठी उपलब्ध आहे. साहील भालेराव ७५८८८१३३९९.

**भिमाशंकर –** महामंडळाच्या पर्यटक निवासामध्ये ८१ रुम्स, ०४ लोकनिवासे ०२ कॉन्फरन्स व नगारा उपाहारगृह आधुनिक सोयीसुविधांनी युक्त आहे. या पर्यटक निवासाच्या बुकिंगकरिता निवास व्यवस्थापक विष्णू गाडेकर ९८२२०४३१७५.



**पानशेत –** महामंडळाच्या पर्यटक निवासामध्ये ३५ रुम्स, ०१ कॉन्फरन्स हॉल व जलसागर उपाहारगृह आधुनिक सोयीसुविधांनी युक्त आहे. तसेच जलतरण तलाव, मराठी पुस्तके, बॅडमिंटन, कॅरम बोर्ड, टेबल टेनिस इ.चादेखील अनुभव पर्यटकांना घेता येईल. बुकिंगकरिता निवास कुमार घाडगे भ्रमणध्वनी क्रमांक ८९७५७४३६६२.

कोयना सातारा जिल्ह्यातील कोयना धरण हे महाराष्ट्रातील सर्वात

मोठ्या धरणांपैकी एक धरण आहे. वीजनिर्मितीच्या क्षमतेमुळे कोयना नदी महाराष्ट्राची जीवनरेखा म्हणून ओळखली जाते. धरणाच्या शेजारी असलेले नेहरू गार्डन, ओझर्ड धबधबादेखील पाहण्यासारखे आहे. कोयना धरण परिसरात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक निवास आहे. या पर्यटक निवासामध्ये १२ कक्ष असून १ उपाहारगृह आहे. बुकिंगसाठी संपर्क : सुधाकर आवटी ९४२१२०९२४७.

**नीरा नरसिंगपूर –** पवित्र भीमा आणि नीरा नद्यांच्या संगमावर वसलेले एक निसर्गरम्य छोटे गाव, श्री लक्ष्मी नरसिंह मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. हे मंदिर माढा, माळशिरस आणि इंदापूर या तीन तालुक्यांच्या सीमारेषेवर वसलेले आहे. हे सुंदर आणि प्राचीन मंदिर श्री नरसिंह देवाचे असून महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांतील अनेक कुटुंबांचे कुलदैवत आहे.

**सिंहगड –** सिंहगड सह्याद्रीच्या भुलेश्वर रांगेत, सुमारे ७६० मीटर उंचीवर असलेल्या डोंगरावर वसलेला हा किल्ला, त्याच्या नैसर्गिक तटबंदी व उंच, ताशीव उतारांमुळे संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. सिंहगड हा अनेक ऐतिहासिक लढायांचा साक्षीदार ठरलेला आहे, यातील सर्वात महत्त्वाची म्हणजे इ.स. १६७० मधील सिंहगडची लढाई जी छत्रपती शिवाजी महाराज यांचे शूर सेनापती तानाजी मालुसरे यांनी पराक्रमाने लढवली होती. निवासाच्या बुकिंगकरिता संपर्क : कुमार घाडगे ८९७५७४३६६२.

## नागपूरअंतर्गत येणारी पर्यटक निवासे

**बोधलकसा :–** गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यातील पिंडकेपर येथे बोधलकसा हे घनदाट जंगलांच्या डोंगरांनी वेढलेले एक निसर्गरम्य ठिकाण आहे. नागपूरपासून १३५ कि.मी. अंतरावर असलेले हे ठिकाण डोंगर–दऱ्यांच्या वाटा धुंडाळत नागझिरा वन्यजीव अभयारण्यामध्ये जंगल सफारीचा अनुभव आपल्याला घेता येईल. पर्यटक निवासाच्या बुकिंगसाठी संपर्क : मितेश रामटेक ९३७१६३८९३७.

**सिल्लारी :–** नागपूरपासून गजबजलेल्या शहरास रामटेक तालुक्यात अगदी मागे सोडून झाडे, रंगीबेरंगी पक्षी आणि प्राण्यांनी गजबजलेल्या या सिल्लारीच्या जंगलात आपण प्रवेश करताच आपल्याला अभूतपूर्व शांतीचा अनुभव होईल. निवासाच्या बुकिंगकरिता संपर्क : अंकित देशमुख ९०९६४४७८३२.

**वर्धा –** वर्धा जिल्ह्यातील स्थान हे स्वातंत्र्य चळवळीत अग्रस्थानी राहिले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे सेवाग्राममध्ये बराच काळ वास्तव्य राहिल्याने या जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीत मोलाचे योगदान राहिले आहे. या पर्यटक निवासाच्या बुकिंगकरिता संपर्क : अंकित देशमुख ९०९६४४७८३२.




**नागपूर –** नागपूर शहराला तुम्ही भेट देत असाल, तर निसर्गरम्य ठिकाणी शहराच्या मध्यभागी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटकांसाठी पर्यटक निवास उपलब्ध आहे. या पर्यटक निवासामध्ये २२ विविध प्रकारचे कक्ष आहे. १ एक्झिबिशन हॉल ,१ बँक्वेट हॉल, १ कॉन्फरन्स हॉल, १ उपाहारगृह आहे. बुकिंगसाठी संपर्क : मुस्कान बेग ९५२९४९७७११ / ८४२२८२२०९५.

**ताडोबा –** महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील मोहर्ली येथील सर्वात जुने आणि सर्वात मोठे राष्ट्रीय उद्यान. या उद्यानामध्ये वाघ, गवे, मगरी–सुरसी, बिबट्या, अस्वल, जंगली कुत्री, तरस, रानमांजरी, हरणाच्या जातीत, नीलगाय, सांबर, चितळ, भेकर, कोल्हे, चौशिंगा, ससे असे वन्य प्राणी, विविध पक्षी येथे पाहण्यास मिळतात. मोहर्ली येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक निवास असून, त्यामध्ये ३३ विविध प्रकारचे कक्ष आहेत. निवासाच्या बुकिंगकरिता संपर्क : विजय शेरकी ८२७५३०११५० / ७४९८०७२३०९.



**नवेगाव बांध –** नवेगाव राष्ट्रीय उद्यान हे महाराष्ट्र राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव उपविभागात वसलेले एक प्रसिद्ध राष्ट्रीय उद्यान आहे. येथील डॉ. सलीम अली पक्षी अभयारण्यात महाराष्ट्रात आढळणाऱ्या सुमारे ६० टक्के पक्षी प्रजातींची घरे आहेत. हे ठिकाण चारही बाजूंनी हिरवळ व रमणीय देखावे यांनी वेढलेले आहे. निवासाच्या बुकिंगसाठी संपर्क : मितेश रामटेक ९३७१६३८९३७.

**चांदपूर –** चांदपूर हे गाव तुमसर तालुका, भंडारा जिल्हा (विदर्भ विभाग, नागपूर मंडळ) येथे वसलेले आहे. हे गाव भंडाऱ्याच्या मुख्यालयापासून सुमारे ५० कि.मी. उत्तरेस आणि तुमसरपासून ११ कि.मी. अंतरावर आहे. हिरवळ, विस्तीर्ण परिसर आणि शांतता याने वेढलेले हे रिसॉर्ट, आरामदायी वास्तूशैली आणि निसर्गसंपन्न परिसर यांचे सुंदर मिश्रण असलेले हे ठिकाण आहे. निवासाच्या बुकिंगसाठी संपर्क : अंकित देशमुख ९०९६४४७८३२ आहे. ई–मेल gm@maharashtratourism.gov.in

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (MTDC) पर्यटक निवास केंद्रांमुळे राज्यातील पर्यटन क्षेत्राला नवे बळ मिळाले आहे. या निवास सुविधा केवळ निवासापुरत्याच मर्यादित नसून, त्या पर्यटकांच्या संपूर्ण अनुभवात भर घालणाऱ्या ठरतात. स्वच्छता, सुरक्षितता, स्थानिक खाद्यपदार्थांची उपलब्धता आणि निसर्गरम्य वातावरण या बाबींमुळे पर्यटकांना दर्जेदार व आरामदायक सेवा अनुभवता येते.

स्वस्त दरात उत्तम सुविधा देणारी ही निवास व्यवस्था महाराष्ट्रातील पर्यटन विकासात एक महत्त्वपूर्ण पायरी ठरली असून, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटकांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यास ती सक्षम ठरली आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**



# दक्षिण काशी कोल्हापूर

**केशव जाधव**

दक्षिण काशी म्हणून कोल्हापूरची ओळख देशातच नव्हे, तर अख्ख्या जगाला आहे. करवीर निवासिनी अंबाबाई हे इथले दैवत. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्णपीठ. देवीची मूर्ती मृण्मयी नव्हे, तर चिन्मयीच भासते. देवीच्या चेहऱ्यावरील भाव आत्यंतिक वात्सल्याने ओतप्रोत असल्यानेच की काय तिला जगन्माता म्हणून संबोधले जाते.

मूर्तीप्रमाणेच देवीचे मंदिरही अप्रतिम. अनेक अद्‌भुत वैशिष्ट्यांनी नटलेले. कलाकुसर तर इतकी नाजूक की, कोणी दैवी देणगी साधलेल्या सिद्धहस्त कलाकाराने ती साकारलीय याची खात्री, नजर पडताक्षणी पटते. काळ्याकभिन्न पत्थरात कोरलेले हे मंदिर सातव्या शतकात इ.स. ६३४ मध्ये बांधायला सुरुवात झाली, तर तब्बल साडेपाचशे वर्षांनंतर इ.स. १२१० मध्ये ते पूर्णत्वाला आले असे दाखले इतिहासात मिळतात; पण आमचे आजी आजोबा मात्र, दिस मावळल्यापसनं ते दिस उगवायच्या आत देऊळ बांधयचंच, असा पन करून पाचही पांडवांनी रातोरात कोंबडं आरवायच्या आत ते बांधून काढलं. बांधून झालं नसतं तर तवाच जगबुडी झाली असती, अशा दंतकथा सांगत. मंदिरासाठी विशिष्ट जागचे दगड पाहिजेत म्हणून रंकाळ्याची जागा खणली व तिथले दगड मंदिरासाठी वापरले. त्यामुळे रंकाळा तलाव निर्माण झाला, अशाही सुरस गोष्टी आम्ही ऐकायचो आणि त्यात तथ्य आहे, अशी समजूत व्हायची.

मंदिराची योजना म्हणजे एक अद्‌भुत व अप्रतिम वास्तुशास्त्राचा नमुनाच म्हणावा लागेल. पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर चारही बाजूंना चार दरवाजे. त्यापैकी उत्तर दरवाज्यावर भली मोठी घंटा बांधण्यात आली आहे. दिवसातून पाचवेळा या घंटेचा घंटानाद दुमदुमत असतो. देवी पश्चिमाभिमुख असून पश्चिम दरवाजास महाद्वार म्हणतात. तिथे देवीचा नगारखाना आहे. गाभाऱ्यासमोर सभामंडप व गरूड मंडप आहे. गरूड मंडपाच्या द्वाराची उंची १५ ते २० फूट असावी, तर महाद्वाराच्या कमानीची उंची साधारण ४५ ते ५० फूट असावी.

या मंदिराची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यांची वर्णने लिहायची, तर ग्रंथच्या ग्रंथ भरतील; पण आताचा आपला विषय मर्यादित आहे. या वैशिष्ट्यांपैकी एक व वास्तुशास्त्राचा अद्‌भुत आविष्कार म्हणजे देवीचा किरणोत्सव! वर्षातून दोनवेळा माघ व कार्तिक महिन्यात ठरावीक तिथीला, सूर्यनारायण मावळतीला आल्यावर प्रथम देवीच्या चरणकमलांना स्पर्श करून नतमस्तक होतो. त्यानंतर सलग ४/५ दिवस दरदिवशी टप्प्याटप्प्याने अगदी शिरोभागापर्यंत केशरी–सोनेरी किरणरूपी फुलांची उधळण करत अस्ताला जातो. यावेळी चिन्मयी देवीच्या मुखकमलावरील वात्सल्यभाव अधिकच खुलून दिसत असतो.

गाभाऱ्यापासून महाद्वार अंतर साधारणत: २५० ते ३०० फूट असावे. अस्ताच्या सूर्याची समांतर किरणे क्षितिजापासून सरळ देवीच्या चरणस्पर्शासाठी येऊन ठेपतात. चरणावर केशरी–सोनेरी किरणांचा मुक्त अभिषेक करून धन्य पावतात. पुढे ४/५ दिवस नित्याने हा अभिषेक सर्वांगावर किरणरूपी फुलांची उधळण करत चालू असतो. यावेळी मंदप्रकाशात देवीचे उजळून निघालेले रूप विलोभनीय, असीम व स्वर्गीय आनंददायी असते.

हा चमत्कार वाटत असला तरी, तत्कालिन वास्तुविशारदाचे खगोलशास्त्रीय ज्ञान वैशिष्ट्यपूर्ण असावे. ठरावीक तिथीला विशिष्ट अक्षांश रेखांशांच्या स्थितीत सूर्याची तिरपी किरणे गाभाऱ्याचे प्रवेशद्वार छेदून देवीच्या चरणस्पर्शासाठी रूजू होतील, असा आराखडा त्यांनी बनवला असणार. की न जाणो, किरणोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी सूर्यनारायणानेच आपला मार्ग वळवला असावा!

**(अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन.)**

**आमच्या संस्कृतीचा गुणगौरव करताना आम्ही पाश्चात्त्यांचे काही गुणवैशिष्ट्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. मंत्रालयातील कामाचा तुम्हा प्रत्येकालाच अनुभव आहे. मात्र अमेरिकासारख्या देशातील कार्यसंस्कृती कशी असेल? तेथील कार्यालयातील अधिकाराची उतरण, टापटीपपणा आणि कार्यसंस्कृती आपल्यापेक्षा निश्चितच वेगळी आहे.**

# अमेरिकेतील कार्यसंस्कृती

**निकिता नि. जैतपाल**

मागील वर्षी माझी मुलगी बी.ई. झाल्यानंतर एम.एस.च्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेली. या अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच्या उन्हाळी सुट्टीत तिला अमेरिकेतच अन्य एका ठिकाणी १० आठवड्यांसाठी इंटर्नशिप मिळाली. या ठिकाणी ती एकटीच राहणार असल्याने तिला सोबत म्हणून मला १० आठवडे तिकडे जाऊन राहण्याचा योग आला. यापूर्वीदेखील मी १५-१५ दिवसांसाठी २ वेळा अमेरिकेला जाऊन आले; पण आता बराच काळ तिथे वास्तव्य केल्यामुळे तिथल्या अनेक गोष्टी जवळून पाहता, अनुभवता आल्या. त्यातल्या कित्येक गोष्टी मन अचंबित करणाऱ्या होत्या. तिथली माणसे, त्यांचे मॅनर्स त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी, तिथली स्वच्छता, याबरोबरच माझी मुलगी तिथे नोकरीस जात असल्याने तिकडे कामाच्या ठिकाणी कसे वातावरण असते, याबाबतदेखील मुलीकडून माहिती मिळाली.

ती रोज घरी आल्यावर तो दिवस कसा गेला, याबद्दल बोलत असे. ते ऐकून मी कधी *(खरेतर बरेचदा)* आश्चर्यचकित होत असे. कधी गंमत वाटे. कधी असूया, तर काही गोष्टी ऐकून खूप हसूही येत असे. मीही इथे नोकरी करत असल्याने नकळत मनात तुलना सुरू होई. अगदी सुरुवात करायची, तर तिथे कितीही वरिष्ठ पदावरील तुमचे स्वागत करतात. तुम्हाला काही मदत हवी आहे का? असे अदबीने विचारतात. पैसे द्यायच्या काऊंटरवरदेखील पावती पिशवीत ठेवायची की, हातातच द्यायची असेदेखील विचारतात. तिकडची वस्तू परत करण्याची पद्धतसुद्धा मला खूप आवडली. तुम्ही आणलेली कोणतीही वस्तू *(अगदी खाण्याच्या वस्तूदेखील)* जर तुम्हाला कोणत्याही कारणाने नको असेल, तर तुम्ही ती पुन्हा परत करू शकता. कोणतीही कारणे न विचारता तुम्हाला हवी असलेली दुसरी वस्तू अथवा त्या वस्तूचे पैसे तुम्हाला परत मिळतात. माझ्यासाठी ही बाब नवलाईचीच होती. मला आपल्याकडच्या दुकानातील पाट्या आठवल्या. एकदा विकत दिलेला माल परत घेतला जाणार नाही. वस्तू परत घ्यायची बाब सोडाच; पण काही वस्तू *(विशेषतः कपडे)* बदलून घ्यायचे असतील, तरी आपल्या दुकानामध्ये त्यासाठी ठरावीक वेळेचा बोर्ड लिहिलेला असतो.

तिकडची आणखी एक अत्यंत चांगली गोष्ट म्हणजे तुमचे काम आणि तुमचे कपडे यावरून तुमची प्रतिष्ठा ठरवली जात नाही. कोणतेही काम कमी दर्जाचे मानले जात नाही. तिकडे मुले-मुली वयाच्या १८ वर्षांनंतर स्वतंत्रपणे राहायला लागतात. त्यानंतरचे त्यांचे शिक्षण, राहणे, खाणे-पिणे इत्यादी सर्व खर्च ते कोणतीही छोटी-मोठी कामे करून भागवतात. त्यासाठी ते आई-वडिलांवर अवलंबून राहत नाहीत. त्यामुळेच असेल कदाचित त्यांना योग्य वयात स्वावलंबनाचे धडे मिळतात. तरुण मुले-मुली किंवा अन्य गरजू व्यक्तीदेखील हॉटेल, रेस्टॉरंट, मॉल, पेट्रोल पंप्स इत्यादी ठिकाणी कामे करताना दिसतात; पण त्यात कोणालाच काही लाज वाटत नाही आणि असे बरोबरच आहे. योग्य मार्गाने पैसे मिळवण्यात कसली



आली आहे लाज! मी जिथे राहिले होते, तेथे दर शनिवारी आपल्याकडील आठवडी बाजारासारखा बाजार भरत असे. तिकडे त्याला 'फार्मर्स मार्केट' असे म्हणतात. हा बाजार एका विशिष्ट ठिकाणी भरतो. तेथील लोक त्यांच्या घरी बनवलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ; तसेच त्यांच्या मळ्यातील फळे, भाजीपाला, फुले इत्यादी आपापल्या गाडीतून भरून त्या बाजारात विकायला आणतात. प्रत्येकाने आपापली टेबल्स, खुर्च्या, छत्र्या इत्यादी सामान आणून त्यावर वस्तू विक्रीसाठी मांडायच्या. तेथील वातावरण खूप प्रसन्न आणि उत्साही असते.

आपल्याकडे पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्याचे फॅड आहे; पण तिथे राहून आल्यावर मला असे जाणवले की, आपले लोक तेथील वाईट गोष्टींचेच अनुकरण करताना दिसतात. मी वर सांगितलेल्या आणि सांगण्याचे राहून गेलेल्या अशा कितीतरी चांगल्या गोष्टी तिकडे पाहायला, अनुभवायला मिळतात. आपल्या तरुण पिढीने पाश्चिमात्यांच्या अशा सर्व चांगल्या गोष्टींचे अनुकरण केले पाहिजे.

**(निवृत्त अधिकारी, महाराष्ट्र शासन.)**

**अनिष भोईटे**

# लडाख : दुर्गम आणि चित्तथरारक

लहरी निसर्गाच्या कुशीत वसलेल्या लेहलडाखची सफर हा एक आनंददायी अनुभव असतो. ही सफर अतिशय कठीण आणि अडीअडचणींची आहे. तरीसुद्धा साहसी पर्यटकांना लेहलडाख सतत आकर्षित करत असते. मराठी भाषा विभागातील अनिष भोईटे हा श्रवणविकलांग साहसवीर नुकताच या ठिकाणी जाऊन आला. या चित्तथरारक सफरीचा वृत्तांत त्याच्याच शब्दांत..

शनिवार ९ जुलै २०१६ आम्ही सकाळी वाजता घरून सर्वांचा आशीर्वाद घेऊन निघालो बांद्रा टर्मिनलकडे... तिथून आम्ही आमच्या बाईकसह ट्रेनमधून जम्मूतवीपर्यंत जाणार होती. त्यानंतर आम्ही आमच्या रिझर्व्ह बर्थवर जाऊन सामान लावलं. सोबत आलेल्या मित्रांना भेटलो. दुपारी १२.३०ला आमची यात्रा सुरू झाली, जम्मूकडे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब मागे टाकत आम्ही ११ जुलै २०१६ रोजी सकाळी १.३० वाजता जम्मूला पोहोचलो व पुढच्या प्रवासाची सुरुवात लडाखपर्यंत बाईकद्वारे केली. ३० जुलैला प्रवास समाप्त केला. २२ दिवस घरच्यांपासून लांब. एवढा मोठा प्रवास तोसुद्धा बाइकवर

५,५०० कि.मी.चा प्रवास... जगातील सर्वांत उंच असा मोटोरेबल रोड ६ राज्य काश्मीर खोऱ्याचा चित्तथरारक अनुभव अशा न भूतो न भविष्यती प्रवासाचा शेवटसुद्धा अद्वितीय होता.



लडाखचा मार्ग, हिमालयाच्या पर्वतरांगा अशा होत्या की, एक संपला की लगेच दुसरा सुरू. सलग चढ-उतार वेगवेगळे प्रदेश तिकडची माती, रचना, डोंगरांचा आकार, सर्व काही अद्‌भूत असंच होतं. खरंच Truly its heaven on the earth, डोळ्यात जेवढं साठवता येईल, तेवढं साठवत राइड चालू होती.... मध्येच कधीतरी लक्ष विचलित व्हायचं.... मग एखाद्या वळणावर पडता-पडता वाचायचं हे असंच चालू होतं.

प्रत्येक गोष्टीत सहकार्य आणि पाठिंबा हा खूप महत्त्वाचा मानला जातो. त्यामध्ये मला माझ्या रायडिंग ग्रुप Valiant Riderz मधील सर्व सदस्य खासकरून विनायक गुरव, विकास शेट्टी, अरविंद घोगले, आलोक पाटील, सिद्धेश कसले, निशांत राऊत यांनी खूप पाठिंबा व मार्गदर्शन केले.

आम्हाला लागणाऱ्या वस्तू कुठून घ्याव्यात.... कशा घ्याव्यात सर्व टिप्स मिळायच्या. खासकरून विनयदादा स्वतः लडाखला जाऊन आला होता.... त्याने आम्हाला तिकडचे रोड..... लागणाऱ्या वस्तू.... कशाप्रकारे ड्राईव्ह करावं, याबाबत टिप्स दिल्या होत्या. मला या राइडसाठी माझ्या विभागाच्या (मराठी भाषा विभाग) उपसचिव गावडेमॅडम यांनीसुद्धा खूप मदत केली. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी निर्धास्त होऊन तयारी करू शकलो.

मंत्रालयमध्ये मी मराठी भाषा विभागामध्ये कार्यरत असून मला २२ दिवसांची सुट्टी या प्रवासासाठी मिळाली. आतापर्यंत बाइकवर कोणताही प्रवास केला नव्हता. या प्रवासाचा पहिलाच माझा विलक्षण असा अनुभव होता. ५,५०० कि.मी.चा प्रवास.... जगातील सर्वात उंच असा मोटोरेबल रोड....६ राज्ये.... काश्मीर खोऱ्याचा चित्तथरारक अनुभव. अशा न भूतो न भविष्यति प्रवासाचा शेवटसुद्धा अद्वितीय असा झाला. घरी गेलो.... तेव्हा कळलं मी गेल्यापासून आई आजारी होती..... माझ्या काही मित्रांनी तिची काळजी घेतली; पण मला कोणीच काही सांगितलं नव्हतं. तिलासुद्धा माझ्या या प्रवासाची चांगली कल्पना होती.....पण माझं स्वप्न पूर्ण करण्याचा हट्ट बघून तिनं उघडपणे विरोध केला नाही.... प्रत्येक गोष्टीत पाठिंबा.... फक्त स्वतःची काळजी घेण्याचा सल्ला आणि मी दिलेल्या आश्वासनामुळे तिने मला परवानगी दिली होती. मी परतल्यावर ती प्रफुल्लित झाली होती. काय करू नी काय नको, असं झालं होतं!

**(सहायक कक्ष अधिकारी, वन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

शुभांगी विष्णु रायते

# मी पाहिलेला सह्याद्री...

## लिंगाणा चढाई

लिंगाणा चढाईबद्दलचे व्हिडिओ यु-ट्यूबवर आधी बघितले होते. त्या चढाईचा थरार अप्रत्यक्षपणे अनुभवला होता. १००० फुटांची चढाई आणि उतरणे ही सोपी गोष्ट नाही, याची कल्पना आली होती. मी आणि माझ्यासारखेच ट्रेकवेडे माझे मित्र महेंद्र पासलकर, रोहित चंद्रस, दीपक शेळके आणि डॉ. भारती जगदाळे यांनी लिंगाणावर चढाई करायचे ठरवले. या कंपूला आम्ही गमतीने *चलो चलो ट्रेकर्स* असे म्हणतो. वरून कोणी तसे दाखवत नव्हते; पण प्रत्येकाच्या मनात थोडी भीती ही होतीच. तांत्रिक चढाईची कोणाला सवय नव्हती म्हणून



आमच्या सुपीक डोक्यात एक कल्पना आली की, आपण सरावासाठी शिवाजी नगर येथील कृत्रिम भिंतीवर चढाईची सवय करू. एकदा तसा निष्फळ प्रयत्न केला आणि कळले की, आपण म्हणतो तितके हे सोपं काम नाही. तरीही इच्छाशक्तीच्या जोरावर आम्ही या ट्रेकला जायचं ठरवलंच. आम्ही ठरवले आणि तेवढ्यात एक संधी चालून आली. एक्सप्लोरर्स, पुणे या संस्थेने ३१ डिसेंबर ला लिंगाणाची मोहीम आखली होती. घरच्यांना सांगितले की, आम्ही ३१ डिसेंबरला एका ओव्हर नाईट ट्रेकला चाललो आहोत.

ट्रेकची सुरुवात ३१ तारखेला १ वाजता झाली. ट्रेक लीडर यांनी आम्हाला ट्रेकच्या दरम्यान करावयाचा नाश्ता व जेवणाची शिदोरी दिली. आम्ही आमचा प्रवास बसने दुपारी १.३० वाजता मोहोरी गावाच्या दिशेने चालू केला. महामार्ग सोडल्यानंतर रस्त्याने आपली जाणीव करून द्यायला सुरुवात केली. वेल्ह्यानंतर तर परिस्थिती आणखीनच बिकट झाली. सिंगापूरकडे जशी बस वळली, तेव्हा तर आम्ही बसमध्ये बसलो आहोत की बोटीमध्ये हेच कळत नव्हते. आमचा प्रवास संध्याकाळी ६ वाजता मोहोरी गावात संपला. आमच्या टीम लीडरने मस्तपैकी चहा केला होता, तो घेतला आणि स्थिरावलो.

मोहरी हे जेमतेम १५ ते २० घरांचे गाव. तिथे एका घरात जेवणाची व झोपण्याची व्यवस्था करण्यात आली होती. नाचणीची भाकरी, वांगं, बटाटा भाजी, वरण आणि भात यावर मनसोक्त ताव मारून रात्री ९ वाजता वर्षाच्या शेवटच्या दिवसाला गुडबाय केले. पहाटेच्या साधारण ३ वाजता ट्रेकला सुरुवात केली व बोराट्याच्या नाळेमधून खाली उतरत आम्ही लिंगाण्याच्या पायथ्याला पोहोचलो आणि तिथूनच लिंगाण्याच्या थरारक चढाईला सुरुवात केली. सुमारे पाच टप्प्यात अतिशय कठीण, शारीरिक व मानसिक कस लागणारी चढाई करून आम्ही शेवटी लिंगाण्यावर ९ वाजता पोहोचलो. लिंगाण्यावरून समोर दिसणाऱ्या अलौकिक अशा रायगडाला पाहून धन्य झालो. असं म्हणतात की, स्वराज्याचं कारागृह हे लिंगाण्यावर होतं. लिंगाण्यावरून चोहोबाजूंनी वेढलेल्या सह्याद्रीच्या रांगा, रायलिंग पठार पाहताना आम्ही मंत्रमुग्ध झालो.

आता सुरू होते लिंगाण्याची उतराई, जी की अजूनच कठीण वाटायला लागते, कारण सूर्य डोक्यावर यायला सुरुवात झाली होती. टीम एक्सप्लोरर्सच्या मदतीने व दोरीच्या साहाय्याने पहिले दोन टप्पे पार करून मध्यापर्यंत येऊन जेवणासाठी एकमेव गुहेमध्ये थांबलो. एव्हाना सर्वांच्याकडे असणारे पाणी संपले होते. जाताना रस्त्यात कोठेही पाण्याची सोय नसल्याने गुहेच्या दुसऱ्या बाजूस असणाऱ्या एकमेव पाण्याच्या टाक्यामधून सर्वांनी पाणी भरून घेतले आणि पुढच्या उतराईला सज्ज झालो.

शेवटचे तीन टप्पे सर्वांनी हळूहळू रॅपलिंग करत पार करून शेवटी लिंगाण्याचा पायथा गाठला. थोडावेळ विश्रांती घेऊन बोराट्याच्या नाळेमधून चढाई सुरू केली. डोक्यावर आलेला सूर्य आणि पहाटेपासून सुरू असलेली दमछाक यावर मात करून अखेर वरती पोहोचलो आणि मागे पाहून सह्याद्रीच्या या अजस्त्र लिंगाण्याला नतमस्तक होऊन निरोप घेतला. १६ तास चाललेला प्रवास अखेर संपुष्टात आला. तुमच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा कस लावणारा हा ट्रेक तुम्हाला बरंच काही शिकवून जातो. एका दोरीवर आपले आयुष्य अवलंबून असते, याची प्रचिती आली. अशी मोहीम फक्त आणि फक्त तुमच्या इच्छाशक्तीवर आणि संयोजकांवर भरवसा ठेवूनच शक्य होऊ शकते हे कळले. मोहीम यशस्वी पार केल्यावर जे आत्मिक समाधान मिळाले ते अवर्णनीय आहे. ही मोहीम यशस्वी करण्यास मदत करणाऱ्या टीम एक्सप्लोरर्सच्या गिरीश सर, सुनील सर, महेश आणि दिनेश यांचे आणि ट्रेकदरम्यान कठीण चढाईला एकमेकांचे बळ वाढवणारे माझे 'चलो चलो ट्रेकर्स' यांचे आभार...

(संशोधन अधिकारी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन.)


# व्हिएतनामचा धाडसी प्रवास

**नीता गिरीश कुरणे**

युद्ध म्हटलं की, रशिया–युक्रेन किंवा इस्त्राईल–हमास आठवतात; पण जगात असंही एक युद्ध झालं होतं, जे २० वर्षं चाललं ते म्हणजे व्हिएतनाम युद्ध. उत्तर आणि दक्षिण भागांमधील या संघर्षानंतरही हा देश आज प्रगतीच्या वाटेवर आहे आणि पर्यटकांसाठी आकर्षण ठरतोय.

म्हणूनच मी कुटुंबासोबत व्हिएतनामची निवड केली. ट्रॅव्हल एजन्सीऐवजी स्वतः नियोजन करण्याची माझी सवय असल्याने विमान, व्हीसा, हॉटेल आणि हा लॉंग बेमधील जहाजाचे बुकिंग आधीच केले. एकूण १६ दिवसांच्या प्रवासात केवळ दोनच रात्रीचे बुकिंग निश्चित होते.

दरम्यान भारतात युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने घरच्यांमध्ये चिंता वाढली; पण आमचा प्रवास दक्षिणेकडे असल्याने शेवटी आम्ही जायचे ठरवले. अनिश्चिततेतून सुरू झालेला हा प्रवास एक साहसी अनुभव ठरणार होता.



कु ची टनेल्सच्या आतील चिंचोळा बोगदा

## व्हिएतनामची राजधानी हनोई

साधारण साडेचार तास प्रवास करून आम्ही मुंबईहून व्हिएतनामची राजधानी असलेल्या हनोई शहरात सकाळी ५.३०ला पोहोचलो. विमानतळावरील सर्व औपचारिकता पूर्ण करून आम्ही हनोई शहरात प्रवेश केला. हनोई मुख्य शहर आंतरराष्ट्रीय विमानतळापासून साधारण २५ कि.मी.वर आहे. व्हिएतनामी लोकांना त्यांच्या मातृभाषेत बोलायला आवडते. त्यामुळे व्हिएतनाममध्ये नियमित संवाद साधण्यासाठी गुगल ट्रान्सलेटर ॲपशिवाय पर्याय नाही. हनोई आंतरराष्ट्रीय विमानतळावर माझ्या फक्त पहिल्या नावाची पाटी घेऊन हॉटेलने पाठविलेला ड्रायव्हर आमची वाट बघत उभा होता.

आमचे सगळे सामान गाडीत चढवून आम्ही गाडीत जाऊन बसलो. ड्रायव्हरला इंग्रजी भाषा येत नसल्याने आमच्या हॉटेलचे नाव त्याला दाखवले त्यावर तो फक्त Ok बोलला. कुठलेही इतर संभाषण नसताना अनोळखी देशात आम्ही त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून व्हिएतनाममधील पहिल्या दिवसाची सुरुवात केली.

विमानतळापासूनच हनोई शहरातील स्वच्छ आणि सुंदर रस्ते, रेड रिव्हरवरचा सस्पेंशन ब्रीज यांनी आम्हाला मोहून टाकले ही सगळी दृश्ये बघत आम्ही हनोईचे मुख्य शहर ज्याला ओल्ड क्वार्टर असे म्हणतात तिथे पोहोचत आलो. सकाळचे ७.३० वाजत आले होते; पण संपूर्ण शहर जागे झाले होते, बरीचशी दुकाने उघडली होती. हॉटेलमध्ये पोहोचलो, रूममध्ये जाऊन फ्रेश होऊन नाश्ता करण्यासाठी हॉटेलच्या रेस्टॉरन्टमध्ये आलो.

व्हिएतनामी लोक मुख्यत्वे करून मांसाहारी आहेत. त्यामुळे नाश्त्यात बहुतेक पदार्थ मांसाहारी होते. मी पूर्णपणे शाकाहारी असल्याने आता मी काय खाऊ शकेन, हाच विचार करत असताना हॉटेलमधल्या एका हसतमुख वेटर मुलीने मला मोडक्या–तोडक्या इंग्रजीत हातवारे करत मी काय खाणार म्हणून विचारले, मी पण खाणाखुणा करत तिला समजेल अशा इंग्रजीमध्ये मी शाकाहारी असल्याचे तिला सांगितले. त्यावर ती मला बोलली मी व्हिएतनामी विशेष नाश्ता तुमच्यासाठी आणते. तिने माझ्यासाठी भरपूर भाज्या, पालेभाज्या आणि मोड आलेली कडधान्य घातलेले गरम–गरम नूडल सूप आणले. त्यासोबत खायला सोयाबीनचे पनीर, मी तिला विचारले, याला काय म्हणतात. तिने सांगितले, याला फो बोलतात आणि व्हिएतनाममध्ये मुखत्वे करून नाश्त्याच्या वेळी खातात.

फो चवीला एकदम मस्त होते. ते खाऊन सगळा प्रवासाचा थकवा लांब पळाला. व्हिएतनामी लोक मांसाहारासोबतसुद्धा भरपूर पालेभाज्या खातात. अशा प्रकारच्या आहाराच्या सवयीमुळेच व्हिएतनाममध्ये लठ्ठ किंवा अतिलठ्ठ माणसे विराळाच दिसतात. नाश्त्या नंतरचा उर्वरित दिवस आम्ही हनोई शहरातील बिअर स्ट्रीट, ट्रेन स्ट्रीट, होआन कीम लेक अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे बघत घालवला आणि संध्याकाळी सहा वाजता वॉटर पपेट–शो बघण्यासाठी थाग लॉंग थेअटरमध्ये गेलो. वॉटर पपेट म्हणजेच पाण्यातल्या कठपुतळ्या. साधारण ११व्या शतकापासून चालत असलेला व्हिएतनाममधील हा एक पारंपरिक कलाप्रकार आहे. यामध्ये गायक आणि वादक स्टेजवर बसलेले असतात आणि खाली एका छोट्याशा तळ्यात उभे राहून कलाकार पडद्यामागून लाकडाने बनवलेल्या आणि लाखेचा मुलामा चढवलेल्या कठपुतळ्यांना नाचवत असतात. व्हिएतनामी संस्कृतीमधल्या विविध परिकथा, पुराणकालीन कथा, व्हिएतनामचे ग्रामीण जीवन अशा विविध विषयांवरील कथा गायनाच्या माध्यमातून कठपुतळ्या आपल्यासमोर सादर करत असतात.

दुसऱ्या दिवशी हनोईला रामराम करून आम्ही व्हिएतनामच्या क्लाऊड कॅपिटल सापा शहराकडे निघालो. तिथे ३,१४७ मी उंच फॅनसिपेन शिखर आहे. चालत चढायचं झाल्यास २–३ दिवस लागतात; पण सर्वांना सहज पोहोचता यावं म्हणून केबल कारची सुविधा आहे. अवघ्या ३५ मिनिटांत शिखर गाठता येतं. ढगांतून जाणारा केबल कारचा प्रवास हा अत्यंत रोमहर्षक अनुभव होता.

## व्हिएतनामचे जनक हो चि मिन्ह सर


व्हिएतनाम देश साधारणपणे इंग्रजी ड आकाराचा असून प्रामुख्याने उत्तर व्हिएतनाम, मध्य व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाम अशा तीन भागांमध्ये विभागलेला आहे. उत्तर व्हिएतनाममधल्या विविध भागात

पाच दिवस भटकंती केल्यावर आम्ही थेट दक्षिण व्हिएतनाम मधल्या हो चि मिन्ह शहरात आलो. हो चि मिन्ह यांना व्हिएतनामचे जनक म्हणतात. विविध तुकड्यांमध्ये विभागलेल्या व्हिएतनामचे एकत्रिकरण करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सर्व व्हिएतनामी लोकांच्या मनात त्यांच्याविषयी अतिशय आदर आहे. व्हिएतनामची आर्थिक राजधानी असलेल्या सायगॉन शहराला हो चि मिन्ह सरांचे नाव देण्यात आले आहे. या शहरापासून साधारण ४३ कि.मी. अंतरावर कु ची टनेल आहेत. व्हिएतनामच्या युद्धकाळात व्हिएतनामच्या सैनिकांनी शत्रूपासून वाचण्यासाठी, पुरवठा वाहतूक करण्यासाठी, वैद्यकीय उपचार घेण्यासाठी, हवाई हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी जमिनीखाली खणलेल्या हजारो किलोमीटर लांबीच्या अतिशय चिंचोळ्या आकाराच्या बोगद्यांचे जाळे म्हणजे कु ची टनेल्स. या बोगद्यांनी युद्धामधील भयंकर दुःख पाहिले, त्या दुःखावर मात करून देशाला शत्रूच्या तावडीतून मुक्त करण्याचा व्हिएतनामी लोकांचा दृढनिश्चय बघितला आहे.



व्हिएतनाम युद्धात वापरलेले बॉम्ब

व्हिएतनाम युद्धाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यासाठी येणारे माझ्यासारखे पर्यटक व्हिएतनामच्या अशांत युद्धकाळात परत जाण्याचा अनुभव येथे घेऊ शकतात. पर्यटकांना युद्धकाळाचा अनुभव देण्यासाठी जमिनीखाली खणलेल्या १०० मीटर लांबीच्या बोगद्यामध्ये तुम्ही प्रत्यक्ष जाऊन उष्णकटिबंधीय हवामानात सैनिक कशाप्रकारे राहत होते, याचा अनुभव घेऊ शकता. दुसऱ्या दिवशी हो चि मिन्ह शहरातल्या वॉर रेमिसन्ट म्युझियमला भेट दिल्यावर मन खूप उदास आणि खिन्न झाले. राजकीय लाभासाठी होणाऱ्या युद्धात सर्वसामान्य माणसे आणि सैन्य यांना किती भयंकर यातना सोसाव्या लागतात, याचा प्रत्यय तिथल्या दालनात ठेवलेल्या प्रत्यक्ष युद्धात वापरलेल्या विविध वस्तू जसे की ग्रेनेड, अर्धवट फुटलेले बॉम्ब, युद्धात वापरलेली विमाने इ. बघितल्यावर येतो.



हा लॉग बे व्हिएतनाम

## के बँग नॅशनल पार्क

व्हिएतनाम युद्धाच्या खुणा अनुभवून आम्ही मध्य व्हिएतनाममधील फोंग न्हाकडे निघालो. आधीचे दोन दिवस हो आन आणि दानांग शहरात घालवले. ठरवलेले ठिकाण पाहून दोन दिवस आधीच हॉटेल आणि बस बुकिंग करत आम्ही प्रवास करत होतो.

दानांगहून फोंग न्हाकडे जाणारी बस रात्री १२ वाजता हायवेवर सोडून गेली. पुढे ४० कि.मी. जंगलातून प्रवास होता. त्यामुळे थोडी भीती वाटत होती. मात्र आमच्या होमस्टेच्या मालक स्त्रीने स्वतःची गाडी पाठवून, आम्हाला रात्री उशिरा उचलले आणि पोहोचल्यावर गरमागरम जेवण दिले. 'अतिथी देवो भव'चा खरा अनुभव आम्हाला तिथे मिळाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी गॅलरीतून दिसणारे नदीकाठी वसलेले डोंगरांतील गाव पाहून दिवसाची सुरुवात सुंदर झाली. नाश्त्यानंतर आम्ही के बँग नॅशनल पार्कमधील प्रसिद्ध पॅराडाईस गुहा पाहायला निघालो. अर्धा डोंगर चढून पोहोचलेल्या या आशियातील सर्वात लांब कोरड्या गुहेतील ३५० दशलक्ष वर्षे जुन्या नैसर्गिक शिल्पांनी स्वर्गीय भास निर्माण केला.

दुपारी जंगलातील अन्न आणि पेय घेतल्यानंतर आम्ही फोंग न्हा गुहेत बोटीने गेलो. गुहेतून वाहणाऱ्या नदीतून प्रवास करत लाओसपर्यंत पोहोचता येते. गुहेत अंधार असला तरी नैसर्गिक कलाकृती उजळण्यासाठी विशेष लाइट्स लावले होते. बॉम्बमुळे उभे चिरलेले डोंगर युद्धाची आठवण करून देत होते. निसर्गाच्या या अद्भुत सौंदर्याचा अनुभव घेत आम्ही परतीच्या वाटेला लागलो.

व्हिएतनाममधल्या विविध शहरात, अगदी छोट्या गावात, जंगलात फेरफटका मारताना मला एक गोष्ट जाणवली, इतकी वर्षे युद्ध होऊनदेखील इथल्या लोकांच्या प्रमाणिकपणामुळे आणि चिकाटीमुळे इथला विकास थांबलेला नाही. इथल्या खाद्यसंस्कृतीमुळे लोक नेहमी आनंदी आणि उत्साही असतात. इथे गुन्हेगारीचे प्रमाण अत्यल्प आहे. स्त्रिया सर्वच क्षेत्रात काम करताना दिसतात. पर्यटनाच्या सोयी तर अतिशय उत्कृष्ट आहेत. त्यामुळे इंग्रजी भाषेचा वापर होत नसताना देखील जगाभरातून पर्यटनासाठी येणाऱ्या लोकांची संख्या खूप आहे. त्यामुळेच प्रवासाआधी कुठलेही विशेष नियोजन नसताना सुरू केलेला आमचा प्रवास अतिशय सुखकर आणि आनंददायी झाला. व्हिएतनामबद्दल लिहावे तितके कमीच आहे...असो.. काम ऊन मोग ओई *(व्हिएतनामी भाषेत सर्वांचे आभार)*.

**(सहायक कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.)**

**मोनिका गायकवाड**

# माझी परदेशवारी : युरोप

*ए काश के हम, होश में अब आने ना पाए,*
*बस नगमे तेरे प्यार के गाते ही जाए...*

अशीच अवस्था झाली होती माझी, जेव्हा मी माझ्या आयुष्यातल्या पहिल्या परदेश प्रवासाची सुरुवात केली. कधी महाराष्ट्र सोडून बाहेरच्या राज्यात न गेलेली मी, कधी विमानातसुद्धा न बसलेली मी, कास पठार, रायगड, प्रतापगड, हम्पी, बदामी अशी बकेट लिस्ट मधली जवळची असलेली ठिकाणे पाहून झाल्यावर, कित्येक वर्षांपासून मनात असलेले युरोपवारीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आतूर झाले होते. पासपोर्टवर पहिला स्टॅम्प घेईन तर युरोपचाच, हा स्वतःचाच हट्ट पूर्ण करण्यासाठी मी तयारीला लागले.

schengen visa मिळायला अवघड असतो, rejection चे प्रमाण जास्त आहे, एकटी कशी जाणार? असले शंभर प्रश्न, त्यावर शोधलेली उत्तरे या सर्वांतून वाट काढत एकदाचे मी वीणा वर्ल्डमधून युरोप ट्रीपचे बुकिंग केले. व्हिसा मिळेल की नाही, याची अजिबात शाश्वती नव्हती; पण नशिबात असेल ते होईल, या विचाराने मी माझ्या परीने शंभर टक्के प्रयत्न केले. मैत्रिणींच्या शुभेच्छांचे फळ म्हणजे १५ दिवसांतच माझा visa approve होऊन आला.

बघता-बघता तो दिवस उगवला, २० मे २०२४. आमची फ्लाईट अबूधाबीला जाऊन तिथून पॅरिसला अशी होती. सर्वांना जिथे एकत्र यायला सांगितले होते, तिथे येऊन पाहिले तर किती तरी बायका - मुली भरपूर बॅग्स घेऊन आल्या होत्या. ड्रेस कोड पिवळा असल्यामुळे लगेच कळत होते की, या आता आपल्या सोबत असणार आहेत. कुणी एकदम गोंधळलेले (just like me) कारण त्यांचापण पहिलाच परदेश प्रवास, तर कुणी याआधी दोन चार वेळा बाहेर जाऊन आल्याने त्यांच्या वागण्यात थोडा आत्मविश्वास, अशा आम्ही सर्व ३२ जणी एका रांगेत जाऊन अबुधाबीच्या आणि पॅरिसच्या connecting flights ची tickets घेतली. आतमध्ये मुंबईचा सगळा चकचकीतपणा, लख्ख उजेड, आकर्षक custom free ची दुकाने बघत आम्ही सगळ्या लेडीज निघालो होतो, अपने सपनों को पूरा करने. हो कारण आमची ट्रीपच लेडीज स्पेशलची होती. १०.३० वाजता गेटचे दरवाजे उघडले आणि आम्ही एक-एक करून आमच्या विमानामध्ये जाऊन बसलो. आपण पहिल्यांदा भारताच्या बाहेर जात आहोत, कुणीही ओळखीचे नाही, विमान रात्री २.३० वाजता अबूधाबीला पोचणार होते, तिथे जाग येईल का? या विचारात झोपच लागली नाही. तेवढ्यात अबूधाबी आल्याची अनाऊन्समेंट झाली. झिम्मा चित्रपटाच्या सारखा आमचा tour manager veena world चा झेंडा घेऊन सर्वांत पुढे चालत होता आणि आम्ही सगळ्या जणी आपापली बॅग सांभाळत अबूधाबीचे सुंदर एअरपोर्ट नजरेत साठवत आणि Veena world च्या झेंड्याला नजरेआड होऊ न देता पटापट चालत होतो. *(हा scene पुढचे १४ दिवस थोड्या फार फरकाने same च घडत होता.)*

कॉलेजला असल्यापासून पॅरिसबद्दल असलेले आकर्षण, दा विंची कोड पुस्तकामुळे अजूनच तीव्र झाले. त्या माझ्या dream city मध्ये आम्ही सकाळी ७.३० वाजता उतरलो. Veena World ची बस आम्हाला नेण्यासाठी तयारच होती. आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आमचा युरोप प्रवास, 'चक दे इंडिया'मधल्या *बादल ये पाव है* गाण्याची आठवण येत होती. कारण माझ्यासाठी ही trip एक मोहीमच होती. नवे विश्व अनुभवाया!! सर्वात आधी पाहिला L'Arc De Triomphe. फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियन युद्धाच्या वेळी शहीद झालेल्या सैनिकांचे स्मारक. उंच चौकोनी स्मारक, त्यावर चारी बाजूंनी कोरलेले विविध प्रसंग, त्या स्थापत्यशैलीतले सगळे बारकावे कळत नसले तरी त्या हजारो गुमनाम कारागिरांच्या प्रतिभेचे कौतुक करत आम्ही पॅरिसमधला महत्त्वपूर्ण चौक place de la Concorde मध्ये पोहोचलो. जगाला समतेची शिकवण देण्याऱ्या फ्रेंच राज्यक्रांतीचे पहिले स्थळ. थोडा वेळ पॅरिसच्या Champs Elysees परिसरात फिरलो, जिथे रोमन शैलीच्या उंच-उंच आणि विविध शिल्पकला केलेल्या इमारती



आहेत. ते सगळे बघताना इथून पुढे जावेसेच वाटत नव्हते; पण ये तो झांकी है, दिल्ली अभी बाकी है असा प्रत्यय जसे-जसे पुढे जाऊ तसा येत गेला. आम्ही दुसऱ्या दिवशी निघालो जगप्रसिद्ध आयफेल टॉवर बघायला. जसजसे जवळ जायला लागलो, तशी त्याची भव्यता जाणवायला लागली. तिथे २ मजले आहेत पर्यटकांना खुले. आम्ही आधी EIFFLE summit वर गेलो. अन् वाह!! काय अप्रतिम नजारा दिसला संपूर्ण परिस शहराचा!! थोडा पाऊस सुरू होता. भरपूर वारे सुरू होते. अन् आम्ही त्या पावसाची, वाऱ्याची तमा न बाळगता ते दृश्य मनात अन् of course कॅमेऱ्यात साठवण्यात मग्न होतो. Trip ला जातानाच मैत्रीणींना म्हणाले होते, Eifle Tower वरून video call करेन. माझ्यासोबत मला मैत्रिणींना पण Eifle towशी वरून पॅरिस शहराचा नजारा दाखवता आला. पुन्हा कधीतरी आपण सर्वजणी इथे सोबत येऊ, असे ठरवून मी पुन्हा एकदा तो सुंदर नजारा अनुभवत बसले. नुकत्याच सुरू होणाऱ्या ऑलिम्पिकसाठी सज्ज झालेले पॅरिस, तिथले स्टेडियम, सुंदर वाहणारी seine river बघून आम्ही खाली उतरलो. एका छान cruise मधून आम्ही जवळपास तासभर पॅरिस शहराचे दर्शन घेतले. मला जे बघायचे आहे ते लुवर म्युझिअम, आसपासचे शेकडो शिल्पकलेचे नमुने बघून आम्ही रात्रीच्या रोशणाईमध्ये आयफेल टॉवर बघायला पुन्हा एकदा तिकडे गेलो. रात्री दर तासाच्या ठोक्याला तो ५ मिनिटे blink करतो, ते दृश्य अतिशय मस्त होते. शेजारीच चंद्राचे नैसर्गिक एक चांदणे आणि हे मानवनिर्मित



प्रकाशाचे खेळ, हे दृश्य बघता-बघता आपण वेगळ्याच दुनियेत जातो.

तिसऱ्या दिवशी आम्ही ॲमस्टरडॅमला गेलो. ट्युलिप सीझन संपल्याने फूल पाहायला मिळाले नाही; पण Madurodam या मिनिएचर पार्कमध्ये संपूर्ण हॉलंड छोट्या रूपात अनुभवता आला. चौथ्या दिवशी ब्रुसेल्समध्ये Grand Place आणि गोथिक इमारती पाहिल्या, तर लक्झेंबर्गमध्ये डोंगराळ प्रदेश, टुमदार घरे आणि राजवाडा ट्राम राइडने पाहिला. पाचव्या दिवशी स्वित्झर्लंडकडे प्रवास केला. जर्मनीच्या Black Forest भागातून जाताना हिमशिखरे आणि निसर्गसौंदर्य पाहताना DDLJ ची गाणी आणि आमचा आनंद द्विगुणित झाला. रस्त्यात cuckoo clock फॅक्टरी बघितली आणि Rhine Falls मध्ये बोटीचा आनंद घेतला. दुसऱ्या दिवशी माऊंट टिटलिस बघायला गेलो. मस्त सगळीकडे बर्फच बर्फ. तिथे cable car मधून उंच-उंच जात होतो. आमच्या ग्रुपमधल्या २ मुलींनी ready to wear साडी आणली होती. या स्वित्झर्लंडच्या बर्फात साडी घालून bollywood songs चे reels बनवण्यासाठी. सगळ्या ग्रुपने त्या साड्या घालून videos, photos काढले. चांदणीमधील गाणे असो की, रॉकी और राणी की प्रेम कहानीमधील गाणे, सगळ्या जणी तुफान हसीमजाक करत होते. तिथे आलेले बाकीचे भारतीय लोकसुद्धा त्या दोघी मुलींच्या साडी आणल्याच्या कल्पनेला दाद देऊनच पुढे जात होते. संध्याकाळी Lucerne Lake मध्ये मस्त तासभर क्रूझ सफारीवर गेलो. तिथे संध्याकाळचा हिमशिखरांवर पडलेला सूर्यप्रकाश, सुंदर थंड वातावरण याच्या जोडीला होते स्वित्झर्लंडच्या दोन स्थानिक कलाकारांनी सादर केलेले swiss Alphorn आणि ऑर्गनचे संगीत. रोज रात्री ९.३० पर्यंत तिथे सूर्यप्रकाश असल्याने आम्हाला भरपूर वेळ मिळाला सगळे फिरायला.

स्वित्झर्लंडला Bye bye म्हणून आम्ही म्युनिच शहरात आलो. जर्मनीतले एक मोठे शहर. तिथे हिटलरने भाषणे देऊन स्थानिक लोकांमध्ये देशप्रेम (?) जागृत केले.



नवव्या दिवशी Salzburg, -ustria ला गेलो. प्रसिद्ध संगीतकार मोझार्टचे जन्मगाव, त्याचे राहते घर सुंदर स्मारकामध्ये convert केले आहे. आसपासच्या सुंदर इमारती, कंथेड्रल या सर्वांमध्ये युरोपीयन स्थापत्यशैली, शिल्पकला, नाजूकपणा आणि तरीही भक्कमपणा दिसत होता. Sound of Music चे जिथे shooting झाले ते Mirabell Garden पाहिले, तिथून Love Lock Bridge बघायला गेलो. ज्या प्रेमीयुगलांना आपले नाते जन्मोजन्मी टिकावे असे वाटते, ते युगल आपल्या नावाचे कुलूप त्या Bridge ला लावून त्याची किल्ली पाण्यात फेकून देतात. अशी कित्येक कुलुपे त्या Bridge लां बांधलेली होती. प्रेमाला असे अंधश्रद्धेचेही बंधन नसावे, तरीही जे टिकेल तेच खरे प्रेम, असे मी मानते. नंतर Wattens मधील Swarovski Crystal world मध्ये गेलो. तिथे crystels चे अतिशय सुंदर म्युझियम आहे.

इटली. आमच्या ट्रीपमधील शेवटचा देश. सर्वात आधी व्हेनिस शहरात गेलो. माझ्या कॉलेजमध्ये असलेल्या Merchant of Venice या शेक्सपिअरच्या नाटकामुळे पहिल्यांदा कानावर पडलेले शहर, सेंट मार्कसची बॅसिलिका, बेल टॉवर, bridge of sigh, Doge's Palace ही अतिशय उत्तमोत्तम ठिकाणे बघत आम्ही संध्याकाळी व्हेनिसच्या प्रसिद्ध Gondola ride म्हणजेच बोटीमध्ये बसलो. *दो लब्जों की है ये कहानी* गाण्यात आहे तीच ही बोट, सुंदर कालव्यामधून सर्व इमारतीच्या खालून, पुलांच्या खालून पुढे-पुढे जाणारी ती बोट माझे स्वप्न सत्यात आले आहे हेच सांगत होती.

१ जूनला, शतकानुशतके युरोपला जे रोमन साम्राज्य म्हणून ओळखले जाते, त्या रोम शहरात मी आले. तिथले अवशेष, प्रचंड मोठ्या इमारती, Trevi Fourdain, तिथल्या एकूण एका शिल्पाचे बारकाईने केलेले कोरीव काम, ज्युलिअस सीझरचा पुतळा, प्राचीन Tiber नदी, त्यावरचे कलात्मक पूल, रोमन साम्राज्यातले Colosseum, Vatican city मधील सेंट पीटरची बसिटिका, रोमन फोरम असे अगणित वास्तूंचे नमुने पाहिले. प्रत्येक ठिकाणाला एक संपूर्ण दिवस दिला तरी बघून होणार नाही, एवढे मोठे त्याचे महत्त्व आहे, तरीही आम्ही एका दिवसात हे सगळे अक्षरशः धावत्या भेटीत पाहिले. त्यामुळे निदान माझ्या मनाचे तरी रोम पाहून समाधान झाले नाही. पुन्हा कधीतरी इथे निवांत वेळ मिळाल्यावर परत येईन, अशी मनाची समजूत घालत, मी ट्रीपच्या शेवटच्या दिवशी पिसा शहरात पोहोचले. झुकता मनोरा, कॅथेड्रल आणि बाप्टीस्ट्री एकाच परिसरात पाहायला मिळाले. झुकता मनोरा प्रसिद्ध असला तरी कॅथेड्रल अधिक प्रभावी वाटले. पिसावरून मिलान एअरपोर्टमार्गे अबुधाबी होत मुंबईला परतले. एक मोठं स्वप्न पूर्ण केल्याचं समाधान होतं; पण या पृथ्वीवर अजून खूप काही अनुभवायचं आहे, याची जाणीव मनात घेऊन पुण्याला परतले.

**(राज्यकर निरीक्षक, पुणे, महाराष्ट्र शासन.)**



# पाटणादेवी

युवराज पाटील-चोबळीकर

चाळीसगाव हे ब्रिटिश काळापासून भारताच्या नकाशावर महत्त्वाचं स्थान म्हणून ओळखलं जातं. गोताळा अभयारण्यातील पितळखोरे लेण्या, ज्या अजिंठा लेण्यांपूर्वीच्या काळातील आहेत, त्या सर्वश्रुत आहेत. मात्र, या सर्वांपेक्षा अधिक आश्चर्यचकित करणारा भाग म्हणजे पाटणादेवी आणि तिथला कैक किलोमीटर परिसराचा परीघ..!!

अनेक वर्षांपासून या स्थळाला भेट देण्याची इच्छा मनात होती. पुरातत्त्वशास्त्र शिकताना पितळखोरे लेण्यांचा उल्लेख शिल्पकला आणि रंगांच्या इतिहासात हमखास येत असे. अखेर एका सुट्टीच्या दिवशी, मी सपत्निक आणि मित्र–लेखक, रंगकर्मी हर्षल पाटील *(त्याच्या कुटुंबासह)*; तसेच चाळीसगावचे इतिहासतज्ज्ञ प्रा. कल्पतेश देशमुख आणि प्रा. आदर्श मिसाळ यांच्यासह हे क्षेत्र पाहण्यासाठी निघालो.

पितळखोरे लेण्या आधीच प्रसिद्ध असल्याने त्यावर नव्याने लिहिण्याचा उद्देश नव्हता. मात्र त्याच परिसरातील उत्तर गोताळा अभयारण्याचा एक ते दोन किलोमीटरचा भाग पाहून थक्क झालो. हा भाग कधी काळी एक समृद्ध नगरी होती, हे स्पष्ट दिसत होतं.


याच परिसरात आचार्य भास्कराचार्य *(द्वितीय)* यांनी जगाला खगोलशास्त्र आणि गणित दिलं, तर त्यांचा नातू चांगदेव यांच्या पाऊलखुणाही येथे आढळतात. चांगदेवांचा इतिहास ११व्या–१२व्या शतकातील असला, तरी ही नगरी सिल्क रूटच्या काळातदेखील महत्त्वाची होती. काही संदर्भ तर बौद्धपूर्व कालखंड, हडप्पा–मोहेन्जदडो काळाशी संबंधित असू शकतात!

## पाटणादेवीचे प्राचीन नाव 'पाटण' की 'पाटनपूर'

द्वितीय भास्कराचार्य यांचा जन्म 'विज्ञलविड' येथे झाला असा उल्लेख आहे; पण ते ठिकाण नेमकं कुठलं यावर संशोधकांची मते–मतांतरे आहेत. शिलालेखात मात्र पाटण असं आहे. पाटण हा शब्द प्राचीन भारतात राजधानी किंवा महत्त्वाच्या शहरासाठी वापरला जात असे. सातवाहन वा चालुक्य काळात येथे प्रशासनिक वा धार्मिक केंद्र असावं. देवीचं मंदिर प्रसिद्ध झाल्यामुळे पुढे याला पाटणादेवी हे नाव प्राप्त झालं. शिलालेखीय पुरावा नसला, तरी स्थानिक परंपरा आणि भूगोल या नावाच्या उगमाचे द्योतक आहेत.

## सातवाहन व्यापारसाखळीत 'पाटण'चं स्थान

सातवाहन काळात पैठण *(प्रतिष्ठान)* ही राजधानी व रोमन साम्राज्याशी थेट व्यापार करणारे बंदर होते. तगेर *(आजचं तेर,*



*धाराशिव पूर्वीचे उस्मानाबाद)* हे पश्चिम भारतातील व्यापारसाखळीचं प्रमुख केंद्र होतं, तर पाटण हे या मार्गावरील एक महत्त्वाचं विश्रांतीस्थान आणि लघु बाजारपेठ म्हणून ओळखलं जात होतं. गिरणाकाठचा भूगोल, घाटरस्त्याजवळचं स्थान आणि पुरातत्त्वीय साक्षींमुळे याचे महत्त्व अधोरेखित होते.

## प्राचीन अवशेष: हजारो वर्षांचा सांस्कृतिक ठेवा

जळगाव जिल्ह्याच्या दक्षिणेकडील गिरणा नदीच्या उपनदी सर्वतोलच्या काठावर वसलेलं पाटणादेवीचं क्षेत्र धार्मिक श्रद्धास्थान म्हणून ओळखलं जातं; परंतु याचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. पाटणादेवी मंदिराच्या पायऱ्या चढताना उजव्या बाजूला एका मंदिराच्या भागात अनेक पुरातत्त्वीय शिल्प बंद करून ठेवले आहेत. कदाचित त्याचा अभ्यास पुरातत्त्वाच्या अंगांनी झाला असेल.

१९७०च्या दशकात येथे उत्तर पॅलिओलिथिक युगातील अवशेष सापडले. हातात धरून वापरली जाणारी दगडी हत्यारं, चकत्या; तसेच शहामृगाच्या अंड्यांच्या कवचांपासून बनवलेले कोरलेले मण्यांचे अवशेष. हे मणी केवळ सौंदर्याचे प्रतीक नव्हे, तर त्या काळात अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार व सांस्कृतिक देवाणघेवाणीचे प्रतीक म्हणता येईल.



अधिकृत डेक्कन कॉलेज, पुणे या संशोधन संस्थेनी यावर संशोधन केले आहे. यावर संशोधन पेपर प्रसिद्ध झाल्याचे कळते; पण ते संशोधन सर्वसामान्यांच्या वाचनात नाही.

## इतिहासाची सलगता – सातवाहन ते यादव

या भागात मानवी वस्ती सातत्याने असल्याचे संकेत सातवाहन, गुप्त, राष्ट्रकूट, चालुक्य आणि यादव काळातील विविध पुराव्यांतून मिळतात. घाटमार्ग सुरक्षित ठेवण्यासाठी उभारलेल्या चौक्या, बौद्ध लेण्यांशी संबंधित वास्तू आणि नाण्यांच्या नोंदी यामुळे पाटणादेवीचा वाढता राजकीय-सांस्कृतिक प्रभाव स्पष्ट होतो.

## पाटणादेवीचा शास्त्र, शिल्प आणि अध्यात्मसंपन्न वारसा

१२ व्या शतकातील शिलालेखात भास्कराचार्य *(द्वितीय)* आणि त्यांच्या नातवाचा चांगदेवांचा उल्लेख आढळतो. भास्कराचार्य हे लीलावती, सिद्धांत शिरोमणी यांसारख्या ग्रंथांचे रचनाकार असून ते प्राचीन खगोलशास्त्रीय अभ्यासक, गणिततज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचा आणि चांगदेवांचा इथला वास्तव्यकाळ येथे शास्त्र, अध्यात्म व खगोलशास्त्र यांचा संगम घडवत होता. मुक्ताईनगर तालुक्यातील चांगदेव या गावी असलेलं मंदिर तिथले संत चांगदेव याबाबत संभ्रम आहे.

चांगदेव हे संत मुक्ताईंचे शिष्य होते. वाघावर आरूढ होऊन ज्ञानेश्वरांपुढे गेलेले चांगदेव आणि या शिलालेखातील चांगदेव एकच की, वेगळे या प्रश्नावर मी भाष्य करणार नाही; पण हा अभ्यासाचा विषय नक्कीच आहे.

## वेसर शैलीतील मंदिर – एक विस्मयकारक वारसा

पाटणादेवी परिसरातील वेसर शैलीतील एक महादेव मंदिर विशेष लक्षवेधी आहे. अनेक पर्यटक मुख्य रस्त्यापासून वेगळ्या मार्गावर असल्यामुळे ते बघत नाहीत.

या मंदिरात मैथुन शिल्पं, कोरीव द्वारशाखा, भव्य मंडप आणि चालुक्य स्थापत्यशैलीचा प्रभाव स्पष्ट दिसतो. अशा शैलीची मंदिरं. त्यात दैत्य सुदन मंदिर लोणार जि. बुलढाणा, कालिका मंदिर, बार्शी टाकळी जि. अकोला, आनंदेश्वर मंदिर, लासूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती, भैरवनाथ मंदिर, किकली ता. वाई, जि. सातारा ही मी प्रत्यक्ष बघितलेली, तर ऐकलेली धारासूर मंदिर ता. गंगाखेड जि. परभणी, कोपेश्वर मंदिर खिद्रापूर जि. कोल्हापूर आणि या सर्व मंदिरावर कोरीव शिल्प आणि मैथुन शिल्प आहेत.

ही स्थापत्यशैली फक्त सौंदर्यदृष्ट्या नाही, तर धार्मिकता आणि आध्यात्मिकता यांचा समतोल स्पष्ट करणारी आहेत. मैथुन शिल्पं ही वासनेसाठी नसून सृष्टीचक्र आणि आध्यात्मिक उन्नतीचं प्रतीक मानली जात.

## संशोधनाची गरज आणि स्थानिक सहभाग

या भागातील बहुतेक गोष्टी आजही संशोधनाच्या प्रतीक्षेत आहेत. शिलालेखांचं सखोल वाचन, स्थापत्यशैलीचं विश्लेषण आणि सांस्कृतिक स्मृतींचं दस्तऐवजीकरण हे सर्व पुरातत्त्व विभाग, स्थानिक प्रशासन आणि विद्यापीठीय संस्थांच्या समन्वयातून होऊ शकतं.


## पांढऱ्या मातीचं वैशिष्ट्य

परिसरात ठिकठिकाणी मातीचे ढिग दिसतात. या पांढऱ्या मातीवर झाडं झपाट्याने वाढतात. याचं उदाहरण म्हणजे १९९३च्या भूकंपानंतर वसवलेलं नवीन किल्लारी आणि जुन्या गावात वनविभागाने वाढवलेलं जंगल. अशाच प्रकारचं जंगल पाटणादेवी परिसरातही वाढताना दिसतं.

## पाटणादेवी : उगम, उन्नती आणि उत्क्रांतीचा साक्षीदार

पाटणादेवी हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर तो एक जिवंत ऐतिहासिक दस्तऐवज आहे. आद्य मानवापासून ते शास्त्रज्ञांपर्यंत, संतांच्या तपश्चर्येपासून शिल्पकारांच्या निर्मितीपर्यंत आणि आध्यात्मिक अनुभूतीपासून स्थापत्यपरंपरेपर्यंत, या भूमीने सर्व प्रवाहांना सामावून घेतलेलं आहे. यावर खूप व्यापक संशोधन होऊ शकते...!!

**(जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव.)**


महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
छत्रपती शिवाजी महाराजांचे
१२ किल्ले युनेस्को जागतिक वारसा नामांकन
यादीत समाविष्ट झाल्याबद्दल
महाराष्ट्रातील जनतेचे हार्दिक अभिनंदन!
शिवनेरी
राजगड
रायगड
प्रतापगड
पन्हाळा
साल्हेर
लोहगड
खांदेरी
सुवर्णदुर्ग
विजयदुर्ग
सिंधुदुर्ग
जिंजी
महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा!
आपल्या गौरवशाली इतिहासाची जागतिक स्तरावर घेतलेली दखल,
ही सर्व मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे.
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
एकनाथ शिंदे
अजित पवार
ॲड. आशिष शेलार
विनीत
विकास खारगे, (भा.प्र.से)
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा
अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग
तेजस गर्गे
संचालक
पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

DIRECTORATE
MAHARASHTRA
TOURISM

# पर्यटनः आज आणि उद्यासाठी!

## विकासाच्या दिशेने एक पाऊल
## महाराष्ट्र पर्यटन धोरण - 2024 जाहीर

**पर्यटन धोरणाच्या माध्यमातून रु. 1 कोटींची गुंतवणूक , 18 लाख रोजगाराच्या संधी आगामी दहा वर्षात पर्यटन स्थळांवरील पायाभूत सुविधांचा विकास**

### कर सवलती
- भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन.
- व्याज अनुदान प्रोत्साहन.
- केंद्रीय वस्तू आणि सेवा कर परतावा.
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी इतर आर्थिक प्रोत्साहने.
- वीज दरात सवलत
- व्याज अनुदान प्रोत्साहन.
- महिला उद्योजक /अनुसूचित जाती-जमाती/वेगळ्या सक्षम गटांसाठी अतिरिक्त प्रोत्साहने.


### मेळावे आणि प्रदर्शनांमध्ये सहभागास प्रोत्साहन
- देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पर्यटन प्रदर्शने, ट्रॅव्हल शो आणि मार्ट्समध्ये सहभागी होण्यासाठी पर्यटन भागधारकांना प्रोत्साहन.
- ग्रामीण पर्यटन मेळावे/वार्षिक मेळावे आयोजनासाठी प्रोत्साहन (रु. 15 लाखांपर्यंत)

### पर्यटन उत्पादनांना प्रोत्साहन
- तरुणांना पर्यटनासाठी प्रोत्साहन
- कृषी, कॅराव्हॅन आणि साहसी पर्यटनासाठी प्रोत्साहन
- नाविन्यपूर्ण उत्पादने/सेवांसाठी प्रोत्साहन (रु. 50 हजारांपर्यंत).

### कौशल्य विकास आणि संशोधनाला चालना
- कौशल्य विकास कार्यक्रमांसाठी प्रोत्साहन
- पर्यटन/आदरातिथ्य उद्योगातील संशोधनासाठी प्रोत्साहन (रु. 10 लाखांपर्यंत)
- माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान सक्षमीकरणासाठी प्रोत्साहन (रु. 10 लाखांपर्यंत)

### संस्कृती आणि पर्यावरणाचे रक्षण
- दुर्मिळ कला, संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रोत्साहन (रु. 5 लाखांपर्यंत)
- पर्यावरण पर्यटन प्रमाणपत्रासाठी प्रोत्साहन (रु. 10 लाखांपर्यंत)

### सक्षमीकरण आणि उत्कृष्टतेसाठी नवीन मार्ग
- दिव्यांग व्यक्तींना रोजगार देण्यासाठी प्रोत्साहन.
- उद्योगातील उत्कृष्टतेचा गौरव करण्यासाठी पर्यटन पुरस्कार



**अधिक माहितीसाठी पर्यटन संचालनालय:** कोकण - ०२२-२०८७६४१६ / २७५६०००२, नागपूर - ०७१२-२५३३३२७, पुणे - ०२०-२९९००२८९ छत्रपती संभाजी नगर - ०२४०-२९९०४५७, अमरावती - ०२७१-२६६१६११, नाशिक - ०२५३-२९९५४६४

**अधिक माहितीसाठी:** +९१-९४०३८७८८६४ वर **HI** पाठवा

**आम्हाला अनुसरण करा:** MaharashtraTourism @maha_tourism maharashtratourismofficial

diot@maharashtratourism.gov.in www.maharashtratourism.gov.in

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन